MAPOL 1.5M

# एम.ए (राज्यशास्त्र)

## सत्र - I

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सुधारित अभ्यासक्रम

# भारताचे शेजारील राष्ट्रांशी संबंध

# INDIA'S NEIGHBOURHOOD RELATIONS

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक रविन्द्र कुलकर्णी**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक (डॉ.) अजय भामरे**
प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक शिवाजी सरगर**
संचालक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर बनकर**
**सहयोगी प्राध्यापक आणि प्रमुख मानव्यविद्या शाखा**
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक** : **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

: **डॉ. क्षिप्रा वासुदेव**
सहायक प्राध्यापक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**संपादक** : **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **डॉ. श्रीकांत देविदास महादने**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग
डॉ पतंगराव कदम कला आणि वाणिज्य महाविद्यालय
पेण, रायगड.

: **डॉ. बाबासाहेब त्र्यंबक मोताळे**
सहायक प्राध्यापक
स्व. अण्णासाहेब आर डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय,
महासडी साक्री. जि. धुळे.

: **डॉ.भगवान लोखंडे**
सहयोगी प्राध्यापक
डी.जी.तटकरे कला आणि वाणिज्य महाविद्यालय
तळा जि-रायगड.

**जून २०२४, मुद्रण - १**    ISBN 978-81-978540-3-3

**प्रकाशक**
**संचालक,** दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय. विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | उत्क्रांती Evolution | १ |
| २ | भारत आणि त्याचे शेजारी-१ India and its Neighbours-1 | १० |
| ३ | भारत आणि त्याचे शेजारी-२ India and its Neighbours-2 | २१ |
| ४ | द्विपक्षीय मुद्दे Bilateral issues | ५९ |

**एम. ए. राज्यशास्त्र**

**सत्र - I**

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सुधारित अभ्यासक्रम**

# भारताचे शेजारील राष्ट्रांशी संबंध

# India's Neighbourhood Relations

**अभ्यासक्रम**

**अभ्यासक्रमाची उद्दिष्टे:**

1. विद्यार्थ्यांना भारत आणि त्याच्या शेजारील राष्ट्रांशी ओळख करून देणे.
2. विविध राजकीय पक्षांच्या अंतर्गत भारताच्या शेजारील राष्ट्रांशी धोरणाचे परीक्षण करणे.
3. भारत आणि त्याचे शेजारी यांच्यातील तणावाची कारणे तपासणे.
4. भारताने आपल्या शेजाऱ्यांसोबतचे संबंध सुधारण्यासाठी घेतलेल्या पुढाकारांना समजून घेणे.

**धटक 1 - उत्क्रांती**

अ) काँग्रेसच्या काळात भारताचे शेजारील राष्ट्रांशी धोरण

ब) गैर-काँग्रेसच्या काळात भारताचे शेजारील राष्ट्रांशी धोरण, गुजराल सिद्धांत

क) आण्विकीकरण आणि शेजारील राष्ट्रांशी धोरण

**धटक 2 -भारत आणि त्याचे शेजारी- I**

अ) चीन

ब) पाकिस्तान, अफगाणिस्तान

क) श्रीलंका

**टधटक 3 - भारत आणि त्याचे शेजारी- II**

अ) बांगलादेश

ब) नेपाळ, भूतान

क) विखंडन

**घटक 4 - द्विपक्षीय समस्या**

अ) जमीन आणि सागरी सीमा समस्या

ब) पाणी वाटपाचा प्रश्न

क) सीमापार दहशतवाद, स्थलांतर

**Subject code: C50516**
**India's Neighbourhood Relations**
**(4 Credits, 60 Hours)**

**Course Objectives:**

1. To familiarize students about India and its Neighbors.
2. To examine India's Neighborhood policy under different political parties.
3. To examine causes of tensions between India and its neighbors.
4. To understand initiatives taken by India to improve its relations with its neighbors.

**Module 1: Evolution**

a) India's Neighborhood Policy during Congress period
b) India's Neighborhood Policy during Non-Congress, Gujral Doctrine.
c) Nuclearisation and Neighborhood Policy

**Module 2: India and It's Neighbors- I**

a) China
b) Pakistan, Afghanistan
c) Sri Lanka

**Module 3: India and It's Neighbors- II**

a) Bangladesh
b) Nepal, Bhutan
c) Myanmar

**Module 4: Bilateral Issues**

a) Land and Maritime Boundary Issue
b) Water Sharing Issue
c) Cross Border Terrorism, Migration

**Course Outcomes:**

1. Students will become familiar with its close neighboring countries.
2. After studying this course students will develop critical thinking about India's rel with neighboring countries.
3. Students will be able to understand that how tension or conflict situation affects I relations with its neighbors
4. Students will gain knowledge about the alternative methods used to improve the rel with neighboring countries.

**Reading List:**


1. Aryal, S. K., & Bharti, S. S. (2023). Evolution of 'India's Neighborhood First Polic Since Independence. *Society*, *60*(2), 224–232. https://doi.org/10.1007/s12115-023 00819-y
2. Bajpai, S. (2023, February 23). *For Now, India Has a Limited Appetite for Diploma With Pakistan*. https://thediplomat.com/2023/02/for-now-india-has-a-limited-app for-diplomacy-with-pakistan/
3. Chenioy K.M. and Chenioy A.M., India's Foreign Policy Shifts and The Calculus o Power, Economic and Political Weekly, 42(35): 3547:53, 2007.
4. David M. Malon, Does the Elephant Dance?, Oxford, 2011.
5. Ganaie, R. A., & Ganaie, M. A. India's Afghanistan policy: A quest for strategic space post the US withdrawal. *Humanities and Social Sciences Communications*, *9*(1), 2022. https://doi.org/10.1057/s41599-022-01489-7
6. Ganguly S. Indian Foreign Policy Grows Up, World Policy Journal, 20 (2): 41-47, 2003.
7. Gokhale, V. *A Brief Background to India-China Relations* (The Road from Galwan:, pp. 4–5). Carnegie Endowment for International Peace, 2021, https://www.jstor.org/stable/resrep30024.5
8. Gupta V.K.S. and Chandra V. (ed.), India's Neighbourhood: Challenges Ahead, IDSA and Republic Press, 2008, New Delhi.
9. IGNOU *India and the World*. EGyanKosh., July 2, 2023, https://egyankosh.ac.in/handle/123456789/24365
10. Jack Kathryn, "Bangladesh, India and Pakistan: International Relations and Regional Tension in South Asia, Palgrave, 2000,
11. Jha Nalini Kant, "South Asia in 21st Century: India and Her Neighbours and Great Powers", South Asian Publisher, 2003, New Delhi.
12. Jala A. and Bose S., Modern South Asia: History, Culture, Political Economy, Oxford University Press, 2004, New Delhi.
13. Khanna, V. *Foreign Policy of India* , Vikas Publishing House Pvt. Ltd.2018.
14. Kondapalli, S., Beijing's powerplay. *Deccan Herald*, April 30. 2023 https://www.deccanherald.com/opinion/beijing-s-powerplay-1214277.html
15. Mohan C. Raja India and China: Can Two Tigers Share a Mountain? Sunday Gurdian, 21 March, 2010.
16. Mohan C. Raja, "India's Neighbourhood Policy: Four Dimensions, Indian Foreign Affairs Journal, 2(1), 2007.
17. Muni S.D. (ED.), The Emerging Dimension Of SAARC,, Cambridge University Press, 2010, New Delhi
18. Nancy Jaitly (ed.), "India's Foreign Policy: Challenges and Prospectus", Vikas Publication, 1999, New Delhi.
19. Noorani A. G., "India China Boundary Problem 1846-1947, Oxford, 2010.
20. Paul, T. When balance of power meets globalization: China, India and the small states of South Asia. *Politics*, *39*(1), 50 63, 2019, https://doi.org/10.1177/0263395718779930
21. Rumel D. and Ashok K Bhuria, India's Neighbourhood: Challenges in the next Two Decades, IDSA, 2012, New Delhi.
22. Sinha Atish and Mohata Madhup, "India's Foreign Policy: Challenges and Opportunities, Academic Foundation, 2007, New Delhi.
23. Tharoor Shashi, Pax Indica, Penguin, 2011
24. लोखंडे भगवान ,महादाने श्रीकांत, मोताळे बाबासाहेब , 'भारताचे शेजारील राष्ट्रांशी धोरण' दूर व मुक्त अध्ययन केंद्र मुंबई विद्यापीठ, मुंबई ,2023 .
25. किलचे बालासाहेब ,ऋतुजा राऊत ,मधुरा राऊत ,लोखंडे भगवान, 'भारताचे परराष्ट्र धोरण' दूर व मुक्त अध्ययन केंद्र मुंबई विद्यापीठ, मुंबई ,2023 .

# १

# उत्क्रांती Evolution

**घटक रचना**

१.१ उद्दिष्ट्ये

१.२ प्रस्तावना

१.३ कॉंग्रेस कालखंडातील भारताचे शेजारी धोरण

१.४ गैर कॉंग्रेस कालखंडातील भारताचे शेजारी धोरण- गुजराल धोरण

१.५ अण्वस्त्रकरण आणि शेजारी धोरण

१.६ समारोप

१.७ सरावासाठी प्रश्न

१.८ संदर्भ

## १.१ उद्दिष्ट्ये

- कॉंग्रेस कालखंडातील भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या विकासाचा मागोवा घेणे
- गैरकॉंग्रेस कालखंडातील भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या विकासाचा मागोवा घेणे
- भारताच्या अण्वस्त्रधोरणाची चर्चा करणे

## १.२ प्रस्तावना

भारताचे परराष्ट्र धोरण हा बदलत्या काळात अधिकाधिक लोकप्रिय होत आहे. कोणत्याही देशाच्या परराष्ट्र धोरणाचा विकास हा टप्प्या-टप्प्याने होत असतो. अशावेळी भारताच्या परराष्ट्र धोरणाला आकार देणाऱ्या प्रमुख कालावधींची चर्चा या प्रकरणात करण्यात आली आहे.

## १.३ कॉंग्रेस कालखंडातील भारताचे शेजारी धोरण

भारताला स्वातंत्र्य मिळण्याआधी आक्टोबर १९४५ मध्ये भारताने संयुक्त राष्ट्र संघटनेत ब्रिटीश वसाहत म्हणुन सदस्यत्व प्राप्त केले होते. त्याचप्रमाणे १९४४ मध्ये भारताने ब्रेटनवुडस परिषदेमध्ये आपला सहभाग नोंदवला होता. स्वातंत्र्यपुर्व काळातील भारताचा आंतरराष्ट्रीय संघटनांतील वावर हा जागतिक शांतता व व्यवस्था यांचा आग्रह दर्शवणारा होता. घटनाकारांनीही घटनेच्या कलम ५१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे भारत हा आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचा आग्रह धरेल असे स्पष्ट केले होते.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांनी शाश्वत परराष्ट्र धोरणाचा आराखडा स्पष्ट केला. जगातील भांडवलशाही व साम्यवाद यांच्या सुंदोपसुंदीत भारताला आपल्या अडचणींवर मात मिळवायची आहे हे ते ओळखून होते.

त्यामुळे जागतिक पटलावर भारताने कोणत्याही गटात प्रवेश केल्यास देशाचा आर्थिक विकास आणि राजनयिक स्वातंत्र्य धोक्यात येऊ शकते हे स्पष्ट झाले होते. यातूनच अलिप्ततावाद (Non Alignment) या राजनयिक मार्गाचा भारताने विकास केला. अलिप्ततावादामुळे भारताला मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रारुप स्विकारता आले. त्याचबरोबर अलिप्ततावादामुळे भारताने दोन्ही सत्तागटांत सामिल होण्याऐवजी न्याय्य बाजूने उभे राहणे शक्य झाले.

पं. नेहरु यांनी आशियाई युग (Asian Age) या संकल्पनेचा पुनरुच्चार करीत भारताच्या पुर्व, आग्नेय आणि पश्चिम आशियातील देशांसोबत मैत्रीपुर्ण संबंधाचा आग्रह धरला. यातुनच भारताने १९५५ मध्ये आफ्रो- आशियाई देशांची बैठक (बांडुंग परिषद) बोलावली. तिसऱ्या जगातील विकसनशील देशांमध्ये आर्थिक आणि सांस्कृतिक सहकार्य निर्माण करत मोठ्या सत्तांवरील अवलंबित्व (Dependency) कमी करणे हा या बैठकीचा हेतू होता. बांडुंग परिषदेचे यश म्हणजे या बैठकीतून नंतरच्या काळात अलिप्ततावादी चळवळीची पायाभरणी झाली. अलिप्ततावादी चळवळ ही शांततामय सहजीवन, संभाव्य युद्ध टाळणे आणि तिसऱ्या जगातील नवस्वतंत्र देशांना निर्णयाचे स्वातंत्र्य मिळवून देणारी होती. या चळवळीची उभारणी पं. जवाहरलाल नेहरु (भारत), गमाल अब्दुल नासेर (इजिप्त), जोसिप टिटो (युगोस्लाव्हिया), ख्वेम नकुर्मा (घाना) आणि सुकार्नो (इंडोनेशिया) या जागतिक नेत्यांनी केली. अलिप्ततावाद आणि पंचशील ही नेहरुंनी भारताच्या परराष्ट्र धोरणाला दिलेली महत्वाची देणगी होय. या धोरणांमुळे जागतीक पटलावर भारताला निर्णयस्वातंत्र्य मिळाले. मात्र नेहरुंच्या धोरणातील आदर्शवाद आणि संरक्षण सुसज्जतेतील त्रुटी यांमुळे भारत- चीन युद्धात (१९६२) भारताला पराभव स्विकारावा लागला. नेहरु काळातील भारताचे परराष्ट्र धोरण म्हणजे विविध आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये भारताचा सहभाग, अलिप्ततावादी धोरणाच्या माध्यमातून नेतृत्व आणि निर्वसाहतीकरणासाठी अलिप्ततावादाच्या माध्यमातून घेतलेली भुमिका.

पं. जवाहरलाल नेहरुंच्या नंतर लाल बहादूर शास्त्री यांनी पंतप्रधानपदाची सुत्रे स्विकारली. शास्त्री यांनी अलिप्ततावादाचे धोरण जरी कायम ठेवले असले तरी नेहरुंप्रमाणे जागतिक दृष्टीकोन घेणे त्यांनी टाळले. शास्त्री यांनी प्रादेशिक दृष्टीकोन स्विकारत भारताच्या शेजारी राष्ट्रांशी मैत्रीपुर्ण संबंध दृढ करण्यावर भर दिला. सिलोन (१९६४), अफगानिस्तान (१९६५) आणि नेपाळ (१९६५) या देशांसोबत भारताने द्विपक्षीय परिषदांच्या माध्यमातून संबंध सुधारले. शास्त्री यांचा जागतिक पटलावर वावर असला तरीही चीनच्या अण्वस्त्र चाचणी (१९६४) आणि भारत- पाकिस्तान युद्ध (१९६५) यामुळे त्यांना दक्षिण आशियापुरते मर्यादीत रहावे लागले. भारत- पाकिस्तान युद्धामधील (१९६५) भारताचा निर्णायक विजय आणि सोव्हियत रशियाची या युद्धातील मध्यस्थाची भुमिका यामुळे भारताचा कल काहीसा सोव्हियत रशियाकडे झुकलेला दिसतो.

लाल बहादूर शास्त्री यांच्या निधनानंतर श्रीमती इंदीरा गांधी यांनी सत्तेची सुत्रे स्विकारली. पदावर येतांच श्रीमती गांधी यांना व्यव्हारतोल, दुष्काळ, कृषीक्षेत्रातील संथ प्रगती यासारख्या आव्हानांना सामोरे जावे लागणार होते. यावर उपाय म्हणुन त्यांनी आयातीवर काही प्रमाणात बंधने, चलनाचे अवमुल्यन आणि काही धोरणात्मक बदल केले. व्यव्हारतोलाची समस्या सोडवण्यासाठी आणि अन्नधान्याची टंचाई दुर करण्यासाठी अमेरिकेकडून मदत घेण्यात आली. अर्थात या प्रयत्नांतून भारत- अमेरिका संबंध सुधारले असे आपणास म्हणता येणार नाही. याचे कारण भारताने NPT करारावर स्वाक्षरी करण्यास दिलेला नकार, ASEAN

संघटनेचे संस्थापक सदस्यत्व स्विकारण्यास दिलेला नकार आणि महत्वाचे म्हणजे भारताने सोव्हियत रशियासोबत केलेला शांतता, मैत्री व सहकार्य करार. भारताच्या या पाऊलांमुळे भारत अमेरिका संबंध कमालीचे बिघडले. भारताचे या काळातील शेजारी राष्ट्रांशी असलेले संबंध पाहता श्रीमती गांधी यांनी नेपाळ, भुतान, बांग्लादेश, बर्मा, श्रीलंका, मालदीव आणि अफगाणिस्तान यांच्याशी मैत्रीपुर्ण संबंध प्रस्थापित केले. मात्र, १९७१ मध्ये भारत- आणि पाकिस्तान यांच्यातील झालेल्या युद्धामुळे उभय देशांतील संबंध पुन्हा बिघडले. दरम्यानच्या काळात चीन आणि अमेरिका यांच्यात जवळिक निर्माण होऊ लागल्याने भारताच्या परराष्ट्र धोरणात शेजारी राष्ट्रांकडून संभाव्य धोक्याची (*neighbourhood threat perception*) चर्चा होऊ लागली. याचाच परिणाम म्हणुन भारताने १९७४ मध्ये पोखरण येथे पहिली अणुचाचणी केली. भारताचे सोव्हियत रशियाशी असलेली जवळीक, भारताचा पाकिस्तान युद्धातील विजय (१९७१) आणि पोखरण अणुचाचणी या घटनांतून भारताने काही अंशी अलिप्ततावादाशी तडजोड स्विकारत वास्तववादी धोरणाचा स्विकार केल्याचे स्पष्ट होते.

दरम्यान जून १९७५ मध्ये श्रीमती गांधी यांनी राष्ट्रीय आणीबाणी घोषित केली. ही आणीबाणी मार्च १९७७ पर्यंत चालली. त्यानंतर झालेल्या निवडणुकांत गांधी यांचा पराभव होऊन जनता पक्षाचे सरकार आले. जनता पक्षाचे सरकार हे देशातील पहिले गैर काँग्रेस सरकार होते. यामध्य सुरवातील मोरारजी देसाई आणि नंतर चरणसिंग यांनी पंतप्रधानपद सांभाळले. मोरारजी देसाई यांनी आपले सरकार अस्सल अलिप्ततावादाचे (Non Alignment) धोरण स्विकारेल असे स्पष्ट केले होते. यातूनच देसाई यांनी सोव्हियत रशियावरील भारताचे अवलंबन कमी करीत अमेरिकेशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. मोरारजी देसाई आणि जिमी कार्टर यांच्यातील भेटीचा सकारात्मक परिणाम होऊन भारतास आर्थिक मदत पुन्हा सुरु करण्यात आली. देसाई यांनी शेजारी राष्ट्रांशी (विशेषतः चीन, पाकिस्तान, नेपाळ आणि बांग्लादेश यांच्यासोबत) संबंध सुधारण्यास प्राधान्य दिले. मोरारजी देसाई यांच्या राजीनाम्यानंतर चरणसिंग यांनी पदभार स्विकारला. चरणसिंग यांनी अलिप्ततावादास आपला पाठिंबा दर्शवला आणि पाकिस्तानला अलिप्ततावादी राष्ट्रांच्या गटात सामिल करून घेतले. १९७९ मध्ये सोव्हियत रशियाने अफगाणिस्तानवर केलेल्या हल्ल्याची चरणसिंग सरकारने कडाडून टीका केली. मात्र इंदीरा गांधी यांनी जनता पक्षास असलेला आपला पाठींबा काढून घेतल्याने हे सरकार पडले.

सार्वत्रिक निवडणुकांनंतर जानेवारी १९८० मध्ये पुन्हा इंदीरा गांधी यांनी पंतप्रधानपद स्विकारले. श्रीमती गांधी यांनी अलिप्ततावादाच्या धोरणास कायम राखत भारत- चीन सीमा विवाद सोडवण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न केले. इंदीरा गांधी यांनी जागतिक राजकारणात नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था स्थापित झाली पाहीजे हा विचार मांडला.

१९८४ मध्ये इंदीरा गांधी यांची हत्या झाल्याने सत्तासुत्रे त्यांचा मुलगा राजीव गांधी यांच्याकडे आली. राजीव गांधी यांना सार्वत्रिक निवडणुकांत भरीव बहुमत प्राप्त झाले. राजीव गांधी यांनी आपल्या परराष्ट्र धोरणात शेजारी राष्ट्र, बड्या सत्ता आणि निशस्त्रीकरण या तीन घटकांना प्राधान्य दिले. भारताच्या विकासासाठी मैत्रीपुर्ण शेजारी *(friendly neighbourhood)* असणे गरजेचे आहे हे ओळखत भारताने भुतान, नेपाळ, मालदीव, पाकिस्तान आणि श्रीलंका यांच्याशी मैत्रीपुर्ण संबंध स्थापित केले. श्रीलंकेतील तामिळ-सिंहली संघर्षात भारताने मध्यस्थाची (*mediator*) भुमिका घेतली आणि मानवतावादी

सहकार्य (humanitarian assistance) पुरवले. जागतिक राजकारणात शितयुद्ध ओसरत असल्याची लक्षणे दिसू लागल्याने भारताने आपल्या परराष्ट्र धोरणाचे पुनर्मुल्यांकन करण्यास सुरवात केली. या दृष्टीने भारताने सोव्हियत रशिया आणि अमेरिका यांच्याशी संबंध घनिष्ट करण्यास प्राधान्य दिले. १९८५ मध्ये राजीव गांधी यांनी सहा राष्ट्रांची बैठक(*Six Nations Summit*) बोलावली. या बैठकीतून तसेच १९८८ च्या आमसभेतील आपल्या भाषणातून राजीव गांधी यांनी निशस्त्रीकरणाची जोरकस मागणी केली. राजीव गांधी यांचे शेजारी राष्ट्रांबाबत दुसरे महत्वाचे धोरण म्हणजे त्यांनी इंडोनेशिया (१९८६), थायलंड (१९८६), बर्मा (१९८७) आणि द. कोरिया (१९८८) या आग्नेय व पुर्व आशियाई देशांना भेट देत पुर्वेकडे पहा धोरणाची पायाभरणी केली.

१९८९ मध्ये व्हि. पी सिंग यांनी राजीव गांधी यांच्या विरोधात बोफोर्स घोटाळ्यावरुन गदारोळ केला. यानंतर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत व्हि. पी सिंग यांचे ११ महिने कालावधीचे अल्पकालीन सरकार सत्तेवर आले. सिंग सरकारला देशांतर्गत समस्यांचा सामना करावा लागल्याने त्यांनी परराष्ट्र धोरणात फारसे बदल केले नाही. विशेषतः श्रीलंका आणि नेपाळ यांच्याशी संबंध सुधारणेतील त्यांचे योगदान महत्वाचे ठरले. भाजपने व्हि. पी सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतल्याने आक्टोबर १९९० मध्ये सत्तापालट होत चंद्रशेखर हे पंतप्रधान बनले. चंद्रशेखर सरकारने देशांतर्गत राजकारणात महत्वाचे निर्णय घेण्याचा प्रयत्न केला मात्र हे सरकार अल्पजीवी असल्याने परराष्ट्र धोरणात महत्वाचे निर्णय घेऊ शकले नाही. परकिय गंगाजळीतील घट आणि सक्षम आर्थिक धोरणाचा अभाव यांमुळे देश आर्थिक संकटात सापडला. मार्च १९९१ मध्ये काँग्रेसने सरकारचा पाठिंबा काढून घेतल्याने हे सरकार पडले. दरम्यान मे १९९१ मध्ये राजीव गांधी यांची हत्या घडून आली तर २६ डिसेंबर १९९१ मध्ये सोव्हियत रशियाचे पतन झाले. सोव्हियत रशियाच्या पतनानंतर जागतिक राजकारणातील शितयुद्ध संपुष्टात आले आणि भारताच्या अलिप्ततावादी धोरणाच्या उपयुक्ततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. दुसरे असे कि, सोव्हियत रशियाच्या पतनामुळे भारताचा जागतिक राजकारणातील विश्वासू मित्रही नष्ट झाला. यामुळे भारताला आपल्या परराष्ट्र धोरणाची पुनर्मांडणी करणे गरजेचे होते.

## १.४ गैर काँग्रेस कालखंडातील भारताचे शेजारी धोरण- गुजराल धोरण

राजीव गांधी यांच्या हत्येनंतर झालेल्या १० व्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले. पी. व्ही नरसिंह राव यांनी पंतप्रधानपद स्विकारत भारताच्या परराष्ट्र धोरणात आमुलाग्र बदलाचे सुतोवाच केले. देशांतर्गत आर्थिक संकट दुर करण्यासाठी राव यांनी आर्थिक सुधारणा स्विकारल्या तर सोव्हियत रशियाच्या अनुपस्थितीमुळे निर्माण झालेली पोकळी दुर करण्यासाठी जगभरातील देशांशी नव्याने संबंध प्रस्थापित केले.

जागतिक मुक्त बाजारपेठेचा उगम, पुर्व आशियातील अर्थव्यवस्थांचा झपाट्याने होत असलेला विकास आणि आसियानसारख्या संघटनेचे आर्थिक यश पाहता नरसिंहराव यांनी पुर्वेकडे पहा धोरण (Look East Policy) घोषित केले. राव यांनी पुर्व आणि आग्नेय आशियातील देशांसोबत संबंध प्रस्थापित करणे हा देशाच्या आर्थिक विकास साधण्याचा राजमार्ग असेल हे ओळखले होते. आजवर पुर्व आणि आग्नेय आशियातील देशांकडे भारताने पुरेसे लक्ष दिले

नव्हते. उदाहरणादाखल बोलायचे झाल्यास दक्षिण कोरियासारख्या देशात आजवर एकाही भारतीय पंतप्रधानाने भेट दिली नव्हती.

पुर्वेकडे पहा धोरण हे भारताच्या शितयुद्धोतर परराष्ट्र धोरणाचे आणि विस्तारीत शेजाराचे () महत्वाचे उदाहरण मानता येईल. पुर्वेकडे पहा धोरणामुळे भारताला आसियान संघटनेत १९९२ मध्ये क्षेत्रीय चर्चा भागीदारी (*Sectoral Dialogue Partnership*) आणि १९९५ मध्ये पुर्ण चर्चा भागीदारी दर्जा (*Full Dialogue Partner status*) प्राप्त झाला. पुर्वेकडे पहा धोरण हे भारताला आपल्या पुर्व आशियातील शेजारी (जपान, चीन आणि द. कोरिया) तसेच आग्नेय आशियातील शेजारी (आसियान राष्ट्रे) यांना जोडणारा महत्वाचा सेतू ठरले.

नरसिंहराव यांनी सोव्हीयत रशियाच्या पतनानंतर नव्याने निर्माण झालेल्या रशियासोबत तसेच जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेसोबत संबंध दृढ करीत विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य प्राप्त केले. शेजारी राष्ट्रांचा विचार करता, राव यांनी भारत- चीन संबंधातील सीमा विवादातील ताण हलका करण्याच्या दृष्टीने महत्वाचे करार केले. त्यानुसार भारत आणि चीन या दोघांनीही प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर शांतता राखण्याचे निश्चित केले. भारताने तिबेट हा चीनचा स्वायत्त भाग असल्याचे मान्य केले तर चीनने काश्मीर प्रश्नाबाबत भारत व पाकिस्तान यांनी द्विपक्षीय चर्चेतून मार्ग काढावा असे मान्य केले.

पी. व्ही नरसिंहराव यांचा कार्यकाल १९९६ मध्ये संपला. ११ व्या सार्वत्रिक निवडणुकांत भारतीय जनता पक्ष हा लोकसभेतील मोठा पक्ष बनला. श्री अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधानपदी विराजमान झाले मात्र त्यांचे सरकार केवळ १३ दिवस टिकले.

यानंतर १३ पक्षांची आघाडी असलेले युनायटेड फ्रंटचे सरकार देशात स्थापन झाले. श्री एच. डी देवेगौडा याने पंतप्रधानपद स्विकारले. परराष्ट्रमंत्री इंद्रकुमार गुजराल यांनी स्थिर आणि मैत्रीपुर्ण शेजारी (*stable and friendly neighbourhood*) या उद्देशाने आपले स्वतंत्र गुजराल धोरण (*Gujral Doctrine*) घोषित केले. गुजराल धोरणाची पायाभूत तत्वे पुढीलप्रमाणे आहेत-

i. बांग्लादेश, भुतान, नेपाळ, मालदीव आणि श्रीलंका यांच्यासोबत भारत केवळ परस्पर देवाण-घेवाणीपुरते संबंध प्रस्थापित न करता विश्वास आणि श्रद्धेच्या आधारे या देशांना जास्तीत जास्त जुळवून घेईल.

ii. दक्षिण आशियातील कोणताही देश इतर देशांच्या विरोधात आपल्या भुमीचा वापर करणार नाही

iii. कोणताही देश इतर देशांच्या अंतर्गत बाबींत हस्तक्षेप करणार नाही

iv. दक्षिण आशियातील सर्व राष्ट्रे एकमेकांच्या भौगोलिक अखंडता आणि सार्वभौमत्व यांचा आदर करतील

v. आपआपसांतील विवादांची सोडवणुक करण्यासाठी सर्व दक्षिण आशियातील राष्ट्रे शांततामय द्विपक्षीय चर्चेच्या मार्गाचा आग्रह धरतील.

याशिवाय, इंद्रकुमार गुजराल यांनी आग्नेय आशियाकडेही लक्ष केंद्रीत करीत आसियान राष्ट्रांशी संबंध सुधारले. १९९६ मध्ये जाकार्ता येथे झालेल्या परराष्ट्रमंत्र्यांच्या बैठकीत

आर्थिक, सुरक्षा आणि सामाजिक तणावांच्या मुद्यांवर आसियान राष्ट्रांशी चर्चा केली. १९९६ मध्ये भारताला आसियान क्षेत्रीय फोरम (ARF) मध्ये सदस्यत्व मिळाले. ARF हा आर्थिक तसेच राजकियदृष्ट्या निगडीत सुरक्षेच्या प्रश्नांची सोडवणुक करणारा महत्वाचा मंच आहे.

१९९७ मध्ये इंद्रकुमार गुजराल हे भारताचे पंतप्रधान बनले. त्यांनी आपल्या कार्यकाळात पाकिस्तानसोबत असलेल्या वादग्रस्त मुद्द्यांकडे दुर्लक्ष करीत चांगल्या शेजारकरीता बांग्लादेश, भुतान, नेपाळ, श्रीलंका, चीन, इराण आणि आसियान राष्ट्रांशी संबंध सुधारण्याकडे भर दिला.

## १.५ अण्वस्त्रकरण आणि शेजारी धोरण

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताच्या नेतृत्वाने शितयुद्ध कालखंडातील अण्वस्त्रांच्या अफाट क्षमतेची जाणीव जगाला करून दिली, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजही भारताने जगाला अण्वस्त्रांपासून मुक्त करण्यासाठी सातत्यपूर्ण दृष्टिकोन अवलंबलेला दिसतो. या दृष्टीकोनाचाच एक भाग म्हणजे भारताने संपूर्ण, सार्वत्रिक अण्वस्त्र नि:शस्त्रीकरण हे आपल्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट निर्धारित केले.

१९७४ मध्ये पोखरण येथे झालेल्या पहिल्या अण्वस्त्र स्फोटानंतर भारताकडे अण्वस्त्रे विकसित करण्याची क्षमता असली तरी, भारताने अण्वस्त्र पर्यायाचा वापर करण्यापासून परावृत्त केले आणि सुरक्षा वातावरण ढासळत असतानाही, अण्वस्त्र निशस्त्रीकरणासाठी काम करणे पसंत केले.

भारताने आपले स्वतंत्र असे आण्विक धोरण विकसित केले आहे. या धोरणाचा एक भाग म्हभारताचे अण्वस्त्र धोरण अण्वस्त्रधारी शत्रूंविरुद्ध अण्वस्त्रांचा "प्रथम वापर न करण्याच्या" आणि अण्वस्त्र नसलेल्या देशांविरुद्ध अण्वस्त्रांचा वापर न करण्याच्या स्पष्ट आणि अस्पष्ट वचनबद्धतेवर आधारित आहे.

अण्वस्त्रे ही राजकीय शस्त्रे आहेत आणि युद्धाची शस्त्रे नाहीत आणि त्यांचा एकमेव उद्देश अण्वस्त्रांचा वापर आणि धोका टाळणे हा आहे या व्यापक मान्यतामुळे भारताने केवळ विश्वासार्ह "किमान" आण्विक प्रतिबंध विकसित करण्याचा पर्याय निवडला. विश्वासार्ह किमान आण्विक प्रतिबंधक क्षमतेच्या विकासावर आणि प्रथम वापर न करण्याच्या सिद्धांतावर व्यापक राष्ट्रीय एकमत आहे. किमान प्रतिबंधाची व्याख्या "जगण्यायोग्य अण्वस्त्रांची एक लहान शक्ती (जे) एखाद्या देशाच्या महत्त्वाच्या हितांना धोका निर्माण करणारी लष्करी कारवाई सुरू करण्यापासून शत्रूला परावृत्त करेल" अशी केली जाऊ शकते. भारत प्रतिबंधात्मक पातळीच्या पलीकडे कोणतीही क्षमता प्रस्थापित करण्याचा विचार करत नाही.

यानंतर भारताच्या मे १९९८ च्या अणुचाचण्यांनंतर वेगाने अनेक धोरणात्मक घोषणा करण्यात आल्या. भारताने या अणुचाचण्यांनतर भारत आता अण्वस्त्रसंपन्न राष्ट्र आहे तेव्हा अणुस्फोटांवर गुप्ततेचा पडदा टाकण्याची गरज नाही अशी भूमिका घेतली. भारताचे तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी संसदेत आपल्या भाषणात म्हटल्याप्रमाणे: "ही (आण्विक) शस्त्रे आक्रमणासाठी किंवा कोणत्याही विरुद्ध वाढत्या धमक्यांसाठी

वापरण्याचा आमचा हेतू नाही. भारताला आण्विक धमक्या मिळु नये याची खात्री करण्यासाठी ही स्वसंरक्षणाची शस्त्रे आहेत. शस्त्रास्त्रांच्या शर्यतीत सहभागी होण्याचा आमचा हेतू नाही."

यानंतर पाकिस्तानच्या अणुचाचण्यांच्या दुसऱ्या दिवशी, पंतप्रधान वाजपेयी यांनी संसदेत घोषणा केली की भारताने पुढील अणुचाचण्यांवर ऐच्छिक स्थगिती जाहीर केली आहे, आण्विक आणि क्षेपणास्त्राशी संबंधित तंत्रज्ञान तसेच इतर मोठ्या प्रमाणावर विनाशकारी शस्त्रास्त्रांशी संबंधित आणि पाकिस्तान आणि इतर देशांशी द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय मंचावर प्रथम वापर न करण्याच्या करारावर चर्चा करण्याची ऑफर दिली होती. यापुढे भारताच्या आण्विक धोक्याची धारणा देशविशिष्ट नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. १५ डिसेंबर १९९८ रोजी पंतप्रधान वाजपेयी यांनी संसदेत दिलेल्या निवेदनात भारताच्या आण्विक धोरणाचे प्रमुख घटक स्पष्ट केले. यामध्ये १) अण्वस्त्र स्वातंत्र्य जपण्याचा भारताचा संकल्प, २) किमान आण्विक प्रतिबंध, ३) प्रथम वापर नाही, ४) अण्वस्त्रांचा वापर न करणे आणि ५) आण्विक शक्ती आणि अण्वस्त्रांचे उच्चाटन करण्यासाठी दृढ वचनबद्धता यांचा समावेश होता. पंतप्रधानांनी CTBT वर स्वाक्षरी करण्याच्या भारताच्या इच्छेचा पुनरुच्चार केला आणि फिसाइल मटेरियल कट ऑफ ट्रीटी (FMCT) च्या यशस्वी निष्कर्षाप्रत काम करण्याची भारताची तयारी पुन्हा सांगितली.

सप्टेंबर २००० मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या मिलेनियम समिटमध्ये, भारतीय पंतप्रधानांनी असे प्रतिपादन केले की भारताचे धोरण "जबाबदारी आणि संयम" वर आधारित आहे आणि "आमचे संरक्षण करत असताना देखील भारत सार्वत्रिक, सत्यापित करण्यायोग्य आण्विक निःशस्त्रीकरणासाठी अखंड वचनबद्धतेसह दबाव टाकत राहील. धोरणात्मक जागा आणि निर्णय घेण्यामध्ये स्वायत्तता. आंतरराष्ट्रीय शांतता सर्वांसाठी समान आणि कायदेशीर सुरक्षिततेच्या गरजेपासून भारत दूर जाऊ शकत नाही."

याठिकाणी भारताच्या दोन प्रादेशिक शेजाऱ्यांच्या आण्विक सिद्धांतांचा संक्षिप्त आढावा घेणे महत्वाचे ठरेल.

भारताचा शेजारी असलेल्या चीनचा अण्वस्त्र कार्यक्रम हा त्याच्या पारंपारिक युद्धाच्या सिद्धांताशी सुसंगत आहे. सुरुवातीच्या काळात स्व-संरक्षणावर आधारित असलेल्या या धोरणाचा विस्तार १९६०-७० च्या दशकात किमान आण्विक प्रतिबंधकतेकडे होत आता मर्यादित आण्विक प्रतिबंधावर स्थिर झाल्याचा दिसतो. या धोरणात काही प्रमाणात आण्विक दबावतंत्राचा ही समावेश आहे. ग्रेगरी एस. जोन्स यांचे असे मत आहे की चीनचे स्पष्टपणे अधिक जटिल आण्विक धोरण आहे जे काही विशिष्ट परिस्थितीत शेजाऱ्यांविरुद्ध प्रथम आण्विक स्ट्राइक नाकारत नाही. चीन अजूनही अण्वस्त्रांचा प्रथम वापर करू नये या आपल्या सिद्धांताचे पालन करेल असा आग्रह धरत आहे.

भारताचा अन्य अण्वस्त्रसंपन्न शेजारी म्हणजे पाकिस्तान होय. पाकिस्तानच्या लष्करी राज्यकर्त्यांनी अनेकदा जोर दिल्याप्रमाणे, पाकिस्तानचा अण्वस्त्र कार्यक्रम हा केवळ भारताच्या अण्वस्त्रांचा धोका रोखण्यासाठी नाही तर भारताच्या पारंपारिक लष्करी श्रेष्ठतेचा प्रतिकार करण्यासाठी देखील आहे. भारताच्या हातून सर्वसमावेशक लष्करी पराभव टाळण्यासाठी आणि एक व्यवहार्य राष्ट्र राज्य म्हणून त्याचे अस्तित्व धोक्यात येणार नाही

याची खात्री करण्यासाठी पारंपारिक संघर्षात पाकिस्तान अण्वस्त्रांचा लवकर वापर करेल असे त्याच्या लष्करी आणि राजकीय नेत्यांनी वारंवार सांगितले आहे.

भारताचा मसुदा आण्विक सिद्धांत

एप्रिल 1998 मध्ये, भारत सरकारने राष्ट्रीय सुरक्षा परिषद (NSC) स्थापन करण्याची शिफारस करण्यासाठी टास्क फोर्सची स्थापना केली होती. टास्क फोर्सने जून 1998 मध्ये आपला अहवाल सादर केला आणि नोव्हेंबर 1998 मध्ये, सरकारने पूर्णवेळ राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळ (NSAB) सह तीन-स्तरीय NSC ची स्थापना केली. मूलतः NSAB वर सोपवण्याचे पहिले काम धोरणात्मक संरक्षण पुनरावलोकन करणे हे होते, तरी पोखरण II नंतरच्या सक्तीमुळे, NSAB ला प्रथम भारताची आण्विक सिद्धांत तयार करण्यास सांगितले गेले. भारताने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळ (NSAB) च्या माध्यमातून १७ ऑगस्ट १९९९ रोजी आपला आण्विक धोरणाचा मसुदा सादर केला. या प्रस्तावित आण्विक सिद्धांताची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील-

i. भारताविरुद्ध अण्वस्त्रे वापरण्याची कोणतीही धमकी या धोक्याचा प्रतिकार करण्यासाठी उपायांना आवाहन करेल;

ii. भारत आणि त्याच्या सैन्यावर कोणताही अण्वस्त्र हल्ला केल्यास अण्वस्त्रांनी दंडात्मक प्रत्युत्तर दिले जाईल जेणेकरून आक्रमणकर्त्याला नुकसान होईल.

iii. भारतीय अण्वस्त्रांचा मूलभूत उद्देश भारत आणि त्याच्या सैन्याविरूद्ध कोणत्याही राज्य किंवा घटकाद्वारे अण्वस्त्रांचा वापर आणि वापरास प्रतिबंध करणे हा आहे. भारत हा पहिला अण्वस्त्र हल्ला करणार नाही परंतु प्रतिबंधात्मक कारवाई अयशस्वी झाल्यास दंडात्मक प्रत्युत्तर देईल.

iv. भारत ज्या राज्यांकडे अण्वस्त्रे नाहीत किंवा ज्यांच्याकडे अण्वस्त्रे नाहीत किंवा अण्वस्त्र शक्तींशी संरेखित नाहीत त्यांच्याविरुद्ध अण्वस्त्रांचा वापर किंवा वापर करण्याची धमकी देणार नाही.

या मसुद्याद्वारे भारताने आण्विक युद्धाची संकल्पना नाकारली आहे भारताच्या आण्विक सिद्धांताचे वेगळे वैशिष्ट्य हे आहे की ते "... जागतिक, पडताळणीयोग्य आणि भेदभाव न करता आण्विक नि:शस्त्रीकरणासाठी भारताच्या निरंतर वचनबद्धतेमध्ये जोडलेले आहे..." अण्वस्त्रांचा वापर मानवतेसाठी आणि आंतरराष्ट्रीय व्यवस्थेतील शांतता आणि स्थिरतेसाठी सर्वात गंभीर धोका मानला जातो. जगाला अण्वस्त्रांपासून पूर्णपणे मुक्त पाहण्याची भारताची इच्छा या धोरणात स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहे.

## १.६ समारोप

भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विकास अव्याहतपणे सुरु आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने स्विकारलेले अलिप्ततावादाचे धोरण बदलत्या काळात कालबाह्य ठरु लागले. विशेषतः १९९० नंतरच्या बदललेल्या जागतिक स्थित्यंतराचा विचार करता भारताला अलिप्ततावादाचा त्याग करणे क्रमप्राप्त होते हे दिसते. असे असले तरीही अलिप्ततावादाचे धोरण हे आजही भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या स्वायत्ततेचे व स्वातंत्र्याचे मर्म आहे. भारताचे

परराष्ट्र धोरण हे अशाच मुलभूत तत्वांवर आधारलेले असून त्या तत्वांच्या आधारे भारत जागतिक स्तरावर आपले राष्ट्रीय हित जोपासत आहे.

## १.७ सरावासाठी प्रश्न

- काँग्रेस कालखंडातील भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विस्तृत परामर्श घ्या
- गैरकाँग्रेस कालखंडातील भारताच्या परराष्ट्र धोरणातील बदलांची चर्चा करा
- भारताच्या अण्वस्त्रधोरणाची सविस्तर चर्चा करा.

## १.८ संदर्भ


- Foreign Policy of India- V. N Khanna, Leslie K. Kumar
- India’s Nuclear Policy- Harsh Pant, Yogesh Joshi


❄❄❄❄❄❄❄

# २

# भारत आणि त्याचे शेजारी-१
# India and its Neighbours-I

**घटक रचना**

२.१ उद्दिष्ट्ये
२.२ प्रस्तावना
२.३ चीन
२.४ पाकिस्तान आणि अफगाणिस्तान
२.५ श्रीलंका
२.६ समारोप
२.७ सरावासाठी प्रश्न
२.८ संदर्भ

## २.१ उद्दिष्ट्ये

- भारताचे त्याच्या प्रमुख शेजारी देशांशी (चीन, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि श्रीलंका) असलेले संबंध अभ्यासणे

## २.२ प्रस्तावना

भारत हा आशिया खंडातील प्रबळ महासत्ता मानला जातो. शितयुद्धोत्तर कालखंडात भारताच्या परराष्ट्र धोरणात रचनात्मक बदल झाले असून शेजारी राष्ट्रांशी भारताचे संबंध कसे बदलत आहेत हे पाहणे येथे महत्वपुर्ण ठरते. प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून भारताचे चीन, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि श्रीलंका या शेजारी देशांशी असलेल्या संबंधाचा आढावा घेण्यात आला आहे.

## २.३ चीन

चीन आणि भारत या आशिया खंडातील दोन प्रमुख प्रादेशिक शक्ती (Regional Powers) आहेत. सर्वाधिक लोकसंख्या आणि वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्था म्हणुन भारत आणि चीनकडे पाहिले जाते. भारत आणि चीन यांच्यातील संबंधांचा हजारो वर्षांच्या इतिहास पाहता उभय देशांतील संबंध शांततापूर्ण राहिले आहेत. प्राचीन काळापासून चीन आणि भारत यांच्यात सांस्कृतिक तसेच आर्थिक देवाणघेवाण होत आहे. भारत आणि चीनमधील व्यापारी संबंध विकसित होण्यासाठी व पूर्व आशियापर्यंत बौद्ध धर्माचा प्रसार होण्यात रेशीम मार्गाचे योगदान महत्वपुर्ण ठरले आहे. मध्ययुगात भारतातील चोल आणि पल्लव वंशांचा चीनशी असलेला संबंध विविध लेखांतून स्पष्ट होतो. मात्र आधुनिक काळात भारत-चीन संबंधांची

सुरुवात १९५० मध्ये झाली. स्वतंत्र भारताने पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाला (PRC) चीनचे कायदेशीर सरकार म्हणून मान्यता देत राजनयिक संबंध प्रस्थापित केले.

वर्तमान काळातील भारत आणि चीन यांच्यातील संबंध अभ्यासतांना उभय देशांतील सीमा विवादांना विशेष महत्त्व दिले जातांना दिसते. परंतू १९८० च्या उत्तरार्धापासून, दोन्ही देशांमध्ये राजनैतिक तसेच आर्थिक संबंधांची पुनर्बांधणी झाली असून २००८ मध्ये चीन भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार ठरला हेही लक्षात घेतले पाहिजे. अशावेळी भारत आणि चीन संबंधांचा सविस्तर परामर्श घेणे येथे गरजेचे आहे.

नवस्वतंत्र भारताने ०१ एप्रिल १९५० रोजी PRC सोबत राजनयिक संबंध प्रस्थापित केले. असे संबंध प्रस्थापित करणारा भारत हा आशियातील पहिले गैर-साम्यवादी/समाजवादी राष्ट्र होता. जून १९५४ मध्ये भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि प्रीमियर चाऊ एन लाई यांनी पंचशील (शांततापूर्ण सहअस्तित्वाची पाच तत्त्वे) धोरण हे आपल्या परराष्ट्र धोरणाचे मुलभूत तत्व असेल असे स्पष्ट केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुरवातीच्या काळात भारत-चीन संबंध हे परस्परबंधुभावावर आधारित होते. यातूनच, हिंदी-चीनी भाई- भाई यासारख्या घोषणा प्रचलित झाल्या. याकाळात सांस्कृतिक, राजकीय विचारांची देवाणघेवाण व्यापक प्रमाणात झालेली दिसते.

चीन आणि भारताने ऑक्टोबर १९५४ मध्ये तिबेट संदर्भात एक करार केला. या कराराद्वारे भारताने तिबेटला चीनचा भाग म्हणून मान्यता दिली होती. या करारावर स्वाक्षरी केल्यानंतर भारताने आपले भौगोलिक क्षेत्र स्पष्ट करणारे नकाशे प्रकाशित केले. भारताच्या सार्वभौम क्षेत्र दर्शवणाऱ्या या नकाशांचा हेतू चीनकडून भारतीय भूभागावर संभाव्य दावा फेटाळून लावणे हा होता. प्रत्यक्षात चीनने भारताच्या ईशान्येकडील आसाम आणि काश्मिरमधील अक्साई चीन या दोन भागांना आपल्या नकाशांना जोडत या भागात रस्ते बनवण्यास सुरवात केल्याने भारत-चीन संबंधात दोन मोठे प्रादेशिक वाद उभे झाले. यामुळे भारत-चीन यांच्यात सीमांवर चकमकी होऊ लागल्या. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, चीनने नेहमीच दोन्ही देशांतील सीमारेषा दर्शवणाऱ्या मॅकमोहन रेषेस ही अधिकृत सीमारेषा मानण्यास नकार दिला आहे.

आधी स्पष्ट केल्याप्रमाणे, चीन हा तिबेटला आपल्या भूभागाचा एक भाग मानत होता. मात्र चीनचे तिबेटवर नियंत्रण स्थापित झालेले नव्हते. भारताने तिबेटप्रश्नी चीनच्या कठोर भुमिकेवर टीका केली. त्यावर माओ झेडाँग यांनी भारताची तिबेटविषयी असणारी काळजी हा चीनच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप आहे असे म्हटले. दरम्यान चीनने तिबेटवर नियंत्रण मिळवण्यात यश मिळवले. यामुळे तिबेटमधील बौद्ध धर्मगुरु दलाई लामा यांनी हजारो निर्वासितांसह भारताकडे आश्रय मागितला. हे निर्वासित भारतातील धर्मशाळा याठिकाणी वास्तव्यास आले. भारताची ही कृती चीनसाठी आक्षेपार्ह ठरली.

भारत आणि चीन यांच्यातील अक्साई चीन भुभाग आणि आसाम सीमा विवाद तसेच तिबेट प्रश्नाची परिणती होऊन २० ऑक्टोबर १९६२ चीन आणि भारत यांच्यात युद्ध सुरु झाले. या युद्धात भारताला मोठा पराभव स्विकारावा लागला.  या युद्धानंतर भारत आणि चीन यांच्यातील संबंध बिघडले. दरम्यान आंतरराष्ट्रीय स्तरावर चीन-पाकिस्तान संबंध सुधारण्यास आणि चीन-सोव्हिएत संबंध बिघडण्यास सुरवात झाली. याचा परिणाम भारताला नंतरच्या काळात सोव्हियत रशियाच्या रुपात मित्र लाभला.

भारत- पाकिस्तान युद्ध (१९६५) आणि (१९७१) या संघर्षात चीनने भारतविरोधात पाकिस्तानला विशेष मदत पुरवली. यातून चीन आणि पाकिस्तान यांची युती उघड झाली. १९७७ मध्ये स्थापन झालेल्या जनता सरकारने भारताचे परराष्ट्र धोरण 'अस्सल अलिप्ततावादी' (Genuine Non-Alignment) बनवण्याचा आग्रह धरला. भारत-चीन संबंध सुधारावेत यादृष्टीने भारतीय पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी विशेष प्रयत्न केले. याचाच एक भाग म्हणुन १९७८ मध्ये, भारताचे तत्कालीन परराष्ट्र मंत्री अटलबिहारी वाजपेयी यांनी बीजिंगला ऐतिहासिक भेट दिली व १९७९ मध्ये दोन्ही देशांनी अधिकृतपणे राजनैतिक संबंध पुन्हा प्रस्थापित केले. यानंतर चीननेही काश्मीर प्रश्नाबाबत आपली भूमिका बदलली. यानंतर चीनच्या वतीने १९८१ मध्ये, चीनचे परराष्ट्र व्यवहार मंत्री, हुआंग हुआ यांनी नवी दिल्लीला ऐतिहासिक भेट दिली.

भारत आणि चीन यांच्यातील सीमाविवाद सोडवण्यासाठी डिसेंबर १९८१ ते नोव्हेंबर १९८७ या काळात सीमा वाटाघाटींच्या आठ फेऱ्या पार पाडल्या. अर्थात दोन्ही देशांदरम्यान केवळ आरोपांची देवाणघेवाण झाल्यामुळे या वाटाघाटीतून फारसे काही साध्य झाले नाही. यानंतर डिसेंबर १९८८ मध्ये राजीव गांधींनी चीनला भेटी दिल्यानंतर दोन्ही देशांतील संबंधात सकारात्मक बदल दिसून येऊ लागले. या भेटीदरम्यान राजीव गांधी यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञान सहकार्य, सांस्कृतिक देवाणघेवाण यावर द्विपक्षीय करारांवर स्वाक्षरी केली.

सीमाप्रश्नावर चर्चा करण्यासाठी डिसेंबर १९८८ ते जून १९९३ यादरम्यान सीमा मुद्द्यावर भारतीय-चीन संयुक्त कार्यगटाच्या चर्चेच्या सहा फेऱ्या झाल्या. या चर्चेच्या फेऱ्यांतून परस्पर सैन्य कपात, स्थानिक लष्करी कमांडरच्या नियमित बैठका आणि आगाऊ सूचना याद्वारे सीमेवरील तणाव यासारखे मुद्दे हाताळले गेले.

भारताने १९९८ मध्ये केलेल्या पोखरण आण्विक चाचण्यांनंतर भारत- चीन संबंध आणखी बिघडले. भारताच्या तत्कालीन संरक्षण मंत्र्यांनी चीनला भारताचा नंबर एकचा शत्रू संबोधले. याबाबत चीनने कमालीची चिंता व्यक्त केली. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील १९९९ च्या कारगिल युद्धादरम्यान चीनने पाकिस्तानला पाठिंबा दिला होता.

भारत- चीन संबंधातील सीमाविवादाच्या दृष्टीने महत्वाचे पाऊल २००३ मध्ये पडले जेव्हा चीनने अधिकृतपणे सिक्कीमवरील भारतीय सार्वभौमत्वाला मान्यता दिली. चीननेही दक्षिण आशियातील आपल्या प्रवेशासाठी प्रयत्न चालवले होते. त्यादृष्टीने २००५ मध्ये SAARC संघटनेने चीनला निरीक्षकाचा दर्जा देण्यात आला होता. याच वर्षी भारत आणि चीन यांनी 'शांतता आणि समृद्धीसाठी धोरणात्मक आणि सहकारी भागीदारी'वर स्वाक्षरी केली. भारत आणि चीन संबंधातील विकासाच्या दृष्टीने हा भागीदारी करार महत्वाचा मानला जातो. भारत आणि चीन यांच्यातील व्यापारी संबंध पुनरुज्जीवीत करण्याच्या दृष्टीने २००६ मध्ये नाथुला खिंड पुन्हा व्यापारासाठी खुली करण्यात आली.

भारत- चीन विवादात अरुणाचल प्रदेशवर चीनकडून वारंवार केला जाणारा दावा, दोकलाम संघर्ष, गलवान खोरे संघर्ष यांसारखे मुद्दे चिंतेचे विषय ठरले आहेत.

## २.४ पाकिस्तान आणि अफगाणिस्तान

### २.४.१ भारत-पाकिस्तान संबंध

शेजारी राष्ट्र असलेल्या पाकिस्तानसोबत भारताचे परराष्ट्र संबंध हे कायम चढ-उताराचे राहिले आहेत. परराष्ट्र संबंधातील हे चढ-उतार विविध ऐतिहासिक आणि राजकीय घटनांतून उत्पन्न झाले असल्याने त्यांचा स्वतंत्र परामर्श घेणे येथे गरजेचे वाटते.

भारत-पाकिस्तान संबंधाची व्याख्या करत असतांना भारत आणि पाकिस्तान यांना १९४७ मध्ये ब्रिटीश पारतंत्र्यातून मुक्तता मिळत असतांना झालेली हिंसक फाळणी, त्यातून नंतरच्या काळात चिघळलेला काश्मीर संघर्ष, बांग्लादेश निर्मिती, कारगिल युद्ध या मुद्यांना अधोरेखित केले जाते. परंतू या घटनांप्रमाणेच दोन्ही देशांतील सांस्कृतिक संबंध, क्रिडा स्पर्धांतून संबंधात होणारी सुधारणा यांकडे दुर्लक्ष करता येत नाही. भारत- पाकिस्तान यांच्यातील संबंधांचे चार प्रमुख टप्पे मानले जातात. यामध्ये [१] प्रत्यक्ष संघर्षाचा कालखंड (१९४७ ते २०००), [२] परस्पर समेटाचा कालखंड (२००१ ते २००८) [३] निष्क्रिय द्विपक्षीय संबंधांचा कालखंड (२००८ ते २०१५) आणि [४] संघर्षाच्या पुनरुज्जीवनाचा कालखंड (२०१५ ते २०१९).

ब्रिटीश साम्राज्यवादातून स्वातंत्र्य प्राप्त होत १४ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तान तर १५ ऑगस्ट रोजी भारत या दोन नवीन सार्वभौम राष्ट्रांची निर्मीती झाली. यातील भारत हे हिंदू बहुल लोकसंख्या आणि मुस्लिम अल्पसंख्याकांसह एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून उदयास आले. पाकिस्तानात मुस्लिमबहुल आणि हिंदू अल्पसंख्याकांसह प्रजासत्ताक निर्माण झाले. दोन्ही देशांच्या घटनासमित्यांनी आप-आपल्या देशातील लोकांना धार्मिक स्वातंत्र्याची हमी दिली होती. फाळणीनंतर धार्मिक अल्पसंख्याकांना ते ज्या राज्यात राहतात त्या राज्यातच राहणे अपेक्षित होते. लोकसंख्येचे वितरण हे काहीसे गुंतागुंतीचे होते. जसे की, अनेक हिंदू आणि शीख पश्चिमेकडे राहत होते तर बरेच मुस्लिम हे पूर्वेकडे राहत होते. फाळणीमुळे ही सर्व जनता नव्याने निर्मीत पाकिस्तान आणि भारतात अल्पसंख्याक ठरत होती. परिणामी व्यापक प्रमाणात लोक विस्थापित होऊ लागले आणि मोठ्या प्रमाणात जातीय हिंसाचार घडून आला.

दरम्यान दोन्ही देशांत सुदृढ परराष्ट्र संबंध निर्माण व्हावे यादृष्टीने स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेचच उभय देशांत राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्यात आले. परंतु, फाळणीप्रमाणेच जुनागढ तसेच काश्मीर संस्थानाचे विलीनीकरण यांमुळे भारत- पाकिस्तान संबंध अधिक बिघडले.

पाकिस्तानने ऑक्टोबर १९४७ मध्ये काश्मीर ताब्यात घेण्यासाठी *ऑपरेशन गुलमर्ग* घडवून आणले. काश्मीरवर आक्रमण केले. अशावेळी काश्मिरच्या रक्षणासाठी तेथील महाराज हरिसिंग यांनी भारताला मदत मागितली. भारताने आपले सैन्य काश्मिरमध्ये पाठवण्याआधी भारतात प्रवेश करण्याचा सल्ला दिला. त्यामुळे, आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन राजा हरिसिंग यांनी भारतीय संघराज्यात प्रवेश करण्याच्या करारावर स्वाक्षरी केली. २७ ऑक्टोबर १९४७ रोजी जम्मू आणि काश्मीर हे संस्थान भारताच्या अधिपत्याचा भाग बनले. यावेळी भारत आणि पाकिस्तान आणि यांच्यात काश्मीर प्रश्नावरुन तीव्र संघर्ष घडून आला.

अनेक आठवड्यांच्या तीव्र संघर्षानंतर युद्धविराम घोषित करण्यात आला. भारताने संयुक्त राष्ट्र लवादाकडे सार्वमत घेण्याची मागणी केली.

यानंतर एप्रिल ते सप्टेंबर १९६५ या कालावधीत पाकिस्तानने आपल्या ऑपरेशन जिब्राल्टरच्या माध्यमातून जम्मू आणि काश्मीरमध्ये सैन्य घुसखोरी घडवून आणली. या घुसखोरीद्वारे भारताच्या सरकारविरुद्ध बंडखोरीस चिथावणी देण्यात येणार होती. मात्र भारताने त्याला सडेतोड प्रत्युत्तर दिले. हे युद्ध तब्बल सतरा दिवस चालले. उभय देशांत युद्धविराम घोषित करण्यासाठी सोव्हिएत युनियन आणि अमेरिका यांनी हस्तक्षेप केला. सोव्हियत रशियाच्या यशस्वी मध्यस्थीतून भारत आणि पाकिस्तान यांच्यात १० जानेवारी १९६६ रोजी ताश्कंद करार घडवून आणण्यात आला. या करारावर भारताचे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री आणि पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष अयुब खान यांनी स्वाक्षरी केल्या.  या युद्धात पाकिस्तानला पराभव स्विकारावा लागला. शिवाय पाकिस्तानला जम्मु आणि काश्मीरमध्ये घुसखोरी करण्यात अपयश आले आणि आंतरराष्ट्रीय जनमतही पाकिस्तानविरोधात गेले.

वरील दोन युद्धांप्रमाणे भारत- पाकिस्तान यांच्या संबंधात १९७१ मधील बांग्लादेशनिर्मीती हे एक महत्वाचे पर्व मानले जाते. तत्कालीन पाकिस्तानचे भौगोलिक वैशिष्ट्य म्हणजे स्वातंत्र्यानंतर पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान या दोन भुभागांमध्ये पाकिस्तान विभागला गेला होता. या दोन्ही पाकिस्तानमध्ये सांस्कृतिकदृष्ट्या कमालीचे वैविध्य होते. यातील पूर्व पाकिस्तान हा बंगाली भाषिक लोकांचा प्रांत होता तर पश्चिम पाकिस्तान हा उर्दु भाषिकांचा. पुर्व पाकिस्तानवर प्रशासकिय नियंत्रण इस्लामाबादेतून ठेवण्यात आले होते. या पार्श्वभुमीवर पुर्व पाकिस्तानमध्ये इस्लामाबादविरोधात वारंवार आंदोलने घडून येत होती. १९७१ मध्ये पाकिस्तानी लष्करी कारवाई आणि बंगाली लोकांवरील नरसंहारानंतर पूर्व पाकिस्तानमधील परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. यादरम्यान, डिसेंबर १९७१ मध्ये भारताने पुर्व पाकिस्तानातील बंगाली लोकांच्या वतीने हस्तक्षेप केला. भारतीय सैन्य तसेच नौदलाने पूर्व पाकिस्तानवर आक्रमण केले. पूर्व पाकिस्तानच्या आक्रमणानंतर तब्बल १३ दिवसांनी पाकिस्तानी लष्करी जवानांनी भारतीय लष्करासमोर आत्मसमर्पण केले आणि पूर्व पाकिस्तान हे बांग्लादेश या नावाने स्वतंत्र राष्ट्र बनले. युद्ध संपताच भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्ष संपवून 'परस्परांच्या संबंधांना मारक ठरणाऱ्या तणावांना दूर करण्यासाठी' २ जूलै १९७२ रोजी शिमला करार करण्यात आला. या करारातून भारत- पाकिस्तान संबंध सामान्य स्थितीत येण्यास मदत झाली. करारावर भारतीय पंतप्रधान इंदिरा गांधी आणि पाकिस्तानचे पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांनी स्वाक्षऱ्या केल्या. शिमला कराराची दुसरी महत्वाची फलनिष्पत्ती म्हणजे जुलै १९७६ मध्ये सुरु करण्यात आलेली समझौता एक्सप्रेस (अमृतसर ते लाहोर).

दरम्यान भारत- चीन युद्ध (१९६२), भारत- पाकिस्तान युद्ध (१९६५), बांग्लादेश निर्मिती (१९७१) आणि चीनकडून  अण्वस्त्र चाचणी (१९६४) यामुळे भारताने आपल्या अणुकार्यक्रमास वेगवान करण्यास सुरवात केली होती. या अणुकार्यक्रमाचाच एक भाग म्हणजे १८ मे १९७४ रोजी राजस्थान मधील पोखरण येथे भारताने केलेली पहिली यशस्वी अण्वस्त्रचाचणी. या अणुचाचणीस भारताने 'शांततामय अणुविस्फोट' असे संबोधले. पाकिस्तानने या चाचण्यांना विरोध दर्शवला आणि उपखंडात भारताचे धुरिणत्व वाढवत असल्याचे मत मांडले.

११ आणि १३ मे १९९८ रोजी पोखरण-II अणुचाचणीद्वारे भारताने स्वतःला अण्वस्त्रसंपन्न राष्ट्र घोषित केले. भारताच्या या अणुचाचण्यांवर जगभरात संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या. पाकिस्तानने या चाचण्यांना दक्षिण आशियातील शस्त्रास्त्रस्पर्धेस चिथावणी असे संबोधले. प्रत्युत्तरादाखल मे १९९८ अखेरीस पाकिस्तानने अण्वस्त्रचाचण्या केल्या. या अण्वस्त्रचाचण्यांनंतर दक्षिण आशियातील वातावरण तणावाचे बनले होते. दोन्ही देशांतील परस्परांविषयी संशयाचे वातावरण आणि शस्त्रास्त्रस्पर्धा रोखण्यासाठी Confidence Building Measures (CBM) चा एक भाग म्हणुन २१ फेब्रुवारी १९९९ रोजी लाहोर करार संमत करण्यात आला. या कराराद्वारे अण्वस्त्रस्पर्धेस अटकाव करणारी पाऊले उचलण्यात आली. कराराच्या कागदांवर भारतीय पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरिफ यांनी स्वाक्षऱ्या केल्या. भारत पाकिस्तान यांच्यातील अण्वस्त्रस्पर्धा रोखणारा १९८८ च्या Non Nuclear Agression Agreement (NNAA) नंतर हा करार दुसरा महत्वाचा दस्तावेज मानला जातो. याशिवाय दोन्ही देशांत सौहार्द आणि मैत्रीपुर्ण संबंध वृद्धींगत होण्यासाठी दिल्ली-लाहोर बससेवा सुरु करण्यात आली. ही बससेवा २००१ च्या संसदेवरील दहशतवादी हल्ल्यानंतर थांबवण्यात आली.

१९७१ च्या युद्धानंतर भारत- पाकिस्तान यांच्यात घडून आलेली महत्वाची लढाई म्हणजे १९९९ मधील कारगिल संघर्ष होय. ११९८ च्या हिवाळ्यात पाकिस्तानी लष्कराने प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरून घुसखोरी करून कारगीलमधील चौक्यांवर कब्जा केला होता. भारतीय सैन्याला या घुसखोरीची जाणिव होताच भारतीय आणि पाकिस्तानी सैन्यांमध्ये तीव्र संघर्ष झाला. भारतीय सैन्याची ही कारवाई ऑपरेशन विजय या नावाने प्रसिद्ध आहे. या युद्धात भारतीय सैन्याचा विजय झाला तर पाकिस्तानने नंतर आंतरराष्ट्रीय दबाव आणि मोठ्या जीवितहानीमुळे उर्वरित भागातून माघार घेतली.

१९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धाचा अपवाद वगळता भारत पाकिस्तान यांच्यातील संघर्षांचा मुख्य केंद्रबिंदू हा कायम काश्मीर संघर्ष राहिला आहे. याशिवाय सिंधु नदीच्या पाणीवाटपाचा प्रश्न, काश्मिरमध्ये होणारी घुसखोरी, दहशतवादी हल्ले यांमुळेही हे संबंध तणावाचे राहिले आहेत. उभय देशांतील संबंध सुधारण्यासाठी शिमला परिषद (१९७२), आग्रा शिखर परिषद (२००१) आणि लाहोर शिखर परिषद (१९९९) यासारख्या मार्गांचा वारंवार अवलंब करण्यात आला आहे. परंतु १९८० नंतर सियाचीन संघर्ष, काश्मीरमध्ये बंडखोरांचा वाढता हस्तक्षेप, १९९८ मधील भारत आणि पाकिस्तान यांच्या अणुचाचण्या आणि कारगिल युद्धानंतर दोन्ही राष्ट्रांमधील संबंध अधिकच खट्टू झाले आहेत. वेळोवेळी होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यांमुळे Confidence Building Measures (CBM) च्या प्रयत्नांना अडथळे येत आहेत.

जानेवारी २००१ मध्ये झालेल्या गुजरात भुकंपानंतर पाकिस्तानकडून अहमदाबादला मदतची विमाने पाठवण्यात आली. डिसेंबर २००१ मध्ये झालेल्या भारतीय संसदेवर हल्ल्यामुळे भारत-पाकिस्तान संबंध पुन्हा चिघळले. २००८ मध्ये तुर्कमेनिस्तान, अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि भारत पाईपलाईन (TAPI) योजना मंजूर झाली. हा एक महत्वाकांक्षी प्रकल्प होता. त्याशिवाय भारत- पाकिस्तान यांच्यातील व्यापारी मार्ग सुरु करण्यात आले. परंतु भारतीय संसदेवर हल्ला (२००१), समझौता एक्सप्रेस बॉम्बस्फोट

(२००७), आणि पाकिस्तानी अतिरेक्यांनी केलेल्या मुंबई हल्ला (२००८) यांमुळे भारत-पाकिस्तान शांतता चर्चेत मोठी पिछेहाट झाली.

२०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांचे सरकार स्थापन झाल्यावर 'शेजारी प्रथम' (Neighbourhood First) . धोरणाचा पुनरुच्चार करण्यात आला. नरेंद्र मोदी यांनी आपल्या शपथविधीस पाकिस्तानच्या पंतप्रधानांना पाचारण केले. याकाळात मच्छिमारांची सुटका करणे व सांस्कृतिक देवाणघेवाण यांतून संबंध सुधारण्यास मदत झाली. परंतु २०१६ च्या पठाणकोट हल्ल्यानंतर द्विपक्षीय चर्चा पुन्हा थांबली. सतत चालू असलेला संघर्ष, दहशतवादी हल्ले यांमुळे द्विपक्षीय संबंध बिघडले आहेत. पठाणकोट हल्ला (२०१६), नागरोट हल्ला (२०१६), उरी हल्ला (२०१६) आणि अमरनाथ हल्ला (२०१७) यांच्यामुळे पाकिस्तानचा दहशतवादी गटास असणारा छुपा पाठिंबा स्पष्ट झाला. उरी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणुन भारताने सप्टेंबर २०१६ मध्ये सर्जिकल स्ट्राईक घडवून आणली आणि पाकिस्तानला देण्यात आलेला Most Favoured Nation (MFN) चा दर्जा काढून घेतला.

२०१९ मध्ये भारतीय लष्कराच्या सैन्य ताफ्यावर पुलवामा येथे आत्मघातकी हल्ला करण्यात आला. या हल्ल्यामागे जैश ए मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा हात होता. काही अहवालांनुसार, पाकिस्तानी लष्कर आणि आयएसआयने अल-कायदा संलग्न जैश-ए-मोहम्मदसह काश्मीरमध्ये सक्रिय असलेल्या दहशतवादी गटांना गुप्त पाठिंबा दिला आहे. पाकिस्तानने नेहमीच काश्मीरमधील दहशतवादी कारवायांमध्ये कोणत्याही प्रकारचा सहभाग नाकारला आहे.

भारतीय संसदेने ऑगस्ट २०१९ मध्ये जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना विधेयकाला मंजुरी दिली. या विधेयकामुळे जम्मू आणि काश्मीरचा विशेष दर्जा रद्द करण्यात येऊन त्याची पुनर्रचना करण्यात आली. यावर पाकिस्तानने व्यापारी तसेच सांस्कृतिक संबंधांवर बंधने टाकली.

### २.४.२ भारत- अफगाणिस्तान संबंध

भारताच्या शेजारी असणारा दुसरा महत्वपुर्ण देश म्हणजे अफगाणिस्तान होय. अफगाणिस्तान आणि भारतातील लोकांमधील संबंध सिंधू संस्कृतीशी संबंधित आहेत. अलेक्झांडरचे आक्रमण, मौर्य शासकांनी भारतातून बौद्ध धर्माचा केलेला प्रसार यांतून भारत अफगाणिस्तानचा वारंवार उल्लेख होतो. मौर्यांनी हिंदुकुशच्या दक्षिणेकडील भागावर नियंत्रण नियंत्रण प्रस्थापित केले होते. ७व्या शतकातील इस्लामच्या आगमनापर्यंत अफगाणिस्तानचा बराचसा भाग बौद्ध, हिंदू आणि झोरोस्ट्रियन संस्कृतींनी प्रभावित होता. वसाहतिक कालखंडात ब्रिटिश भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात दोन अँग्लो-अफगाण युद्धे झाली. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातही अफगाणींचे भारतीयांना सहकार्य लाभले, यामध्ये सरहद्द गांधी या टोपणनावाने प्रसिद्ध असणाऱ्या खान अब्दुल गफ्फार खान यांचे योगदान उल्लेखनिय आहे.

भारताला स्वातंत्र्य प्राप्त होताच भारताने अफगाणिस्तानशी १९४९ मध्ये राजनयिक संबंध स्थापित केले. १९५०-६० च्या दशकात भारताने अफगाणिस्तानशी आपली राजनैतिक जवळीक वाढवली. यातील महत्वाचा टप्पा म्हणजे जानेवारी १९५० मध्ये भारत-

अफगाणिस्तान मैत्री करार होय. या दोन्ही राष्ट्रांत परस्पर सौहार्द टिकावे आणि चिरंतन शांती प्रस्थापित हा या कराराचा उद्देश होता.

स्वातंत्र्यपुर्व काळात भारत- अफगाणिस्तान संबंधांना जोडणारा महत्वाचा धागा उभय देशांतील ड्युरांड सिमारेषा होती. मात्र, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाची फाळणी झाल्याने ही सीमारेषा पाकिस्तानला जोडल्या गेली. त्यामुळे भारत- अफगाणिस्तान संबंधांत नंतरच्या काळात गोठलेला कालखंड आला (Frozen Period). यानंतर १९७९ मध्ये सोव्हियत रशियाच्या अफगाणिस्तानमधील हस्तक्षेपानंतर तेथे मोहम्मद नजिबुल्लाह यांच्या नेतृत्वाखाली लोकशाही सरकार स्थापन झाले. अफगाणिस्तानमध्ये लोकशाही टिकून राहणे हे भारताच्या नेहमीच हिताचे राहिले. त्यामुळे, भारत सरकारने अफगाणिस्तानच्या लोकशाही सरकारला शेवटपर्यंत आपला पाठिंबा दर्शवला. १९७९ नंतर शितयुद्धात महत्वपुर्ण स्थित्यंतरे घडून येत होती. विशेषतः सोव्हियत रशियाने अफगाणिस्तानमधुन आपले सैन्य काढून घेताच तेथे तालिबान या स्थानिक इस्लामिक गटाने आपला कब्जा प्राप्त केला. अशावेळी भारताने तालिबानपुरस्कृत सरकारला पाठिंबा देण्यास नकार दिला. तालिबानने सत्ता हस्तगत करताच मोहम्मद नजिबुल्लाह व त्यांच्या कुटूंबाने भारतात पलायन करण्याचा प्रयत्न केला. यात मोहम्मद नजिबुल्लाह यांचा मृत्यू झाला मात्र त्यांचे कुटूंब भारतात यशस्वीपणे पोहचले.

डिसेंबर १९९९ मध्ये इंडियन एयरलाईन्सच्या IC-814 या विमानाचे पाकिस्तानच्या ISI पुरस्कृत दहशतवाद्यांनी अपहरण केले. हे विमान अफगाणिस्तानमधील कंदाहर विमानतळावर ठेवण्यात आले. या अपहरणात तालिबान या संघटनेचा हात असल्याचे उघड झाले होते.

यानंतर ११ सप्टेंबर २००१ मध्ये अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिकेने अफगाणिस्तानमधील तालिबानी राजवट संपुष्टात आणण्यासाठी ऑपरेशन एन्ड्युरींग फ्रिडम राबवले. अमेरिकेने दहशतवादाविरुद्ध उघडलेल्या या मोहिमेसाठी भारताने आपला पाठिंबा दर्शवत गुप्तचर यंत्रणेकडून महत्वाची माहिती पुरवली.

अमेरिकेच्या लष्करी कारवाईनंतर अफगाणिस्तानातील तालिबानी राजवट संपुष्टात आली आणि हमिद करझाई यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार स्थापन करण्यात आले. या सरकारला भारत सरकारने आपला पाठिंबा दर्शवला. प्रदिर्घ युद्ध आणि दुष्काळ यावर मात करण्यासाठी भारताने अफगाणिस्तानला मानवतावादी मदत पुरवली. भारत हा २००१ नंतर अफगाणिस्तानला क्षेत्रातील सर्वात मोठा देश ठरला आहे. भारताने पायाभूत सुविधा जसे की, शाळा, दवाखाने, रस्ते निर्माण करण्यासाठी महत्वाचे योगदान दिले आहे. अफगाणिस्तानमध्ये भारतीय उद्योजकांनी उर्जानिर्मीती, विमानतळउभारणी यासारख्या क्षेत्रात गुंतवणुक केली आहे. अफगाणिस्तानचे पाकिस्तानवरील अवलंबन कमी व्हावे यादृष्टीने भारताने महत्वाची पाऊले उचलली आहेत.

अफगाणिस्तानला सार्क (SAARC) संघटनेचे सदस्यत्व मिळावा यासाठी भारताने विशेष आग्रह धरला. यामुळे २००७ मध्ये अफगाणिस्तान हा सार्क संघटनेचा आठवा सदस्य देश बनला.

जुलै २००८ मध्ये अफगाणिस्तानमधील भारतीय दुतावासावर आत्मघातकी बाँबहल्ला घडून आला. या हल्ल्यामागे पाकिस्तानी गुप्तहेर संघटना ISI चा हात असल्याचे स्पष्ट झाले. या हल्ल्याची अफगाणिस्तानने कठोर शब्दांत निंदा केली. यानंतर आक्टोबर २००९ मध्ये भारतीय दुतावासावर आत्मघातकी बाँबहल्ला झाला. मे २०१४ मध्ये हेरात येथील भारताच्या वकिलातीवर हल्ला झाला. या घटनांनंतरही भारताने अफगाणिस्तानच्या विकासकामांत आपले योगदान कायम राहिल असे स्पष्ट केले.

२०११ मध्ये भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात पहिला सामरिक भागीदारी करार करण्यात आला. अफगाणिस्तानच्या सुरक्षायंत्रणेस अधिक भक्कम करण्याकरीता करण्यात आलेल्या या कराराचे उद्दिष्ट कोणत्याही देशाविरुद्ध (विशेषतः पाकिस्तान) सैन्यसज्जता नाही हे सुरवातीलाच स्पष्ट करण्यात आले.

२०१४ नंतर भारतात नरेंद्र मोदी यांचे सरकार स्थापन झाल्यानंतर भारत- अफगाणिस्तान संबंध झपाट्याने विकसीत होत आहेत. भारताकडून अफगाणिस्तानला तेथील संसद उभारण्यासाठी आर्थिक व तांत्रिक सहकार्य पुरवण्यात आले. याशिवाय सलमा धरण उभारणीमध्ये भारताचे योगदान महत्वपुर्ण आहे.

२०२१ मध्ये अफगाणिस्तानमधील सरकारचा पाडाव होऊन पुनश्च तालिबानपुरस्कृत सरकार स्थापन झाले आहे. या सत्तांतरानंतर भारताने तेथे अडकलेल्या आपल्या नागरिकांना सोडवण्यासाठी विशेष ऑपरेशन राबवले. ऑगस्ट २०२१ नंतर भारताने आपल्या राजदूतांना परत बोलावून घेतले असून तेथील राजनयिक संबंध संपुष्टात आले आहेत.

## २.५ श्रीलंका

श्रीलंका हा भारताचा सर्वात निकट सागरी राष्ट्र आहे. गेल्या दशकात भारत- श्रीलंका राजकीय संबंध झपाट्याने वृद्धिंगत होत असून आर्थिक तसेच व्यापारी संबंधात महत्वपुर्ण प्रगती होत आहे. याशिवाय संरक्षणक्षेत्रातही भारत- श्रीलंका यांच्यात सहकार्याचे महत्वाची पाऊले उचलली जात आहेत. भारत आणि श्रीलंका भारतीय उपखंड आणि हिंद महासागरक्षेत्रात भु-राजकियदृष्ट्या महत्वाचे स्थान बाळगून आहेत. राष्ट्रकुल, सार्क आणि बिम्स्टेकसारख्या संघटनांमध्ये भारत आणि श्रीलंका एकत्र व्यासपिठ बाळगतात. भारत आणि श्रीलंका या दोन्ही देशांमध्ये सांस्कृतिक संबंधांचा प्रदीर्घ इतिहास आहे.

भारतीय मौर्य सम्राट अशोक याने बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी महेंद्र आणि संघमित्रा या आपल्या मुलांना श्रीलंकेत पाठवले. जगभरातील बौद्ध धर्माच्या विस्ताराकडे पाहता श्रीलंकेमधील बौद्ध परंपरेस सर्वात मोठा अखंड इतिहास आहे.

भारतीय उपखंडातील सर्वात मोठे राष्ट्र असलेल्या भारताला स्वातंत्र्य मिळताच शेजारी राष्ट्रांत भारताविषयी संशय/ भयाचे वातावरण निर्माण होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे होते. शितयुद्ध कालखंडात जग दोन गटांत एकीकडे विभागले जात असतांना भारतासारखे मोठे राष्ट्र शेजारी राष्ट्रांवर दबाव निर्माण करु शकते ही भावना श्रीलंकासारख्या शेजारी राष्ट्रांत होती. नेहरुंनी यासाठी सावध आशावादी दृष्टीकोन (Cautious Optimist

Approach) स्विकारला. नेहरुंच्या या दृष्टीकोनामुळेच श्रीलंकेने १९५६ मध्ये भारताच्या अलिप्ततावादी धोरणाचे कौतुक करत हे धोरण स्विकारले. श्रीलंकेचे तत्कालिन राष्ट्राध्यक्ष सॉलोमन बंदरनायके यांनी नेहरुंच्या तटस्थतेच्या धोरणाचा अंगिकार करीत जागतिक राजकारणात श्रीलंकेला एक वेगळे वलय मिळवून दिले.

सॉलोमन बंदरनायके आणि पं.जवाहरलाल नेहरु यांच्यातील मैत्री नंतर सिरीमोओ बंदरनायके आणि इंदिरा गांधी यांच्या काळातही टिकून राहिली. त्यामुळे १९७० पर्यंत भारत –श्रीलंका संबंधांत राजनयिक देवाणघेवाणीपेक्षा उच्चस्तरीय चर्चांना विशेष महत्त्व प्राप्त झाले होते.

भारत आणि श्रीलंका यांच्यातील संबंधात मूळ भारतीय वंशाच्या तामिळ नागरिकांचा आणि सागरी सीमांची आखणी या दोन मुद्द्यांवर कायम तणाव राहिला आहे. श्रीलंकेत गेलेल्या तामिळ शेतमजूरांच्या मुलांना राज्यविहिन स्थितीत निराश्रीतांसारखे जगावे लागत आहे. वेळोवेळी या कामगारांना राजकीय हक्क मिळावे यासाठी दोन्ही देशांकडून प्रयत्न झाले असले तरीही हा प्रश्न समाधानकारकरित्या सुटलेला नाही. भारत आणि श्रीलंका यांच्यात सागरी सीमा पाल्कच्या सामुद्रधुनीद्वारे निश्चित झाली आहे. १९७० मध्ये सागरी सीमासंबंधी विवाद सोडवण्यात आला. परंतू भारतीय मच्छिमार अनेकदा चांगल्या प्रकारचे मासे मिळवण्यासाठी सागरी सीमा ओलांडतात. त्यामुळे भारतीय मच्छिमारांना श्रीलंकेकडून कैद केले जाते.

श्रीलंकेतील तामिळ आणि सिंहली वंशाच्या लोकांमध्ये १९७०-८० च्या दशकात यादवी युद्ध सुरु झाले. तामिळ लोकांचे मोठ्या प्रमाणावर शिरकाण होऊ लागल्याने तसेच निर्वासितांचे लोंढे भारतात येऊ लागल्याने १९८७ मध्ये भारताने प्रथमच संघर्षात थेट हस्तक्षेप केला. यानंतर भारत आणि श्रीलंकेने तमिळ अतिरेकी गटांना शस्त्रे खाली ठेवण्याचे आवाहन केले. भारताने नि:शस्त्रीकरणाची अंमलबजावणी करण्यासाठी एक शांती सैन्य दल (Indian Peace Keeping Forces-IPKF) श्रीलंकेत पाठवले.

श्रीलंका आणि भारत सरकार यांच्यात करार झाला. बहुतेक तमिळ अतिरेकी गटांनी हा करार स्वीकारला याला अपवाद म्हणजे LTTE (Liberation Tigers of Tamil Eelam) . LTTE ने हा करार नाकारत त्यांची शस्त्रे IPKF ला देण्यास नकार दिला. यामुळे हा संघर्ष भारतीय सैन्य विरुद्ध LTTE असा झाला. त्यानंतर भारत सरकारने IPKF च्या माध्यमातून LTTE ला बळाने नि:शस्त्र करण्याचा निर्णय घेत LTTE वर अनेक हल्ले सुरू केले. LTTE सोबतच्या युद्धादरम्यान, IPKF ने नागरिकांविरुद्ध मानवी हक्कांचे उल्लंघन केल्याचा आरोपही करण्यात आला होता. भारत-श्रीलंका करारातून श्रीलंकेत जनआंदोलने होऊ लागली. श्रीलंकेने IPKF मागे घेण्याची मागणी केली. दरम्यान २१ मे १९९१ रोजी राजीव गांधी यांची LTTE बंडखोरांकडून हत्या करण्यात आली. भारताने १९९२ मध्ये LTTE ला दहशतवादी संघटना घोषित केले. १९९० च्या दशकात भारत- श्रीलंका यांच्यातील द्विपक्षीय संबंध सुधारले आणि भारताने शांतता प्रक्रियेला पाठिंबा दिला. श्रीलंकेतील गृहयुद्ध आणि युद्धादरम्यान भारताचा हस्तक्षेप यामुळे गेल्या काही काळात श्रीलंका चीनच्या जवळ गेला आहे. विशेषत: नौदल करारांच्या बाबतीत. उभय देशांतील संबंध सुधारण्यासाठी २०१५ मध्ये भारताने श्रीलंकेसोबत अणुऊर्जा करार केला.

भारत- श्रीलंका यांच्यातील आर्थिक संबंध १९९० नंतर वाढत असल्याचे दिसते. भारत हा श्रीलंकेतील तिसरा सर्वात मोठा गुंतवणूकदार देश असून देशात १५ टक्के उत्पादनांची आयात श्रीलंकेतून होते. भारत आणि श्रीलंका हे SAARC, BIMSTEC संघटनांच्या माध्यमातून सांस्कृतिक आणि व्यावसायिक संबंध वाढवण्यासाठी काम करत आहेत. भारत

आणि श्रीलंका हे दोन्ही देश दक्षिण आशिया मुक्त व्यापार करारावर (SAFTA) स्वाक्षरी करणारे आहेत. मजबूत व्यावसायिक संबंध निर्माण करण्यासाठी आणि विविध उद्योगांमध्ये कॉर्पोरेट गुंतवणूक आणि उपक्रम वाढवण्यासाठी मुक्त व्यापार कराराचा विस्तार करण्यासाठी दोन्ही देशांत वाटाघाटी सुरू आहेत. भारताच्या वतीने नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन (NTPC) सामपूरमध्ये ५०० मेगावॅटचा औष्णिक ऊर्जा प्रकल्प बांधत आहे.

श्रीलंकेच्या सागरी सीमाक्षेत्रात भटकणाऱ्या भारतीय मच्छिमारांशी संबंधित समस्या हाताळण्यासाठी तसेच त्यांच्याविरुद्ध बळाचा वापर रोखण्यासाठी कार्यपद्धती तयार करण्यासाठी एक संयुक्त कार्य गट (JWG) स्थापन करण्यात आला आहे. भारत श्रीलंकेतील विकासाच्या अनेक क्षेत्रात सक्रिय आहे. भारताने दिलेल्या एकूण विकास कर्जापैकी सुमारे एक षष्ठांश कर्ज श्रीलंकेला उपलब्ध करून दिले जाते.

## २.६ समारोप

भारतीय उपखंडात भारत हा प्रमुख कारक घटक आहे. उपखंडातील अंतर्गत स्थिरता, लोकशाही आणि परस्परविश्वास टिकून राहण्यासाठी भारत नेहमीच प्रयत्न करतांना दिसतो. भारताचे चीन, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि श्रीलंका या देशांशी असलेले संबंध १९९० नंतर प्रचंड प्रमाणात बदलले आहेत. भारतीय परराष्ट्र धोरणाचा आकृतिबंध कायम असूनही त्यात महत्वाचे बदल झाले आहेत. भारताने शेजारी प्रथम (Neighbourhood First) सारख्या धोरणाचा अंगिकार करीत शेजारी राष्ट्रांशी संबंध सुधारण्यास आपली प्राथमिकता असेल हे स्पष्ट केले आहे.

## २.७ सरावासाठी प्रश्न

- भारत- चीन संबंधातील प्रमुख मुद्द्यांची सविस्तर चर्चा करा.
- भारत आणि पाकिस्तान यांच्यात परस्परसमीट व संघर्षासाठी कारणीभूत घटकांची चर्चा करा
- टिपा लिहा
    - भारत- अफगाणिस्तान संबंध
    - भारत-श्रीलंका संबंध

## २.८ संदर्भ

- N. Manoharan (2011) Brothers, Not Friends: India–Sri Lanka Relations South Asian Survey 18(2) 225–238
- Harsh V. Pant (2010) India in Afghanistan: a test case for a rising power, Contemporary South Asia, 18:2, 133-153
- India's Foreign Policy: Retrospect and Prospect. (2012). India: OUP India.

❄❄❄❄❄❄❄

# ३

# भारत आणि त्याचे शेजारी-२

# India and its Neighbours-२

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय विवेचन

३.३.१ भारत-बांगलादेश संबंध

३.३.१.१ बांगलादेशाची निर्मिती व भारत

३.३.१.२ भारत-बांगलादेश संबंध

३.३.१.३ भारत-बांगलादेश मधील प्रमुख समस्या

३.३.१.३.१ भारत-बांगलादेश सीमावाद

३.३.१.३.२ नदी पाणी वाटप आणि फराक्का धरण समस्या

३.३.१.३.३ मूर बेटाची समस्या

३.३.१.३.४ निर्वासितांची समस्या

३.३.१.४ बांगलादेशातील धार्मिक मूलतत्त्ववाद आणि भारत-बांगलादेश संबंध

३.३.१.५ भारत-बांगलादेश व्हिसा आणि गुन्हेगार हस्तांतरण करार

३.३.२ भारत-नेपाळ संबंध

३.३.२.१ भारत-नेपाळ संबंध

३.३.२.२ भारत-नेपाळ परस्परसंबंधाचे नवीन पर्व

३.३.२.२.१ भारत-नेपाळ जलविद्युत करार

३.३.२.३ नेपाळमधील माओवादी चळवळ आणि भारत-नेपाळ संबंध

३.३.२.४ नेपाळमधील लोकशाही आणि भारत-नेपाळ संबंध

३.३.२.५ भारत-नेपाळ संबंधांतील समस्या

३.३.३ भारत-भूतान संबंध

३.३.३.१ भारत-भूतान मैत्री करार

३.३.३.२ भूतानमधील पंचवार्षिक योजना आणि भारत-भूतान संबंध

३.३.३.३ भारत-भूतान जलविद्युत करार आणि भारत-भूतान संबंध

३.३.४. भारत-म्यानमार (ब्रह्मदेश) संबंध

३.३.४.१ भारत-म्यानमार संबंध

३.३.४.२ भारताची म्यानमारला मदत आणि भारत-म्यानमार संबंध

## ३.१ उद्दिष्टे

भारत आणि शेजारील राष्ट्रे या घटकाच्या अभ्यासातून आपणास पुढील उद्दिष्ट साध्य करता येतील;

१) भारताचा शेजारील राष्ट्रांशी असणाऱ्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे.

२) भारताचे शेजारील राष्ट्रांशी विविध क्षेत्राशी संबंधित प्रस्थापित झालेले परस्पर संबंध अभ्यासणे.

३) भारत आणि शेजारील राष्ट्रांमधील संबंधाच्या विकास प्रक्रियेत येणाऱ्या समस्या किंवा अडथळ्यांचा आढावा घेणे.

४) भारताच्या शेजारील राष्ट्रांशी असणाऱ्या विविध कालावधीतील परस्पर संबंधाच्या चढ-उताराची माहिती देणे.

५) भारताने शेजारील राष्ट्रांच्या विकासात बजावलेली भूमिका समजावून सांगणे.

६) भारताने शेजारील देशांशी केलेल्या विविध करांची माहिती करून घेणे.

## ३.२ प्रास्ताविक:-

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये राष्ट्रा-राष्ट्रातील परस्परसंबंधांना महत्त्वपूर्ण स्थान असते. आंतरराष्ट्रीय राजकारणातील परस्परसंबंधांमध्ये शेजारील देशांशी असणारे संबंध अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जातात. कारण कोणत्याही देशाच्या अंतर्गत परिस्थितीवर त्याचप्रमाणे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सुरक्षिततेवर शेजारील देशांच्या एकूणच परिस्थितीचा परिणाम होत असतो. म्हणून शेजारील देशांशी असणारे संबंध मैत्री व सहकार्याचे असणे अत्यंत आवश्यक असते. भारताने स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच आपल्या शेजारील देशांशी मित्रत्वाचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारतीय उपखंडातील तसेच दक्षिण आशियाई राष्ट्रांशी सलोख्याचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित करून भारताच्या तसेच शेजारील देशाच्या विकासामध्ये भारताने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडलेली आहे.

भारताने शेजारील देशांशी संबंध प्रस्तापित करण्यासाठी शेजारील देशांना मदत करून त्यांच्याशी मैत्री व सहकार्याबाबत विविध करार करून भारतीय उपखंडात तसेच दक्षिण आशियाई देशांमध्ये मोठ्या भावाची भूमिका पार पाडलेली आहे. प्रस्तुत घटकामध्ये भारताचे शेजारील राष्ट्र विशेषतः बांगलादेश, नेपाळ, भूतान आणि म्यानमार यांच्याशी असणाऱ्या संबंधांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

## ३.३ विषय विवेचन:-

भारताने शेजारील देशांशी मित्रत्वाचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. यामध्ये विशेषतः भारतीय उपखंड व दक्षिण आशियाई राष्ट्रांशी भारताने सलोख्याचे संबंध निर्माण करण्यात महत्वाची भूमिका पार पाडलेली आहे. यामध्ये बांगलादेश, नेपाळ, भूतान आणि म्यानमार या शेजारील राष्ट्रांशी भारताने मैत्री व शांतता करार करून सहकार्याचे संबंध प्रस्थापित केलेले आहेत, मात्र असे असले तरी शेजारील देशांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्यामध्ये उभयतांमधील विविध वादग्रस्त प्रश्न वा समस्यांमुळे अडथळे निर्माण झालेले आहेत. म्हणून असे वादग्रस्त प्रश्न व समस्या सोडविण्यासाठीदेखील भारताने प्रयत्न केलेले आहेत, मात्र असे करूनदेखील भारताचे शेजारील देशांशी परिस्थितीनुसार कधी मित्रत्वाचे, तर कधी तणावपूर्ण संबंध राहिलेले आहेत.

भारताचे बांगलादेशाशी परराष्ट्रसंबंध अगदी बांगलादेशाच्या निर्मितीपासूनच प्रस्थापित झालेले आहेत. भारत-बांगलादेशातील राज्यकर्त्यांच्या धोरणानुसार विविध कालखंडात भारत-बांगलादेश संबंधाची वाटचाल संमिश्रपणे झालेली आहे. त्यामुळे भारत-बांगलादेश संबंध कधी मित्रत्वाचे, तर कधी तणावपूर्ण राहिलेले दिसून येतात. भारत-बांगलादेशातील परस्परसंबंधात सीमारेषा वाद, नदी पाणी वाटप वाद, निर्वासितांची समस्या, मूर बेटाची समस्या तसेच बांगलादेशातील धार्मिक मूलतत्त्ववाद हे प्रमुख अडथळा ठरलेले आहेत.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच भारत-नेपाळ यांच्यात परस्पर मैत्री व सहकार्याने परराष्ट्र संबंधाला प्रारंभ झाला. भारत-नेपाळ परस्पर संबंधांना मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला असला, तरीदेखील भारत-नेपाळ यांच्यातील परस्परसंबंध सतत मित्रत्वाचे वा तणावपूर्ण राहिलेले नाहीत, तर परिस्थितीनुसार हे संबंध प्रस्थापित झालेले आहेत. भारत-नेपाळ यांच्या परस्पर संबंधातून भारत-नेपाळ यांच्यातील मुक्त सीमारेषा, भारत-नेपाळ यांच्यात १९५० मध्ये झालेला मैत्री करार, नदी पाणी वाटप वाद इत्यादी विवाद अडथळा ठरलेले आहेत. प्रारंभीच्या काळात भारताने नेपाळला गृहीत धरून नेपाळकडे दुर्लक्ष केल्यामुळे याकाळात नेपाळची चीन या देशाशी जवळीक वाढलेली होती. भारताविषयी नेपाळच्या राज्यकर्त्यांना असलेला अविश्वासदेखील भारत-नेपाळ संबंधात अडथळा ठरलेला आहे. नेपाळमध्ये लोकशाही प्रस्थापित करण्यावरूनदेखील भारत-नेपाळ यांच्यात संघर्ष निर्माण झाला होता. तसेच नेपाळमधील वाढत्या माओवादी चळवळीचादेखील भारत-नेपाळ संबंधावर परिणाम झालेला आहे, मात्र असे असले तरी भारत-नेपाळ यांच्यात अलीकडील काळात जे विविध करार झालेले आहेत, त्यामुळे उभय राष्ट्रात नवीन पर्वाला प्रारंभ झालेला आहे.

भारत-भूतान यांच्यातील परस्पर संबंधाला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. भारत-भूतान यांच्यात शेजारील राष्ट्र म्हणून मैत्री करार झालेला आहे. भूतानमधील विविध पंचवार्षिक योजनांना भारताने आर्थिक मदत करून भूतानच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. भूतानमधील जलविद्युत निर्मितीची क्षमता अधिक विकसित करण्यासाठी भारत-भूतान यांच्यात जलविद्युत करार करण्यात आलेला आहे. त्यामुळे भारत-भूतान संबंधात सहकार्य वाढत आहे.

भारत-म्यानमार यांच्यातील परस्पर संबंधांना उभय देशांना ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रारंभ झाला. वास्तविक पाहता म्यानमार हा देश इतर देशांशी संबंध प्रस्थापित करण्यास फारसा उत्सुक देश नाही, मात्र शेजारील देश म्हणून भारत-म्यानमार यांच्यात परस्पर संबंध प्रस्थापित झालेले आहेत. भारताने संकटकाळात म्यानमारला अनेकवेळा मदत केलेली आहे. म्यानमारमधील रस्ते, रेल्वे व बंदरांचा विकास करण्यासाठीदेखील भारताने म्यानमारला शेजारील देश म्हणून भरीव मदत केलेली आहे. थोडक्यात भारताने शेजारील देशांशी मित्रत्वाचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित करण्याचे धोरण ठेवलेले आहे, परंतु विविध वादग्रस्त मुद्द्यांमुळे काहीवेळा भारताच्या शेजारील देशांशी असलेल्या संबंधात तणाव निर्माण झालेला आहे. प्रस्तुत घटकांमध्ये भारताच्या शेजारील बांगलादेश, नेपाळ, भूतान व म्यानमार या देशांशी असणाऱ्या परस्पर संबंधावर प्रकाश टाकलेला आहे.

### ३.३.१ **भारत-बांगलादेश संबंध:-**

#### ३.३.१.१ **बांगलादेशाची निर्मिती व भारत:-**

१६ डिसेंबर १९७१ रोजी जगाच्या नकाशात बांगलादेश हे एक स्वतंत्र राष्ट्र अस्तित्वात आले. त्यापूर्वी बांगलादेश हा भाग पाकिस्तानचा अविभाज्य भाग होता. भौगोलिक दृष्ट्या पाकिस्तानची विभागणी पश्चिम पाकिस्तान व पूर्व पाकिस्तान अशी होत होती. पश्चिम व पूर्व पाकिस्तान या क्षेत्रातील भौगोलिक अंतरामध्ये भारतासारखा खंडप्राय देश होता. त्यामुळे पर्यायाने पश्चिम पाकिस्तानमधून पूर्व पाकिस्तानचा राज्यकारभार करणे कठीण झाले होते. पश्चिम व पूर्व पाकिस्तान यांच्यामध्ये इस्लाम धर्म हा एक समान घटक वगळला तर बाकी इतर कोणतेही घटक समान नव्हते. थोडक्यात पश्चिम व पूर्व पाकिस्तान यांच्यामध्ये प्रचंड विषमता होती. पश्चिम पाकिस्तानचे पूर्व पाकिस्तानविषयीचे धोरण पूर्णपणे विषमता आणि भेदभाव यावर आधारित होते, तसेच अगदी पाकिस्तानच्या निर्मितीपासूनच पश्चिम पाकिस्तानकडून पूर्व पाकिस्तानला अपमानास्पद वागणूक दिली जात होती. याशिवाय पूर्व पाकिस्तानला कोणत्याही प्रकारचे अधिकार न देता पश्चिम पाकिस्तानकडून पूर्व पाकिस्तानचे विविध प्रकारचे शोषण मोठ्या प्रमाणावर केले जात होते. पर्यायाने पूर्व पाकिस्तानने अगदी पाकिस्तानच्या निर्मितीपासूनच म्हणजे १९४७ पासूनच पश्चिम पाकिस्तानकडून पूर्व पाकिस्तानवर होणाऱ्या अन्यायी धोरणाविरोधात संघर्ष करण्यास सुरुवात केलेली होती. याचाच एक भाग म्हणून १९५७ मध्ये पूर्व पाकिस्तानच्या विधानसभेने पूर्ण स्वायत्ततेची मागणी केली होती, परंतु पूर्व पाकिस्तानची ही मागणी पश्चिम पाकिस्तानने स्वीकारली नव्हती. पूर्व पाकिस्तानमधील अवामी  लीग ही संघटना आणि ह्या संघटनेचे नेते शेख मुजीब यांनी पूर्ण स्वायत्ततेच्या मागणीचे जोरदार समर्थन केले होते. अशा पार्श्वभूमीवर १९७0 मध्ये पूर्व पाकिस्तानात झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये शेख मुजीब यांच्या नेतृत्वातील अवामी लीग संघटनेला बहुमत प्राप्त झाले होते, परंतु असे असतानाही पाकिस्तानचे लष्करशहा याह्याखान यांनी अवामी लीगच्या हाती सत्ता देण्यास नकार दिला. याउलट याह्याखान यांनी शेख मुजीब यांना अटक केली. यामुळे पूर्व पाकिस्तानात पश्चिम पाकिस्तानच्या विरोधात देशव्यापी सविनय कायदेभंग चळवळ सुरू झाली. ही चळवळ दडपून टाकण्यासाठी पाकिस्तानी लष्कराने दडपशाहीच्या मार्गाचा अवलंब केला. लष्कराच्या दडपशाहीला हिंसक वळण प्राप्त झाले. अस्थिर आणि हिंसक परिस्थितीमुळे पूर्व पाकिस्तानमधून निर्वासित लोकांचे प्रचंड लोंढे भारतामध्ये स्थलांतर होण्यास सुरुवात झाली. पूर्व पाकिस्तानातून भारतात होणारे स्थलांतर, ही भारतासाठी गंभीर आणि चिंतेची बाब होती. पूर्व पाकिस्तानमधील स्वातंत्र्यलढ्यास भारताचे समर्थन होते. त्यासाठी भारताकडून पूर्व पाकिस्तानचा प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडण्यासाठी काही प्रयत्नही झाले. पूर्व पाकिस्तानचा प्रश्न शांततेच्या मार्गाने सुटावा यासाठी त्या वेळच्या भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी आणि परराष्ट्रमंत्री सुवर्ण सिंग यांनी अनेक देशांचे दौरे करून अप्रत्यक्षपणे प्रयत्न केले, परंतु आपल्या शेजारील राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करण्याच्या भारताच्या परराष्ट्र धोरणातील प्रमुख तरतुदीमुळे भारताने पूर्व पाकिस्तानच्या प्रश्नाबाबत प्रत्यक्ष हस्तक्षेप करणे टाळलेले होते, परंतु निर्वासितांचे प्रचंड लोंढे भारतात येऊ लागल्यामुळे भारताच्या अंतर्गत सुरक्षिततेला त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेलादेखील धोका निर्माण झालेला होता. अशा पार्श्वभूमीवर भारताच्या तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी पूर्व पाकिस्तानच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या 'मुक्तीवाहिनी' या संघटनेला प्रत्यक्ष पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला.

पूर्व पाकिस्तानवरील पश्चिम पाकिस्तानच्या दडपशाहीविरुद्ध 'मुक्तीवाहिनी' ही संघटना गनिमी काव्याने लढा देत होती. या संघटनेला भारताने लष्करी मदत दिल्यामुळे पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान यांच्यातील संघर्षाचे रूपांतर भारत-पाकिस्तान यांच्यातील युद्धामध्ये झाले. या दरम्यानच्या काळात २५ मार्च १९७१ मध्ये पाकिस्तानने पूर्व पाकिस्तानमध्ये लष्करी कायदा पुकारून दडपशाही सुरू केलेली होती. या दडपशाहीच्या विरोधातदेखील 'आवामी लीग' आणि 'मुक्तीवाहिनी' या संघटनांनी आवाज उठवलेला होता. पूर्व पाकिस्तानच्या प्रश्नावरुन भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये ३ डिसेंबर १९७१ रोजी प्रत्यक्ष युद्धाला सुरुवात झाली. भारतीय लष्कर पुर्ण ताकदीनिशी पाकिस्तानच्या विरोधात उतरल्यामुळे १६ डिसेंबर १९७१ रोजी पूर्व पाकिस्तानातील पाकिस्तानी सैन्य भारताला शरण आले आणि भारत-पाकिस्तान युद्धाची समाप्ती होऊन जगाच्या नकाशावर बांगलादेश हे एक स्वतंत्र राष्ट्र अस्तित्वात आले. तत्पूर्वी पूर्व पाकिस्तान प्रश्नावरून भारत-पाकिस्तान युद्ध सुरू होताच भारत सरकारने ६ डिसेंबर १९७१ रोजी स्वतंत्र बांगलादेश सरकारला मान्यता दिली आणि दुसऱ्याच दिवशी म्हणजे ७ डिसेंबर १९७१ रोजी बांगलादेशाशी विदेश संबंध, व्यापार व संरक्षण या विषयावर करार केले. तसेच ९ डिसेंबर १९७१ रोजी दिल्ली येथे बांगलादेशाचा दूतावास स्थापन करण्यात आला. अशाप्रकारे भारत सरकारने पूर्व पाकिस्तानमध्ये सुरू केलेल्या लष्करी मोहिमेला यश येऊन १६ डिसेंबर १९७१ रोजी स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती झाली. भारताने एक सार्वभौम राष्ट्र म्हणून बांगलादेशाला त्वरित मान्यता दिली, तसेच बांगलादेशाला संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्यत्व मिळावे, यासाठीदेखील भारताने प्रयत्न केले. त्याचप्रमाणे १९७२ मध्ये भारत आणि बांगलादेश यांच्या दरम्यान सहकार्य, मैत्री आणि शांतता या विषयावर २५ वर्ष मुदतीसाठीचा एक महत्त्वाचा कराराही झाला. या करारानुसार दोन्ही देशांनी जागतिक शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी सहकार्य करण्याचे तसेच साम्राज्यवाद, वसाहतवाद आणि वंशवाद यांच्याशी लढा देण्याचे मान्य केले. तसेच परस्परांचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व आणि प्रादेशिक एकात्मतेचा आदर राखून परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करण्याचेही मान्य करण्यात आले. याशिवाय परस्परांवर अतिक्रमण न करणे आणि आपल्या प्रदेशाचा परकीय देशास लष्करी कारणासाठी वापर करू न देणे, यालाही दोन्ही राष्ट्रांनी मान्यता दिली. अशाप्रकारे पूर्व पाकिस्तानमधून बांगलादेशची निर्मिती म्हणजे तेथील स्थानिक जनतेचा स्वातंत्र्यसंग्राम आणि भारताची प्रचंड लष्करी मदत यांचा संयुक्त परिणाम ठरला. थोडक्यात पूर्व पाकिस्तानमधून बांगलादेशाची निर्मिती म्हणजे पाकिस्तानच्या निर्मितीचा मूळ आधार ठरलेल्या द्विराष्ट्र सिद्धांताचा पराभव होता तसेच भारताचा आणि विशेषतः तत्कालिन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या राजनयिक धोरणाचा आणि कूटनीतीचा खूप मोठा विजय होता.

पाकिस्तानमधून पूर्व पाकिस्तान अर्थात बांगलादेश हे स्वतंत्र राष्ट्र निर्माण होणे, भारताच्या राष्ट्रीय हितास अनुकूल असल्यामुळे भारताने त्या संदर्भात योग्य कूटनीतीचा आणि राजनयाचा वापर केला. कारण पाकिस्तानकडून वारंवार होणाऱ्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आक्रमणाचा तसेच पाकिस्तानच्या कुरापतखोर धोरणाचा कायमचा निकाल लागावा, यासाठी भारताने पूर्व पाकिस्तानच्या स्वातंत्र्ययुद्धाला पाठिंबा दिलेला होता. पाकिस्तानमधून पूर्व पाकिस्तान अर्थात स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती करून भारताने आपल्या राष्ट्रीय हिताशी सुसंगत खालील उद्दिष्टे साध्य केल्याचे स्पष्ट होते;

१) बांगलादेश स्वतंत्र झाल्यामुळे भारतासाठी पूर्व पाकिस्तानचा धोका तसेच दुसऱ्या आघाडीचे संकट नष्ट झाले.

२) बांगलादेश हे नवीन राष्ट्र अस्तित्वात आल्यामुळे ते दीर्घकाळ कमकुवत राहील, त्यामुळे त्यापासून नजीकच्या भविष्यकाळात फार मोठा धोका राहण्याची शक्यता नव्हती.

३) काश्मीर या भारतीय प्रदेशावर हक्क सांगणाऱ्या पाकिस्तानच्या धोरणाला बांगलादेशाच्या निर्मितीमुळे शह मिळाला होता. कारण पाकिस्तान काश्मीरबाबत मुस्लिम एकात्मवादाचा आधार घेऊन त्यासंदर्भात कारवाया करीत होता.

४) बांगलादेशाच्या निर्मितीमुळे पाकिस्तानने पूर्व पाकिस्तानचा प्रदेश गमावल्यामुळे पाकिस्तानच्या राष्ट्रीय उत्पन्नात तसेच पाकिस्तानच्या विदेशी चलनात प्रचंड तूट येणार होती. त्यामुळे पाकिस्तानची अर्थव्यवस्था खिळखिळी करणे, हा भारतीय कूटनीतीचा भाग होता.

५) पूर्व पाकिस्तानची उत्तर सीमा आणि चुंबी खोऱ्यातील चीन यांच्या दरम्यान फक्त एकच चिंचोळी पट्टी भारताच्या ताब्यात होती. चीन आणि पाकिस्तान यांनी एकत्र येऊन जर ही चिंचोळी पट्टी ताब्यात घेतली असती तर भारताच्या पूर्व विभागातील आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, त्रिपुरा, मिझोराम, अरुणाचल प्रदेश हे राज्य तसेच भारताच्या संरक्षणात असलेले भूतान हे राष्ट्र यांना धोका निर्माण होण्याची शक्यता होती. परंतु बांगलादेश स्वतंत्र झाल्यामुळे भारताचा हा धोका टळला.

६) पूर्व पाकिस्तानातील जनतेवर पाकिस्तान सरकारने भीषण अत्याचार करण्याचे सत्र सुरू केलेले असल्यामुळे तेथील सुमारे ९० लाख लोक भारतात निर्वासित म्हणून आश्रयास आले होते. पाकिस्तानने हे सर्व निर्वासित परत घ्यावेत, म्हणून भारताने केलेल्या वाटाघाटींना यश येऊ शकले नाही. पर्यायाने निर्वासितांच्या प्रश्नामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर खूप मोठे संकट आले होते, म्हणून हे संकट टाळण्यासाठी पाकिस्तानशी युद्ध करणे अटळ झाले होते.

७) पूर्व पाकिस्तानच्या प्रश्नावरून पाकिस्तानने भारतावर हवाई हल्ले करण्यास सुरुवात केल्यामुळे युद्ध टाळण्याचे सर्व मार्ग बंद झाले. पर्यायाने भारताने पाकिस्तान विरोधात युद्धाची घोषणा केली.

बांगलादेश निर्मितीमध्ये भारताचा महत्त्वपूर्ण वाटा होता. बांगलादेश हे एक असे राष्ट्र आहे की, ज्या राष्ट्राचा तीनही दिशांनी भूभाग हा भारतीय भूप्रदेशाने वेढलेला आहे. बांगलादेशाच्या पश्चिम आणि उत्तरेला पश्चिम बंगाल, पूर्वेला आसाम, मेघालय, त्रिपुरा व मिझोरम हे भारतातील घटक राज्य, तर दक्षिण दिशेला बंगालचा उपसागर आहे.

### ३.३.१.२ **भारत-बांगलादेश संबंध:-**

१६ डिसेंबर १९७१ रोजी पाकिस्तानमधून पूर्व पाकिस्तान हा भाग वेगळा झाला आणि बांगलादेश या नावाने स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयास आला. पूर्व पाकिस्तानमधील अवामी लीगचे

प्रमुख नेते शेख मुजीबुर रहमान यांनी जानेवारी १९७२ मध्ये बांगलादेशाचे पंतप्रधानपद स्विकारले. १७ मार्च १९७२ रोजी भारताच्या तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी ढाका येथे भेट देऊन बांगलादेशाशी १९ मार्च १९७२ रोजी मैत्री, सहकार्य आणि शांतता या संदर्भातील पंचवीस वर्ष मुदतीचा महत्त्वपूर्ण करार केला. हा करार भारत आणि रशिया यांच्यामध्ये झालेल्या १९७१च्या कराराच्या स्वरूपाप्रमाणे होता. शेख मुजीबुर रहमान बांगलादेशचे पंतप्रधान असतानाचा कालखंड हा भारत-बांगलादेश मधील 'सहकार्याचा कालखंड' म्हणून ओळखला जातो. कारण या कालखंडात भारताकडून बांगलादेशला स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता देणे, संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्यत्व बांगलादेशाला मिळावे यासाठी भारताकडून करण्यात आलेले प्रयत्न, पाकिस्तानी युद्धकैदी, रहिवाशांची समस्या, व्यापार इत्यादी क्षेत्रात सकारात्मक निर्णय घेण्यात आले. २८ मार्च १९७२ चा व्यापार करार तसेच ५ जुलै १९७३ चा नवा व्यापार करार, 10 जून १९७२ चा अनुशक्ती व अवकाश संशोधन याचा उपयोग शांततामय कार्यासाठी करण्याबाबतचा करार, २७ ऑगस्ट १९७३ चा माहितीची देवाण-घेवाण करण्यासंदर्भातील करार, तसेच २७ सप्टेंबर १९७४ चा संस्कृती, शिक्षण, माहिती आणि क्रीडा इत्यादी क्षेत्रात सहकार्य करण्यासंदर्भातील करार, भारत आणि बांगलादेश यांच्या दरम्यान करण्यात आला. पाकिस्तानी युद्धकैद्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी भारताने पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्याशी एकाच वेळी २८ ऑगस्ट १९७३ रोजी वाटाघाटी करून त्या संदर्भातील एक करार केला, या करारानुसार बांगलादेशात अडकून पडलेल्या पाकिस्तानी रहिवाशांची व पाकिस्तानात अडकलेल्या बांगलादेशी रहिवाशांची अदलाबदली करण्यासंदर्भातील निश्चिती फेब्रुवारी १९७४ मध्ये करण्यात आली. भारताच्या तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी आणि बांगलादेशाचे पंतप्रधान मुजीबुर रहमान यांच्या दरम्यान १२ मे ते १६ मे १९७४ या काळात शिखर भेट झाली. या भेटीमध्ये दोन्ही राष्ट्र दरम्यान स्नेह आणि सहकार्य वाढविण्याच्या भूमिकेचा पुनरुच्चार करण्यात येऊन भारत आणि बांगलादेश यांच्यामध्ये सीमा करार करण्यात आला. या सीमा करारानुसार भारताकडे बेरुबाडी, तर दहाग्राम व पौबाडी हा प्रदेश बांगलादेशकडे राहील, असे ठरण्यात आले.

भारत-बांगलादेश यांच्यातील संबंध चांगले ठेवण्यामध्ये बांगलादेशाचे पंतप्रधान शेख मुजीबुर रहेमान यांना यश आले असले तरीदेखील बांगलादेशाचे नेतृत्व करत असताना अंतर्गत कारभारात त्यांना पूर्ण यश येऊ शकले नाही. पर्यायाने शेख मुजीबुर रहेमान यांच्या विरोधात बांगलादेशात असंतोष निर्माण झाला. त्यातून गटबाजीचे राजकारण झाले आणि यामध्येच शेख मुजीबुर रहमान आणि त्यांचे कुटुंबीय यांची हत्या १५ ऑगस्ट १९७५ ला करण्यात आली.

१९७१ ते १९७५ हा कालखंड भारत-बांगलादेश यांच्यातील ‘सहकार्याचा कालखंड’ म्हणून ओळखला जात असला तरीदेखील भविष्यातील मतभेद किंवा संघर्षाचे बीज याच काळात पेरले गेल्याचे स्पष्ट होते. भारत-बांगलादेश यांच्यातील संघर्षाची काही कारणे पुढीलप्रमाणे आहेत;

१) फराक्का धरणासंदर्भातील प्रमुख वाद या दरम्यान या दोन देशांमध्ये निर्माण झालेला होता.

२) बांगलादेशाचा पाकिस्तानशी असलेला व्यापार बंद झालेला होता, त्यामुळे या मालाला भारतात बाजारपेठ उपलब्ध नव्हती.

३) बांगलादेशाचा भारताशी होणारा व्यापार हा रुपयामध्ये होत असल्यामुळे बांगलादेशाची विदेशी चलन मिळविण्याची गरज पूर्ण होत नव्हती.

४) बांगलादेशाची अर्थव्यवस्था ही पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेशी निगडीत असल्यामुळे ती भारतीय अर्थव्यवस्थेला परस्परपूरक नसून ती स्पर्धात्मक होती.

५) बांगलादेश निर्माण होण्यापूर्वी पूर्व पाकिस्तानात पाकिस्तानने भारतविरोधी प्रचार केल्यामुळे तेथील जनतेच्या मनात भारताविषयी संशयाची भावना होती.

६) बांगलादेश मधून भारतात जूट, धान्य व इतर वस्तूंची चोरटी निर्यात होत असल्यामुळे बांगलादेशात या वस्तूंच्या किमती प्रचंड वाढलेल्या होत्या, त्यामुळे बांगलादेशी नागरिकांमध्ये भारताविषयी असंतोष निर्माण झालेला होता.

७) बांगलादेशमधील शेख मुजीबुर रहमान शासन हे भारताच्या आश्रयावर आहे, तसेच बांगलादेशाच्या दैनंदिन प्रशासनात भारत हस्तक्षेप करतो, अशी सर्वसामान्य बांगलादेशी नागरिकांची भावना झालेली होती. त्यामुळे ही भावना दोन्ही देशांच्या हिताला मारक ठरली.

८) कलकत्ता येथील बंगाली वृत्तपत्रांमध्ये बांगलादेशातील नेत्यांवर निकृष्ट दर्जाची टीका किंवा व्यंगचित्र प्रसिद्ध करण्यात येत होती, त्यामुळे बांगलादेशांमधील नेते भारतावर नाखुश होते. या विविध कारणांमुळे भविष्यात भारत-बांगलादेश यांच्यातील संबंध काहीप्रमाणात बिघडले, असे निदर्शनास येते.

बांगलादेशात पंतप्रधान मुजीबुर रहमान यांच्या हत्येनंतर अस्थिर परिस्थिती निर्माण झाली . शेख मुजीबुर रहमान यांच्या हत्येनंतर बांगलादेशात निर्माण झालेल्या अस्थिरतेचा फायदा लष्कराने घेतला आणि तेथील राजकारणावर लष्कराने आपली पकड घट्ट केली. १९७५ ते १९९१ पर्यंत बांगलादेशात लष्करी हुकूमशाही होती, म्हणून याकाळात भारत-बांगलादेश संबंधांमध्ये अनेकवेळा तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. अशा अस्थिर परिस्थितीत बांगलादेशाचे लष्करप्रमुख जनरल झिया-उर-रहमान यांनी प्रधान लष्करी प्रशासक म्हणून बांगलादेशाची सत्तासूत्रे स्विकारली. जनरल झिया यांनी बांगलादेशाला स्थिर शासन मिळून देण्यासाठी प्रयत्न केले, परंतु याकाळात भारत-बांगलादेश यांच्या दरम्यान आर्थिक सहकार्याच्या दृष्टिकोनातून फारसे सकारात्मक काही होऊ शकले नाही. जनरल झिया यांच्या काळात भारत-बांगलादेश सीमारेषा, बेरुबाडी, तीन बीघा भूखंड वाद, मूर बेटाची समस्या तसेच फराक्का धरणाची समस्या आणि बांगलादेशातून भारतात स्थलांतरित होणाऱ्या निर्वासितांची समस्या यामुळे वाद निर्माण झालेले होते. या दरम्यानच्या काळात भारतामध्ये १९७७ मध्ये जनता पक्षाचे सरकार सत्तेवर होते. याकाळात भारत-बांगलादेश यांच्यामध्ये नोव्हेंबर १९७७ ला फराक्का धरण करार झाला. पाच वर्ष मुदतीच्या या करारातून भारताला फराक्का धरणातून उन्हाळ्यात २0 ते २६ हजार क्युसेक्स इतके पाणी दररोज मिळणार होते, तर उन्हाळ्याव्यतिरिक्त तीस ते चाळीस हजार क्युसेक्स पाणी मिळणार होते. या करारामुळे कलकत्ता बंदराची गरज पूर्ण भागणार नसली तरी फराक्का

धरणाची समस्या आंतरराष्ट्रीय पातळीवरून केवळ भारत आणि बांगलादेश या दोन्ही राष्ट्रांच्या वाटाघाटी क्षेत्रापुरती मर्यादित व्हावी व बांगलादेशमधील अंतर्गत राजकारणाच्या दडपणामधून हा प्रश्न मुक्त व्हावा, असा दुहेरी दृष्टिकोण भारतातील जनता सरकारचा होता. या करारातून दोन्ही देशांचे समाधान करण्याचा प्रयत्न झाला, परंतु हा करार पूर्णपणे यशस्वी होऊ शकला नाही.

भारतातील जनता पक्षाच्या सत्ता कार्यकाळात जनरल झिया यांनी १९ डिसेंबर १९७७ ला भारतात दिल्ली येथे भेट दिली. त्याचप्रमाणे एप्रिल १९७९ मध्ये भारताचे पंतप्रधान श्री मोरारजी देसाई आणि परराष्ट्रमंत्री श्री अटलबिहारी वाजपेयी यांनी ढाका येथे भेट दिली. थोडक्यात याकाळात भारत आणि बांगलादेश यांच्यातील परस्पर संबंध सुरळीत होऊन परस्परांच्या समस्या सामंजस्याने सोडवाव्यात अशा स्वरूपाचे प्रयत्न करण्यात आले. दरम्यानच्या काळात भारतात सत्तांतर होऊन जनता पक्ष सत्तेतून पायउतार झाला आणि १९८० मध्ये भारतात श्रीमती इंदिरा गांधी दुसऱ्यांदा भारताच्या पंतप्रधान झाल्या. श्रीमती इंदिरा गांधी यांचे धोरण मुजीबुर रहमान यांच्या गटाला पोषक आहे, असे मत झिया-उर-रहमान यांचे झालेले होते. त्यामुळे झिया-उर-रहमान हे अस्वस्थ झालेले होते. पर्यायाने याकाळात भारत-बांगलादेश यांच्यातील संबंध तणावपूर्ण होऊ लागले. यादरम्यानच्या काळातच बांगलादेशमध्ये २९ मे १९८१ रोजी झिया-उर-रहमान यांची हत्या करण्यात आली. झिया यांच्या हत्येनंतर बांगलादेशमध्ये हुसेन महंमद इर्शाद यांनी बांगलादेशचे प्रमुख लष्करी प्रशासक म्हणून सत्तेची सूत्रे हाती घेतली. या कालखंडात बांगलादेशामध्ये चीन व पाकिस्तान समर्थक गटांचा प्रभाव जास्त वाढला तसेच फराक्का धरणाच्या प्रश्नावर आणि चकमा आदिवासींचे बांगलादेशातून भारतात स्थलांतर वाढल्यामुळे भारत-बांगलादेशात राजकीय तणाव निर्माण झाला. भारत-बांगलादेश यांच्यात यापूर्वी झालेला फराक्का धरण करार समाप्त झाल्यामुळे २० जुलै १९८३ ला यासंदर्भातील दुसरा करार करण्यात आला. त्यानूसार गंगा नदीचे ३० टक्के पाणी भारताला आणि ३५ टक्के पाणी बांगलादेशाला देण्यात आले. उरलेल्या ३५ टक्के पाण्याबाबत कोणताही निर्णय झाला नाही. याकाळात भारत-बांगलादेश यांच्यातील समुद्री सीमा, मूर बेट, तीन बिघा, काटेरी कुंपनाचा प्रश्न इत्यादी प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली. झिया-उर-रहमान यांच्या कारकिर्दीपेक्षा इर्शाद यांचा कालखंड भारत-बांगलादेश यांच्यातील संबंधाबाबत स्थिर व शांततेचा राहिला. १९८४ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यानंतर लालबहादूर शास्त्री हे भारताचे पंतप्रधान झाले. त्यांच्या निधधानंतर श्री राजीव गांधी हे भारताचे पंतप्रधान झाले. त्यांनी आपल्या काळात भारत-बांगलादेशमधील सहकार्य वाढवण्यासाठी फेब्रुवारी १९९० मध्ये वाटाघाटी केल्या. बांगलादेशमध्ये देखील यादरम्यानच्या काळात इर्शाद यांची सत्ता जाऊन त्याठिकाणी फेब्रुवारी १९९१ मध्ये निवडणुका झाल्या आणि त्यानंतर बेगम खालिदा झिया या बांगलादेशात सत्तेवर आल्या. याच काळात भारतात पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या झाल्यानंतर पंतप्रधान म्हणून पी. व्ही. नरसिंहराव, व्ही. पी. सिंग, चंद्रशेखर यांनी भारताचे नेतृत्व केले. याकाळात भारताचे बांगलादेशाशी मैत्रीपूर्ण संबंध होते. १९९१ नंतर बांगलादेशांमधील लष्करी हुकूमशाही संपुष्टात येऊन तेथे संसदीय शासनपद्धतीची सुरुवात झाल्यामुळे भारत-बांगलादेश यांच्यात सहकार्याचे नवीन पर्व सुरू झालेले आहे. याकाळात बांगलादेशामध्ये सार्वत्रिक निवडणुका संपन्न होऊन संसदीय लोकशाहीला सुरुवात झाल्यानंतर तेथे बांगलादेश नॅशनल पार्टीला बहुमत मिळाले. त्यामुळे श्रीमती बेगम खालिदा

झिया या बांगलादेशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान झाल्या. बांगलादेशात लोकशाही शासनपद्धती अस्तित्वात आल्यामुळे भारत-बांगलादेश यांच्यातील अनेक संघर्षमय मुद्द्यांवर शांततापूर्वक मार्गाने तोडगा काढण्यासाठी पोषक परिस्थिती याकाळात निर्माण झाली. त्यामुळे या काळात उभय देशातील वादग्रस्त प्रश्नांवर उपाय शोधण्यासाठी काही महत्त्वाचे करार झाले. आर्थिक आणि व्यापारी क्षेत्रात उभय देशांमध्ये सहकार्य वाढवणे यासंदर्भातही महत्त्वाचे करार याकाळात झाले.

दक्षिण आशियाई देशांच्या सार्क या संघटनेच्या व्यासपीठाने भारत-बांगलादेश या देशांमध्ये सहकार्य वाढवण्यास मदत केली. कारण सार्क संघटनेच्या माध्यमातून भारत-बांगलादेशामध्ये आर्थिक आणि व्यापारी सहकार्याचा मार्ग मोकळा झाला. त्यामुळे उभय राष्ट्रांनी परस्परांना 'प्राधान्यशील व्यापार सहकारी राष्ट्राचा' (Most Favoured Nation Status) दर्जा बहाल केला. यामुळे दोन्ही राष्ट्रातील व्यापारात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. भारतात इंद्रकुमार गुजराल हे पंतप्रधान असताना भारत-बांगलादेश यांच्यात परस्परसंबंध सुधारण्यास सुरुवात झाली. कारण पंतप्रधान गुजराल यांनी घोषित केलेल्या 'गुजराल धोरणा' (Gujral Doctrine) नुसार भारत-बांगलादेश उपविभागीय सहकार्यावर अधिक भर देण्यात आला. या धोरणानुसार भारताने बांगलादेशाकडून कोणत्याही परतफेडीची अपेक्षा न ठेवता बांगलादेशाला मोठे आर्थिक साहाय्य केले.

भारत-बांगलादेश यांच्या दरम्यान असलेला सीमावाद सोडवण्यासाठी ६ जून २०१५ रोजी दोन्ही देशांच्या प्रतिनिधीमध्ये सकारात्मक चर्चा झाली. त्याचप्रमाणे ७ जून २०१५ रोजी भारत-बांगलादेश यांच्यात मुक्त व्यापाराच्या संदर्भात एक करार करण्यात आला. १० फेब्रुवारी २०१६ रोजी भारताने भारत-बांगलादेश यांना रेल्वेमार्गाने जोडण्यासाठी ५८0 करोड रुपये मंजूर केले. यामुळे भारत-बांगलादेश यांच्यातील व्यापाराला प्रोत्साहन मिळण्यास मदत झाली. भारताचे वर्तमान पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी आणि बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांच्यामध्ये २७ सप्टेंबर २0२0 रोजी न्यूयार्क येथे द्विपक्षीय चर्चा करण्यात येऊन उभय देशांमध्ये सहकार्य वाढवण्यावर भर देण्यात आला. दक्षिण आशियामधील भारत-बांगलादेश या शेजारील देशांमधील संबंध सीमावाद वगळता सर्वसाधारणपणे सहकार्याचे आणि मैत्रीपूर्ण राहिलेले आहेत. भारत आणि बांगलादेश हे राष्ट्र सार्क, बिमस्टेक आणि राष्ट्रकुल या संघटनांचे सदस्य राष्ट्र आहेत. भारताने सदैव बांगलादेशाच्या संदर्भात शेजारील राष्ट्र म्हणून मोठ्या भावाची भूमिका निभावलेली आहे.

### ३.३.१.३ **भारत-बांगलादेश मधील प्रमुख समस्या:-**

बांगलादेशाच्या निर्मितीमध्ये भारताची भूमिका महत्त्वाची आणि निर्णायक ठरलेली आहे. म्हणून सुरुवातीपासूनच काही अपवाद वगळता भारत-बांगलादेश यांच्यातील परस्परसंबंध सहकार्य, मैत्रीपूर्ण व सामंजस्याचे होते. परंतु असे असले तरी, उभय देशांनी स्वराष्ट्रहिताला महत्व दिल्यामुळे सहाजिकच अनेकवेळा उभय देशांमध्ये मतभेद निर्माण होऊन त्याचा परिणाम उभय देशांच्या परस्पर संबंधांवर झालेला आहे. भारत-बांगलादेश परस्पर संबंधांवर परिणाम करणारे काही प्रमुख घटक किंवा समस्या पुढीलप्रमाणे आहेत;

### ३.३.१.३.१ भारत-बांगलादेश सीमावाद:-

भारत-बांगलादेश परस्पर संबंधांवर विपरीत परिणाम करणारा सीमावाद हा महत्त्वाचा घटक किंवा समस्या आहे. बांगलादेशाच्या निर्मितीपासूनच भारत-बांगलादेश यांच्यातील सीमा प्रदेश निर्धारित करणे, ही एक प्रमुख समस्या बनलेली होती. भारत-बांगलादेश सीमेवर वाहणाऱ्या नद्या वारंवार आपले पात्र बदलतात. त्याचप्रमाणे वाहणाऱ्या नद्यांच्या पात्रात किंवा नदीच्या मुखाजवळ वाहून आलेल्या गाळामुळे नवीन बेटे तयार होत असतात. पर्यायाने नदीच्या पात्रानुसार भारत-बांगलादेश यांच्यामध्ये असलेली सीमा वारंवार बदलत असते, म्हणून नवीन तयार झालेला प्रदेश कोणाचा? हा वाद भारत-बांगलादेश यांच्यात वारंवार निर्माण होतो. भारत-बांगलादेश यांच्यामध्ये ४०९६ किलोमीटरची सीमारेषा आहे, परंतु ही सीमारेषा नदींच्या बदलत्या प्रवाहामुळे किंवा पात्रामुळे सुरळीत नाही. भारत-बांगलादेश यांच्यातील सीमारेषा भारतातील त्रिपुरा, आसाम आणि मिझोरम या तीन राज्यांना मिळालेली आहे, परंतु नद्यांच्या बदलत्या प्रवाहामुळे भारत-बांगलादेशमधील सीमारेषा अधोरेखित करणे, हे एक अवघड काम झालेले आहे. भारत-बांगलादेश यांच्यामधील सीमारेषा पूर्णपणे सुरळीत नसल्यामुळे बांगलादेशाच्या हद्दीमधील काही भूखंड भारताच्या हद्दीमध्ये आलेले आहेत, तसेच भारताच्या हद्दीमधील काही भूखंड हे बांगलादेशाच्या हद्दीमध्ये गेलेले आहेत. उभय देशांच्या सीमावादात असे एकूण १६६ वादग्रस्त भूखंड आहेत. शेख मुजीबुर रहमान आणि श्रीमती इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात उभय राष्ट्रांमधील सीमारेषा अधोरेखित करण्यासंदर्भात १९७४ मध्ये एक करार करण्यात आला. या करारानुसार बेरुबाडी हा भाग भारताकडे तर तीन बीघा, दहाग्राम आणि पौबाडी हा भाग बांगलादेशकडे सोपवण्याचे ठरले होते. परंतु या करारासंदर्भात बांगलादेशात असंतोष निर्माण झालेला होता, त्यामुळे हा प्रश्न पूर्णपणे मिटू शकला नाही. भारतातील त्रिपुरा राज्याच्या सीमेवरील महुरी नदीचे पात्र बदलल्यामुळे भारत-बांगलादेश यांच्यात एप्रिल १९७६ तसेच नोव्हेंबर १९७६ मध्ये चकमकी झाल्यामुळे भारत-बांगलादेश यांच्यात तणाव निर्माण झाला होता. या संदर्भात मार्च १९७८ मध्ये भारतातील जनता सरकारने पुढाकार घेऊन शांततेच्या मार्गाने वाटाघाटी करून भारत-बांगलादेश यांच्यातील सीमा निर्धारण करण्याच्या तत्वाला प्राधान्य देऊन सीमावाद शांततेच्या क्षेत्रात आणण्याचा प्रयत्न केला.

भारत-बांगलादेश यांच्यामध्ये सीमावादासंदर्भात जास्त कळीचा आणि वादग्रस्त ठरलेला 'तीन बिघा' हा भूखंड होय. बांगलादेश निर्माण होण्यापूर्वीपासून भारत-पाकिस्तान यांच्यात या प्रदेशावरून वाद निर्माण झालेला होता. भारतातील कूचबिहार जिल्ह्याच्या मुख्य क्षेत्राला कुचलीबाडी हा बावीस गावांचा प्रदेश जोडणारा एक जोडमार्ग आहे. या जोडमार्गाच्या दोन्ही बाजूंना बांगलादेशमधील दहाग्राम व अंगारपोता हे भाग आहेत. परंतु मुख्य प्रश्न हा आहे की, तीन बीघा हा भाग भारताकडे राहिला असता बांगलादेशाला समस्या होते, तसेच तीन बिघा हा भाग बांगलादेशाकडे दिला असता भारतासाठी समस्या निर्माण होते. म्हणून हा विवाद मिटणे थोडे कठीण झाले होते. तीन बीघा या समस्येवर १९५८ मध्ये भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री फिरोज खान यांनी चर्चा केली होती, परंतु या चर्चेतून कोणताही मार्ग निघू शकला नव्हता. पुढे १९७४ मध्ये तीन बिघा हा भाग बांगलादेशाला हस्तांतरित करण्याचे उभय देशात ठरले असले तरी प्रत्यक्षात या भूखंडाचे हस्तांतरण बांगलादेशाकडे झालेले नाही. १९८२ मध्ये भारत-बांगलादेशमधील हा वाद मिटवण्यासाठी भारताच्या तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी आणि बांगलादेशचे

लष्करी प्रशासक हुसेन मोहम्मद इर्शाद यांनी या जोडमार्गावर ओव्हरब्रीज बांधून या समस्येवर तोडगा काढण्यासंदर्भात चर्चा केली होती, परंतु त्यातूनही काही निष्पन्न होऊ शकले नाही. त्यानंतरही उभय देशांमध्ये १९८५ तसेच १९९१ मध्ये तीन बीघा विवाद सोडवण्यासंदर्भात चर्चा झाली, परंतु तो प्रश्न सुटू शकला नाही.

भारत-बांगलादेश यांच्यातील सीमावादाची समस्या सोडवण्यासाठी उभय देशांमध्ये 'लँड बॉर्डर एग्रीमेंट' हा करार करण्यासंदर्भात हालचाली सुरू झाल्या. या करारासंदर्भातील विधेयक पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात म्हणजेच भारताच्या पंधराव्या लोकसभेमध्ये सादर करण्यात आले होते, परंतु हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. लँड बॉर्डर एग्रीमेंट नुसार भारत आणि बांगलादेश यांच्यामध्ये सीमारेषा संदर्भातील जे १६६ वादग्रस्त भूखंड आहेत, त्यांची आदलाबदली करणे अपेक्षित होते. थोडक्यात भारत-बांगलादेश यांच्यामधील सीमारेषा सुरळीत करण्यासाठी भारताच्या मालकीचे जे भूखंड बांगलादेशाच्या हद्दीत आहेत, ते बांगलादेशाने भारताच्या स्वाधीन करावेत आणि भारताने आपल्या हद्दीतील बांगलादेशाच्या मालकीचे भूखंड बांगलादेशाच्या स्वाधीन करावेत, असे अपेक्षित होते. भारत-बांगलादेश यांच्यातील सीमावादामध्ये बांगलादेशाचे १११ भूखंड भारताच्या हद्दीत आहेत, तसेच भारताचे ५५ भूखंड बांगलादेशाच्या हद्दीत आहेत. उभय देशांकडे असणारे हे भूखंड जवळपास सहा हजार एकर जमिनीवर व्यापलेले आहेत. भारत-बांगलादेश यांच्यामधील भूखंडांची अदलाबदली करण्यासाठी भारताकडून भारतीय संविधानात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यासंदर्भात पाऊलही उचलण्यात आलेले होते, परंतु पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात लोकसभेत यासंदर्भातील विधेयक मंजूर होऊ शकले नाही. तसेच राज्यसभेतदेखील काँग्रेस आणि मित्रपक्षांचे बहुमत नसल्यामुळे आणि भारतीय जनता पक्षाचे राज्यसभेत बहुमत असल्यामुळे तसेच भारतीय जनता पक्षाचा भारताचा काही भाग बांगलादेशला देण्यासंदर्भात विरोध असल्यामुळे लँड बॉर्डर एग्रीमेंट संदर्भातील विधेयक मंजूर होऊ शकले नाही. भारत-बांगलादेश यांच्या दरम्यान लँड बॉर्डर एग्रीमेंट हा करार व्हावा, अशी बांगलादेशाची खूप इच्छा होती, कारण या करारामुळे उभय देशांमधील सीमाविवाद संपून दोन्ही देशातील संबंध सुधारण्यास मदत होणार होती, परंतु असे होऊ शकले नाही. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी भारत-बांगलादेश यांच्यातील भूखंडांच्या अदलाबदलीचा मुद्दा प्रतिष्ठेचा बनवलेला होता. म्हणूनच श्रीमती शेख हसीना यांनी लँड बॉर्डर एग्रीमेंट हा करार भारताने करावा, यासाठी सातत्याने भारताला विनंतीदेखील केलेली होती. परंतु भारताने हा करार मंजूर करण्यासंदर्भातील हालचाली केल्या नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळातील परराष्ट्र मंत्री श्रीमती सुषमा स्वराज बांगलादेश दौऱ्यावर गेलेल्या असताना त्यांनी लँड बॉर्डर एग्रीमेंट करारासंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्यासंदर्भातील चर्चा बांगलादेशाच्या पंतप्रधान श्रीमती शेख हसीना यांच्याशी केली. बांगलादेशाशी असणारे भारताचे संबंध सुधारण्यासाठी लँड बॉर्डर एग्रीमेंट आणि तिस्ता नदी पाणी वाटप करार, हे दोन्ही करार होणे अत्यंत आवश्यक आहे. भारत-बांगलादेश यांच्यातील सीमावाद सोडविण्यासंदर्भात उभय राष्ट्राकडून काही प्रयत्न झालेले असले तरी, अद्यापपर्यंत भारत-बांगलादेश यांच्यातील सीमावाद संपलेला नाही.

### ३.३.१.३.२ नदी पाणी वाटप आणि फराक्का धरण समस्या:-

भारत-बांगलादेश संबंधांमध्ये तणाव निर्माण होण्याचे दुसरे प्रमुख कारण म्हणजे नदी पाणी वाटप आणि फराक्का धरणाची समस्या होय. भारत आणि बांगलादेश मधून गंगा या प्रमुख नदीसह ५६ नद्या वाहतात. उभय देशांमध्ये गंगा नदीच्या पाणी वाटपासंदर्भात यशस्वी करार झालेला आहे. मात्र असे असले तरी फराक्का या धरणाच्या संदर्भात भारत-बांगलादेश यांच्यात तणाव निर्माण झालेला आहे. फराक्का धरणाची समस्या ही बांगलादेश निर्माण होण्यापूर्वीपासून वादग्रस्त बनलेली आहे. फराक्का धरणासंदर्भात भारत सरकारची अशी योजना होती की, समुद्रकिनाऱ्यापासून १४५ किलोमीटर आत हुगळी या गंगेच्या एका प्रमुख नदीवर असलेल्या कलकत्ता बंदरात गाळाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे गंगा नदीवर धरण बांधून हुगळी नदीत पाणी सोडण्यात यावे, यामुळे कलकत्ता बंदर जलवाहतुकीसाठी सोईस्कर होईल. म्हणून गंगा नदीवर फराक्का धरण बांधण्याची योजना भारताने आखलेली होती. या धरणासंदर्भातील प्रस्ताव अनेकवेळा मांडण्यात आलेला होता, परंतु पाकिस्तानने या प्रश्नावर सतत अडवणुकीचे धोरण स्विकारलेले होते. असे असतानादेखील भारताने फराक्का धरणाचे बांधकाम सुरू करून १९७५ मध्ये या धरणाचे काम पूर्ण केले. दरम्यानच्या काळात पाकिस्तानमधून पूर्व पाकिस्तान वेगळा होत बांगलादेशाची निर्मिती झाली होती. बांगलादेशाची निर्मिती झाल्यानंतर उभय देशात झालेल्या १९७२ च्या करारानुसार भारत-बांगलादेश यांच्या संयुक्त समितीद्वारे फराक्का धरणासंबंधी पूरनियंत्रण, पाणीपुरवठा, वीज उत्पादन तसेच नदी खोऱ्याचा विकास आणि भारत-बांगलादेश नदी पाणी वाटपासंबंधी मैत्रीपूर्ण मार्गाने तोडगा काढण्यासाठी सर्वांगीण अभ्यास व्हावा, असे उभय देशांनी मान्य केले होते. १९७५ मध्ये भारत-बांगलादेश यांनी या धरणाच्या प्रश्नाबाबत एक तात्पुरता करार केला, परंतु नंतरच्या काळात बांगलादेशाच्या नेत्यांनी हा करार बांगलादेशाच्या हितसंबंधविरोधी असल्याचे सांगून अमान्य केला. त्यानंतर बांगलादेशाने फराक्का धरणाचा प्रश्न संयुक्त राष्ट्र संघासमोरही नेण्याचा प्रयत्न केला. परंतु हा प्रश्न संयुक्त राष्ट्र संघासमोर गेल्यामुळे तो अधिकच गुंतागुंतीचा बनेल, यामुळे बांगलादेशाच्या अशा प्रयत्नाला भारताने विरोध केला आणि फराक्का धरणाचा प्रश्न परस्पर चर्चेतून सोडण्याचा आग्रह धरला. त्यामुळे उभय देशात चर्चा होऊन भारत-बांगलादेश यांच्या दरम्यान १९७७ मध्ये एक करार करण्यात येऊन या करारानुसार फराक्का धरणाच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी 'संयुक्त नदी पाणी वाटप आयोगाची' (Joint River Commission) स्थापना करण्यात आली.

उभय देशातील नदी पाणीवाटप संयुक्त आयोगाने हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला, परंतु उभय देशांचे समाधान होईल, असा तोडगा या आयोगाला सुचवता आला नाही. त्यामुळे हा प्रश्न भिजत राहिला. दरम्यानच्या काळात भारतात मार्च १९७७ मध्ये जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले. या सरकारने फराक्का धरणाच्या समस्येवर बांगलादेशाशी वाटाघाटी करण्यासाठी ५ नोव्हेंबर १९७७ ला एक करार केला. या करारानुसार फराक्का धरणातून भारताला उन्हाळ्यामध्ये दररोज २0 ते २६ हजार क्युसेक्स पाणी, तर उन्हाळ्याव्यतिरिक्त इतर दिवसात प्रतिदिन ३0 ते ४0 हजार क्युसेक्स पाणी देण्याचे ठरविण्यात आले. वास्तवात या करारानुसार जे पाणी कलकत्ता बंदरामध्ये सोडण्यात येणार होते, त्यामुळे कलकत्ता बंदराची गरज पूर्णपणे भागणार नसली तरीदेखील फराक्का धरणाची समस्या ही आंतरराष्ट्रीय पातळीवरून भारत-बांगलादेश या उभय राष्ट्रांच्या वाटाघाटी क्षेत्रापुरती

मर्यादित झाली होती. तसेच फराक्का धरणाचा प्रश्न बांगलादेशमधील अंतर्गत राजकारणाच्या दडपणातून मुक्त होण्यास मदत ही झाली होती. अशाप्रकारे तत्कालीन जनता सरकारने दुहेरी दृष्टिकोनातून फरक्का धरणाची समस्या हाताळण्याचा प्रयत्न केला. फराक्का धरणाची समस्या सोडवण्यासाठी उभय देशाकडून अनेकवेळा करार तसेच प्रयत्न करण्यात आले असले तरी, या धरणाचा प्रश्न पूर्णपणे मिटलेला नसल्यामुळे, हे धरण भारत-बांगलादेश यांच्या संबंधातील तणावाचे कारण बनलेले आहे.

फराक्का धरणाबरोबरच भारत-बांगलादेश यांच्या संबंधांमध्ये तिस्ता नदीच्या पाणी वाटपावरून तणाव निर्माण झालेला होता. तिस्ता नदी भारतातील सिक्कीम राज्यात उगम पावते आणि दार्जीलिंग, जलपायगुडी , कूचबिहारमधून ही नदी बांगलादेशात प्रवेश करते. तिस्ता या नदीचे पाणी बांगलादेशाने किती वापरायचे आणि भारताने किती वापरायचे हा वाद उभय देशांमध्ये होता. कारण उभय देशातील शेती सिंचनासाठी तसेच पिण्याच्या पाण्यासाठी तिस्ता या नदीच्या पाण्याचा उपयोग केला जात होता. म्हणून तिस्ता नदीच्या पाणी वाटपासंदर्भात २०११ मध्ये भारत-बांगलादेशात एक महत्त्वपूर्ण करार झाला. हा करार 'तिस्ता-नदी पाणी वाटप करार' म्हणून ओळखला जातो. हा करार उभय देशांसाठी उपयुक्त ठरू शकला असता, परंतु तो पूर्णत्वास येऊ शकला नाही. कारण या कराराला बांगलादेशाशी भौगोलिकदृष्ट्या समिप असणाऱ्या पश्चिम बंगाल या राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी विरोध केला होता, म्हणून पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात हा करार पूर्णत्वास येऊ शकला नाही.

### ३.३.१.३.३ **मूर बेटाची समस्या:-**

भारत-बांगलादेश यांच्या दरम्यान तणाव निर्माण करणारी आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणून मूर बेटाच्या समस्येकडे बघितले जाते. बंगालच्या उपसागरात गंगा नदीच्या मुखाशी भारतापासून ५.२ किलोमीटर अंतरावर भारताच्या सागरी सीमारेषेमध्ये मूर हे बेट आहे, तर बांगलादेशापासून हे बेट ७.५ किलोमीटर अंतरावर आहे. १९७0 मध्ये बंगालच्या उपसागरात चक्रीवादळामुळे मूर या बेटांची निर्मिती झाली होती. मूर या बेटाप्रमाणेच पूर्बाशा व दक्षिण तळपट्टी ही दोन नवी बेटेदेखील बंगालच्या उपसागरात चक्रीवादळामुळे निर्माण झालेली होती. त्यानंतर १९७१ मध्ये मूर बेटाचा शोध भारताने लावला होता. मूर आणि इतर बेटांच्या संदर्भातील मालकी हक्क उभय देशांनी सांगण्यास सुरुवात केली. १९७९ मध्ये मूर या बेटाचे स्थान आणि मालकीहक्क निश्चित करण्यासाठी उभय देशांनी संयुक्तरीत्या सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. मूर हे बेट खनिज संपत्ती आणि मासेमारीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. मूर बेट आणि भारत यांच्यामधील अंतर बांगलादेशापेक्षा कमी असल्यामुळे भारताचा या बेटावरील हक्क बांगलादेशपेक्षा अधिक आहे. असे असतानादेखील १९८१ पासून बांगलादेशाने मूर या बेटावर आपला मालकी हक्क सांगण्यास सुरवात केली होती, त्यामुळे भारत-बांगलादेश दरम्यान मूर बेटाच्या मालकीहक्कावरून तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. मूर बेटाच्या मालकी हक्कावरून बांगलादेशाने आक्रमक धोरण स्वीकारून यासंदर्भात नौदल शक्तीचा प्रयोग करण्यास सुरुवात केली. यानुसार १९८१ मध्ये बांगलादेशाने मूर बेटाकडे नौदलाच्या बोटी पाठवल्या आणि भारताच्या सर्वेक्षण करणाऱ्या बोटींवर हल्ला करण्याचा धाक दाखविला. यावर प्रतिक्रिया म्हणून भारतानेदेखील आपल्या बोटीच्या सुटकेसाठी नौदलाची विनाशिका पाठविली होती, त्यामुळे भारत-बांगलादेशदरम्यान

मूर बेटाच्या मालकीहक्कावरून तणावाची परिस्थिती निर्माण झालेली होती. बांगलादेशचे लष्करी शासक झिया-उर-रहमान यांच्या कालखंडात मूर बेटाच्या मालकीहक्कावरून भारत-बांगलादेश दरम्यान बराच वादंग झाला होता, कारण जनरल झिया यांनी मूर बेटाचा वापर भारतविरोधी प्रचार करण्यासाठी केलेला होता. परंतु अशा संघर्षपूर्ण स्थितीत दोन्ही देशांमध्ये तणाव निर्माण करण्याऐवजी उभय देशांनी मूर बेटाची समस्या सामोपचाराने मिटवण्याचे अखेर मान्य केले, परंतु अद्यापपर्यंत या बेटाची समस्या सुटलेली नाही.

### ३.३.१.३.४ **निर्वासितांची समस्या:-**

भारत-बांगलादेश यांच्यातील परस्परसंबंधात तणाव निर्माण होण्यास बांगलादेशातून भारतात येणारे निर्वासितांचे लोंढे कारणीभूत ठरलेले आहेत. बांगलादेशांमधील सीमावर्ती भागातून भारतात स्थलांतरित होणाऱ्या रहिवाशांमुळे भारत-बांगलादेश यांच्यात बेबनाव निर्माण झालेला आहे. भारत-बांगलादेश सीमावर्ती प्रदेशातील हिंदू, मुस्लिम तसेच चकमा आदिवासी मोठ्या प्रमाणात भारतात स्थलांतरित होत असल्यामुळे भारताच्या सीमावर्ती भागात बांगलादेशी रहिवाशांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. भारताच्या त्रिपुरा, मेघालय या घटकराज्याच्या बांगलादेशाशी लागून असलेल्या सीमालगतच्या प्रदेशात हे निर्वासितांचे लोंढे येत असल्यामुळे भारतीय प्रदेशात सामाजिक तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. निर्वासितांच्या वाढत्या प्रमाणामुळे भारतात मजुरी दरात घट तसेच बेकारीच्या समस्येतही वाढ झालेली आहे. परंतु असे असतानाही बांगलादेशकडून स्थलांतराला उत्तेजन दिले जाते. बांगलादेशातून भारतात येणाऱ्या स्थलांतरितांना रोखण्यासाठी भारताने सीमारेषेवर तारांचे कुंपण घालून तसेच सीमा पहारे वाढवून थांबविण्याचा प्रयत्न केलेला आहे, परंतु ही समस्या सोडविण्यास फारसे यश आतापर्यंत येऊ शकलेले नाही. थोडक्यात भारत-बांगलादेश परस्परसंबंधांमध्ये बांगलादेशी घुसखोर आणि चकमा आदिवासींच्या निर्वासितांचा प्रश्न अडथळा म्हणून उभा राहिलेला आहे. निर्वासितांच्या या समस्येवर उभय देशांनी सामंजस्याने तोडगा काढणे आवश्यक आहे.

### ३.३.१.४ **बांगलादेशातील धार्मिक मूलतत्त्ववाद आणि भारत-बांगलादेश संबंध:-**

भारत-बांगलादेश परस्परसंबंधांमध्ये बांगलादेशात वाढत असलेला धार्मिक मूलतत्त्ववाद प्रमुख अडसर ठरलेला आहे. बांगलादेशामधील धार्मिक मूलतत्त्ववाद हा केवळ बांगलादेशासाठीच नव्हे, तर भारतासाठीदेखील धोक्याचा ठरलेला आहे. १९९१ नंतर बांगलादेशात लष्करी हुकूमशाही संपुष्टात येऊन संसदीय शासनपद्धती प्रस्थापित झालेली असली तरीदेखील बांगलादेशातील कट्टर धार्मिक मूलतत्त्ववाद हा तेथील लोकशाहीसमोर खूप मोठे आव्हान म्हणून उभा राहिलेला आहे. धार्मिक मूलतत्त्ववादामुळे बांगलादेशातील लोकशाहीला अस्थिरतेची नजर लागलेली आहे. थोडक्यात बांगलादेशातील राजकीय अस्थिरतेला धार्मिक मूलतत्त्ववादाची साथ मिळाल्यामुळे बांगलादेशातील लोकशाही अधिक अस्थिर झालेली आहे. त्यामुळे साहजिकच त्यापासून भारताला धोका निर्माण झालेला आहे. शेजारील बांगलादेशामध्ये धार्मिक मूलतत्त्ववादाचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत राहिला तर बांगलादेशांमधील लोकशाहीची जागा धार्मिक राजवट किंवा पुन्हा एकदा लष्करी हुकूमशाही घेण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि कदाचित असे झाल्यास त्याचे गंभीर परिणाम भारताला भोगावे लागतील.

बांगलादेशांमधील अंतर्गत राजकारण हे धर्मनिरपेक्षतावाद विरुद्ध धार्मिक मूलतत्त्ववाद या परस्परविरोधी विचारसरणीमध्ये अडकलेले आहे. बांगलादेशाला धर्मनिरपेक्षतावादी राष्ट्र बनवायचे की एक इस्लामिक राष्ट्र बनवायचे, हा तेथील एक प्रमुख मुद्दा बनलेला आहे. बांगलादेशाच्या पंतप्रधान शेख हसिना आणि त्यांचा आवामी लीग हा राजकीय पक्ष धर्मनिरपेक्षतावादाचे प्रतिनिधित्व करतो, तर दुसरीकडे बेगम खालिदा झिया आणि त्यांचा बांगलादेश नॅशनल पार्टी हा राजकीय पक्ष धार्मिक मूलतत्त्ववादी विचारसरणीचे प्रतिनिधित्व करतो. या दोन राजकीय पक्षांशिवाय जमात-ए-इस्लामी हा एक अतिशय कट्टर धार्मिक मूलतत्त्ववादी राजकीय पक्ष बांगलादेशात अस्तित्वात आहे. बांगलादेशाला जगातील एक कडवे इस्लामिक राष्ट्र बनवणे, हे जमात-ए-इस्लामी या राजकीय पक्षाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. जमात-ए-इस्लामी या राजकीय पक्षाचे दक्षिण आशियातील दहशतवादी संघटनांबरोबर संबंध प्रस्थापित झालेले आहेत. एवढेच नव्हे तर या राजकीय पक्षाच्या अनेक सदस्यांनी पाकिस्तानमध्ये जाऊन दहशतवादाचे प्रशिक्षणदेखील घेतलेले आहे. तसेच आयएसआय (ISI) या पाकिस्तानी गुप्तहेर संघटनेच्या मदतीने या राजकीय पक्षाचे शेकडो सदस्य पाकिस्तानमध्ये दहशतवादी हिंसाचाराचे प्रशिक्षण घेण्यासाठीदेखील गेल्याचे पुरावे आहेत. त्याचप्रमाणे बांगलादेशातील जमात-ए-इस्लामी या राजकीय पक्षाच्या आशीर्वादाने बांगलादेशात हरकत-उल-जिहाद-अल-इस्लामी म्हणजेच 'हुजी' या कट्टर दहशतवादी संघटनेने आपले पाय रोवले आहेत. भारतात मागील काही दिवसात जे दहशतवादी हल्ले झाले, त्या हल्ल्यामध्ये बांगलादेशातील या 'हुजी' संघटनेचा हात असल्याचे सिद्ध झालेले आहे.

बांगलादेशांमधील जमात-ए-इस्लामी या कट्टर धार्मिक मूलतत्त्ववादी राजकीय पक्षाचे सुरुवातीपासूनच पाकिस्तानधार्जीने धोरण राहिले आहे. १९७१ मध्ये बांगलादेश स्वातंत्र्ययुद्धात या राजकीय पक्षाने पाकिस्तानला मदत केली होती. बांगलादेशामध्ये २००१-२००६ याकाळात बेगम खालिदा झिया यांच्या बांगलादेश नॅशनल पार्टीने जमात-ए-इस्लामी या पाकिस्तानधार्जिण्या तसेच मूलतत्त्ववादी राजकीय पक्षाबरोबर युती केलेली होती. साहजिकच बांगलादेशात धार्मिक मूलतत्त्ववादी राजकीय पक्ष सत्तेत असल्यामुळे बेगम खालिदा झिया यांच्या कार्यकाळात बांगलादेशामध्ये भारतविरोधी कारवायांमध्ये वाढ झालेली होती.

बांगलादेशामध्ये धार्मिक मूलतत्त्ववाद आणि कट्टरतावाद यामध्ये अचानक वाढ झालेली नाही, तर त्यापाठीमागे मोठी पार्श्वभूमी आहे. बांगलादेशाच्या निर्मितीपासून म्हणजेच १९७१ पासून अगदी अलीकडे म्हणजे २००५ पर्यंत बांगलादेशामधील प्रत्येक राजकीय नेतृत्वाने मग ते लष्करी हुकूमशहा असो किंवा लोकशाही मार्गाने निवडून आलेले राज्यकर्ते असोत, प्रत्येक राज्यकर्त्याने सत्तेवर आपली पकड मजबूत करण्यासाठी इस्लाम धर्माचा साधन म्हणून वापर केलेला आहे. बांगलादेशातील अवामी लीगचे प्रमुख नेते शेख मुजीबुर रहमान यांना बांगलादेशाच्या निर्मितीचे जनक असे म्हटले जाते. त्यांनी बांगलादेश निर्मितीच्या वेळी धर्म आणि राजकारण याची फारकत केली जाईल, असे स्पष्ट केले होते. परंतु प्रत्यक्षात शेख मुजीबुर रहमान यांच्या हाती बांगलादेशाची सत्ता आल्यानंतर त्यांनी बांगलादेशाच्या राजकारणावर आपली पकड अधिक मजबूत करण्यासाठी इस्लाम धर्माचा साधन म्हणून सर्रास दुरुपयोग केला. शेख मुजीबुर रहमान यांनी बांगलादेशांमधील आपल्या लष्करी हुकूमशाहीला जनतेची अधिमान्यता मिळवण्यासाठी धर्माचा वापर केला. शेख मुजीबुर रहमान

यांची हत्या झाल्यानंतर बांगलादेशाची सत्ता जनरल झिया-उर-रहमान यांच्या हाती आली. झिया-उर-रहमान यांनीदेखील बांगलादेशी लोकांचा पाठिंबा प्राप्त करून देण्यासाठी धर्माचाच वापर केला. जनरल झिया यांच्यानंतर बांगलादेशात सत्तेवर आलेले हुसेन मोहम्मद इर्शाद यांनीदेखील इस्लाम धर्मामुळे बांगलादेशाला जगण्याचा मार्ग तसेच विशेष ओळख प्राप्त होणार आहे, असं म्हणून बांगलादेशाच्या इस्लामीकरणावर अधिकच भर दिला. थोडक्यात त्यांनीदेखील बांगलादेशात इस्लाम धर्माचा वापर राजकीय सत्ता प्राप्त करण्यासाठी केला.

बांगलादेशामध्ये १९९१ मध्ये हुकूमशाही संपुष्टात येऊन लष्करी हुकूमशाहीची जागा लोकशाहीने घेतली. त्यामुळे १९९१ मध्ये बांगलादेशात सार्वत्रिक निवडणुका संपन्न होऊन संसदीय लोकशाही शासनपद्धती अस्तित्वात आली. लष्करी हुकुमशाही जाऊन लोकशाही शासनप्रणाली बांगलादेशामध्ये अंमलात आलेली असली तरीदेखील धर्माचा राजकारणासाठी होणारा गैरवापर बंद झाला नाही. त्यामुळे साहजिकच बांगलादेशातील धार्मिक मूलतत्त्ववाद नष्ट होऊ शकला नाही. बांगलादेशामधील बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी, जमात-ए-इस्लामी तसेच आवामी लीग या सर्वच राजकीय पक्षांनी उघडपणे धार्मिक मूलतत्त्ववादाचा स्विकार केला होता. बांगलादेशात धार्मिक मूलतत्त्ववादाचा आधार घेणाऱ्या जमात-ए-इस्लामी या राजकीय पक्षाचा प्रभाव १९९६ पासून २००१ पर्यंत मोठ्या प्रमाणात वाढलेला होता. कारण याकाळात बांगलादेशातील बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी आणि आवामी लीग या दोन प्रमुख राजकीय पक्षांमधील संघर्षाचा फायदा जमात-ए-इस्लामी या पक्षाने घेऊन तसेच बांगलादेशातील राजकारणात धार्मिक मूलतत्त्ववादाचा आधार घेऊन आपले हातपाय पसरायला सुरुवात केली होती. २००१ नंतर बांगलादेशामध्ये दहशतवादी संघटनांची संख्या आणि प्रभाव सतत वाढत गेलेला दिसून येतो. कारण 'हरकत-उल-जिहाद-ए-इस्लामी' म्हणजेच हूजी ही दहशतवादी संघटना असून तिचे संबंध पाकिस्तानातील आयएसआय तसेच अल-कायदा या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेबरोबर आहेत. म्हणून अशा दहशतवादी संघटनांचा भारताविरुद्ध वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बांगलादेशामधील धार्मिक मूलतत्त्ववाद हा प्रारंभी पासूनच भारताविरुद्ध राहिलेला आहे.

बेगम खालिदा झिया यांच्यानंतर म्हणजेच २००८ पासून बांगलादेशामध्ये शेख हसीना यांचे सरकार सत्तेवर होते. बेगम खालिदा झिया यांच्या काळात बांगलादेशात धार्मिक मूलतत्त्ववाद मोठ्या प्रमाणात वाढलेला होता, तसेच जमात-ए-इस्लामी या पक्षाचा प्रभावदेखील बेगम खालिदा झिया यांच्या काळात बांगलादेशात वाढतच चालला होता. परंतु बांगलादेशात शेख हसीना यांच्या हाती सत्ता आल्यानंतर त्यांनी जमात-ए-इस्लामी या धार्मिक मूलतत्त्ववादी राजकीय पक्षावर अनेक बंधने लादून बांगलादेशाला धार्मिक मूलतत्त्ववादाचा प्रभावापासून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. शेख हसिना यांच्या काळात भारताशी मैत्रीपूर्ण संबंध असल्यामुळे बांगलादेशाच्या भूमीचा वापर भारतविरोधी कारवायांसाठी केला जाणार नाही, हे त्यांनी वारंवार स्पष्ट केले होते. बेगम खालिदा झिया यांच्या कार्यकाळात जमात-ए-इस्लामी हा धार्मिक मूलतत्त्ववादी राजकीय पक्ष, हरकत-उल-जिहाद-अल-इस्लामी म्हणजेच हुजी ही दहशतवादी संघटना आणि या सर्व धार्मिक मूलतत्त्ववादी राजकीय पक्ष आणि संघटनांना अल-कायदा या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेची मदत मिळाल्यामुळे बांगलादेशात दहशतवाद्यांचे मोठे जाळे निर्माण झाले होते. ही धार्मिक मूलतत्त्ववादी आणि दहशतवादी परिस्थिती भारतासाठी अत्यंत धोकादायक होती. बांगलादेशात दिवसेंदिवस धार्मिक मूलतत्त्ववाद वाढत गेल्यास भारत आणि बांगलादेश यांच्यातील विविध समस्या अधिक

गुंतागुंतीच्या किंवा जटील बनण्याची शक्यता नाकारता येत नाही, म्हणून बांगलादेशातील धार्मिक मूलतत्त्ववाद कमी होणे अत्यंत आवश्यक तसेच भारताच्या हिताचे आहे.

### ३.३.१.५ भारत-बांगलादेश व्हिसा आणि गुन्हेगार हस्तांतरण करार:-

भारत-बांगलादेश या शेजारील राष्ट्रांमध्ये २०१३ मध्ये दोन महत्त्वाच्या करारांवर सहमती झालेली आहे. यामधील पहिला करार व्हिसासंदर्भात तर दुसरा करार उभय देशातील गुन्हेगारांच्या हस्तांतरणाच्या संदर्भामध्ये आहे.

भारत-बांगलादेश मधील आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि व्यापारी स्वरूपाचे संबंध अधिक प्रमाणात विकसित होण्यासाठी अनेक वर्षापासून व्हिसा करार व्हावा, अशी मागणी उभय देशांकडून दिली जात होती. म्हणून या मागणीच्या आधारावर उभयतांनी २०१३ मध्ये व्हिसा करार केला. व्हिसा करारामध्ये दोन महत्त्वपूर्ण मुद्द्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यातील पहिला महत्त्वाचा मुद्दा 'मल्टिपल एन्ट्री व्हिसा' हा, तर दुसरा महत्वाचा मुद्दा 'व्हिसा ऑन अरायव्हल' हा आहे. या व्हिसा कराराला भारत-बांगलादेश संबंधातील ट्रॅक टू डिप्लोमसीचा भाग म्हटले जाते. उभय देशात हा करार झाल्यामुळे दोन्ही देशांनी व्हिसासंदर्भात आपल्या धोरणात लवचिकता आणलेली आहे. त्यामुळे भारतातील नागरिक बांगलादेशात आणि बांगलादेशातील नागरिक भारतात व्यापार, शिक्षण, सांस्कृतिक संबंध व इतर कारणाने जाऊ शकतात. या करारामुळे दोन्ही देशातील व्यवसायिक, उद्योगपती, पर्यटक, लहान मुले, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक या सर्वांना व्हिसा मिळण्याची प्रक्रिया सोपी झालेली आहे. याशिवाय भारतातून बांगलादेशात किंवा बांगलादेशातून भारतात औषधोपचारासाठी येणाऱ्या नागरिकांचीही सोय झालेली आहे. तसेच या करारामुळे उभय देशातील नागरिकांचा परस्परांशी संपर्क वाढला यातून परस्परांविषयी विश्वास निर्मितीची प्रक्रियादेखील विकसित होण्यास मदत झालेली आहे. या करारामुळे उभय देशांना परस्परांशी आर्थिक आणि संरक्षण क्षेत्रात भागीदारी निर्माण करण्याची संधी उपलब्ध होणार आहे, त्यामुळे भारत-बांगलादेश यांच्यात झालेल्या व्हिसा कराराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

२०१३ मध्ये भारत-बांगलादेश दरम्यान दुसरा महत्त्वाचा करार उभय राष्ट्रांतील गुन्हेगारांच्या हस्तांतरणासंदर्भात झालेला आहे. उभय राष्ट्रांच्या अंतर्गत सुरक्षिततेच्या दृष्टीने गुन्हेगार हस्तांतरण करार अत्यंत महत्त्वाचा आहे. म्हणूनच व्हिसा कराराप्रमाणे गुन्हेगार हस्तांतरण करार करण्याची मागणी अनेक वर्षापासून उभय देशांकडून सातत्याने केली जात होती. हा करार ईशान्य भारतामधील अस्थिरता आणि असुरक्षिततेच्या परिस्थितीला हाताळण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरलेला आहे. ईशान्य भारतात अस्थिरता आणि असुरक्षितता निर्माण करणाऱ्या विविध फुटीरतावादी संघटनांकडून सीमावर्ती भागातील बांगलादेशाच्या भूमीचा गैरवापर केला जात होता, त्याला या करारामुळे मर्यादा आलेल्या आहेत. उदा. उल्फा (ULFA) या फुटीरतावादी संघटनेने अनेक वर्षापासून ईशान्य भारतात अस्थिरता निर्माण करण्यासाठी बांगलादेशमध्ये आपला तळ तसेच प्रशिक्षण केंद्र निर्माण केलेली आहेत. उल्फा या फुटीरतावादी संघटनेच्या गुन्हेगारांना भारताकडे सोपवणे या करारामुळे शक्य होईल. भारतात दहशतवादी कारवाया करणारे अनेक अतिरेकी बांगलादेशामध्ये लपून बसलेले आहेत. अशा दहशतवाद्यांना भारताकडे हस्तांतरित करणे, या गुन्हेगार हस्तांतरण करारामुळे शक्य होणार आहे. गुन्हेगार हस्तांतरण करारामुळे भारताच्या ईशान्य भागामध्ये शांतता आणि

सुरक्षितता निर्माण होण्यास चांगली मदत होणार आहे. त्यामुळे भारताच्या अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टिकोनातून बांगलादेशाशी झालेला हा करार अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. थोडक्यात भारत-बांगलादेश यांच्यादरम्यान झालेले हे दोन्ही करार उभय देशांसाठी लाभदायक ठरणार आहेत आणि त्यामुळे साहजिकच दोन्ही देशांच्या संबंधातही सुधारणा होण्यास मदत होणार आहे.

**सारांश:-**

बांगलादेशाच्या निर्मितीपासूनच भारत-बांगलादेश यांच्यातील संबंध हे परिस्थितीनुसार प्रस्थापित झालेले आहेत. बांगलादेशाची निर्मिती करून भारताने पाकिस्तानचे गर्वहरण केले होते. बांगलादेशाच्या निर्मितीमध्ये भारताची महत्त्वपूर्ण भूमिका पाहता हा भारताचा राजनयिक विजय, तर पाकिस्तान निर्मितीचा आधार ठरलेल्या द्विराष्ट्र सिध्दांताचा पराभव होता. भारत-बांगलादेश यांच्यात सुरुवातीपासून प्रस्थापित झालेले परस्परसंबंध सीमावाद, नदी पाणी वाटप, फरक्का धरणाची समस्या, मुर बेटाची समस्या, बांगलादेशातून भारतात येणाऱ्या निर्वासितांची समस्या इत्यादींमुळे अनेकवेळा तणावपूर्ण झालेले आहेत. बांगलादेशातील वाढत जाणारा धार्मिक मूलतत्त्ववाद आणि या धार्मिक मूलतत्त्ववादाला तेथील राजकीय पक्ष आणि संघटनांनी घातलेले खतपाणी याचाही परिणाम भारत-बांगलादेश संबंधांवर नकारात्मकरीत्या झाल्याचे दिसून येते. परंतु असे असले तरी अलीकडील काळात भारत-बांगलादेश यांच्या दरम्यान करण्यात आलेले व्हिसा आणि गुन्हेगार हस्तांतरण करार उभय राष्ट्रांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. त्यामुळे दोन्ही देशांच्या संबंधात सुधारणा होण्यासही निश्चित मदत होईल. भारत-बांगलादेश यांच्यातील परस्पर संबंधात अधिकाधिक सहकार्य आणि सामंजस्य निर्माण करण्यासाठी दोन्ही देशातील संबंधात अडथळा ठरणाऱ्या समस्या सामोपचाराने सोडवणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच बांगलादेशातील भूमीचा गैरवापर भारताविरोधी कारवायांसाठी होणार नाही, याची दक्षता बांगलादेशाने घेणे गरजेचे आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) भारत-बांगलादेश संबंध सविस्तर स्पष्ट करा ?

२) भारत-बांगलादेश संबंधातील समस्या स्पष्ट करा ?

३) बांगलादेशातील धार्मिक मूलतत्त्ववादाचा भारत-बांगलादेश झालेला परिणाम सविस्तर लिहा.

४) भारत-बांगलादेश यांच्यातील सीमावाद स्पष्ट करा ?

### ३.३.२ **भारत-नेपाळ संबंध:-**

दक्षिण आशिया आणि भारतीय उपखंडातील शेजारील दोन प्रमुख राष्ट्र म्हणून भारत आणि नेपाळ यांचे परराष्ट्र संबंध प्रस्थापित झालेले आहेत. भारत आणि नेपाळ हे दोन्ही राष्ट्र एकाच भौगोलिक घटकाचे अविभाज्य भाग आहेत. नेपाळ हा देश भौगोलिकदृष्ट्या पूर्णतः जमिनीने वेढलेले (Land Locked Country) आहे. भारताच्या उत्तरेला आणि हिमालयाच्या मुख्य पर्वतरांगेच्या दक्षिणेला असलेला नेपाळ हा जगातील राजेशाही असलेला एकमेव हिंदू धर्मीय

लहान देश आहे. नेपाळच्या उत्तरेला चीनव्याप्त तिबेट असून पूर्व दिशेला भारतातील सिक्कीम व पश्चिम बंगाल, दक्षिण दिशेला बिहार व उत्तर प्रदेश आणि पश्चिमेला उत्तर प्रदेश व हिमाचल प्रदेश ही घटकराज्य आहेत. हिमालयाच्या कुशीत वसलेल्या आणि भारतासाठी सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या असणाऱ्या नेपाळशी भारताचे अनेक वर्षापासून परराष्ट्र संबंध प्रस्थापित झालेले आहेत. भूमी परिवेष्टित (Land Locked Country) नेपाळचा बाह्य जगाशी संबंध फक्त भारत आणि चीन या दोन देशांमधूनच येऊ शकतो. भारत आणि चीन या दोन मोठ्या राष्ट्रांमध्ये स्थिरावलेले नेपाळ एक छोटे राष्ट्र आहे. यासंदर्भात नेपाळ नरेश पृथ्वी नारायण शहा म्हणाले होते की, "Nepal is a Yam Sandwiched between two large stones." इतर देशांशी संपर्क करण्यासाठी नेपाळकडून बहुतेकदा भारतीय भूमीचा वापर केला जातो. म्हणून भारत नेपाळसाठी प्रवेशद्वार ठरलेले आहे. कारण नेपाळला भेट देणारे पर्यटक असो किंवा नेपाळबरोबर व्यापार करण्यासाठी जाणारे व्यापारी असो, त्यांना भारतीय प्रदेशातूनच नेपाळमध्ये जावे लागते. भारत आणि नेपाळ दरम्यानची सीमारेषा ही मुक्त असल्यामुळे नेपाळी नागरिक भारतात आणि भारतीय नागरिक नेपाळमध्ये व्यापार-उद्योगधंद्याच्या निमित्ताने स्थायिक झालेले. नेपाळच्या उत्तर सीमेवर चीनच्या अधिपत्याखाली तिबेटमध्ये चीनने लष्कराचा तळ उभारला आहे. म्हणून भारताला आपल्या उत्तर सीमेचे चीनपासून रक्षण करण्यासाठी नेपाळशी मैत्रीपूर्ण आणि घनिष्ठ संबंध टिकून ठेवणे आवश्यक आहे, अन्यथा जर नेपाळ चीनच्या प्रभावाखाली आला, तर भविष्यात भारताच्या सुरक्षेसाठी मोठे आव्हान उभे राहू शकते, म्हणूनच सुरुवातीपासूनच नेपाळविषयी भारताचा दृष्टीकोन हा अत्यंत उदार, सहकार्य आणि सहानुभूतीचा राहिलेला आहे.

### ३.३.२.१ **भारत-नेपाळ संबंध:-**

प्राचीन काळापासून भारत आणि नेपाळ यांचे धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक तसेच राजकीय क्षेत्रात परस्पर संबंध प्रस्थापित झालेले आहेत. सामरिकदृष्ट्या भारत आणि नेपाळ हे दोन्ही देश एकाच सुरक्षा समूहाचे अविभाज्य घटक असल्यामुळे त्यांच्यातील संबंध सहकार्याचे राहिलेले आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून नेपाळमधील अंतर्गत राजकारणाशी भारताचा घनिष्ठ संबंध आलेला होता. त्यातूनच नेपाळमधील राजघराण्याशी भारताचे परराष्ट्र संबंध प्रस्थापित झालेले होते.

ब्रिटिशांकडून भारताला मिळालेल्या स्वातंत्र्याची म्हणजेच भारतात झालेल्या सत्ता परिवर्तनाची दखल त्यावेळी नेपाळने घेतलेली होती. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळताच भारत आणि नेपाळ दरम्यान पुर्वापार मैत्री संबंध सुरू ठेवण्याचा करार करून त्यास उभय राष्ट्रांनी मान्यता दिलेली होती. काश्मीर प्रश्नावरून १९४८ मध्ये भारत-पाकिस्तान यांच्यात होत असलेल्या संघर्षाच्या वेळी नेपाळने आपली एक सैन्य तुकडी काश्मीर युद्धात भाग घेण्यासाठी भारताला मदत म्हणून पाठवलेली होती. ही मदत करण्याच्या पाठीमागे भारताविषयी सद्भाव व्यक्त करणे, हाच नेपाळ सरकारचा उद्देश होता. जेव्हा नेपाळमध्ये सामंतशाही आणि राजेशाही यांच्यामध्ये १९५० मध्ये जो संघर्ष झाला, त्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर डिसेंबर १९५० मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी नेपाळविषयी आपली भूमिका आणि दृष्टिकोन स्पष्ट करणारे विधान करताना म्हटले होते की," आपल्या सीमेपलीकडे सुरू असलेल्या घडामोडींमुळे स्पष्ट बोलायचे झाले तर, चीन व तिबेटमधील घडामोडींमुळे नेपाळच्या अंतर्गत परिस्थितीत असलेले आमचे हितसंबंध

आणखी जास्त तीव्र व व्यक्तिगत झालेले आहेत. नेपाळमधील सहानुभूतीपूर्ण हितसंबंधाशिवाय आम्हाला आमच्या देशाच्या सुरक्षेचे हितसंबंध सुद्धा आहेत. आम्ही त्या नैसर्गिक तटबंदीचा कोणालाही भंग करू देणार नाही. कारण ती भारताची सुद्धा मुख्य तटबंदी आहे. म्हणून नेपाळच्या स्वातंत्र्याविषयी आम्हाला आदर वाटत असला तरी, आम्ही कोणालाही चूक करू देणार नाही किंवा ती तटबंदी ओलांडण्याची अथवा कमकुवत करण्याची कोणालाही अनुमती देणार नाही, कारण तो आमच्याकरिता सुरक्षाविषयक धोका ठरेल." पंडित नेहरू यांच्या या मतावरून भारताच्या संरक्षणामध्ये नेपाळच्या भूमीचे महत्त्व स्पष्ट होते. नेपाळच्या भौगोलिक स्थानामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणात भारत-नेपाळ संबंधांना विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. भौगोलिक कारणांमुळे इतर राष्ट्रांच्या तुलनेत भारत-नेपाळ यांच्या परस्परसंबंधातून विशेष जवळीकता राहणार आहे, हे सत्य जगातील इतर राष्ट्रांनी जाणून घ्यावे, असे भारताचे पंडित नेहरू यांचे सूचक विधान भारत-नेपाळ यांच्या परस्पर संबंधातील अपरिहार्यता स्पष्ट करते.

नेपाळ हे राष्ट्र एकीकडे भारत, तर दुसरीकडे रशिया व चीन यांच्यातील आघात प्रतिबंधक राष्ट्र होते. म्हणूनच भारताने यादृष्टीने नेपाळचे महत्त्व ओळखलेले होते. पर्यायाने नेपाळशी भारताचे संबंध सहकार्य व मैत्रीपूर्ण असले पाहिजेत, हे ओळखून भारताने सुरुवातीपासूनच तशी पावले उचललेली आहेत. याचाच भाग म्हणून ३१ जुलै १९५० रोजी भारत-नेपाळ यांच्यात एक ऐतिहासिक करार घडून आला. या करारानुसार भारत-नेपाळ यांच्यात कायमस्वरूपी मैत्री असावी, उभय राष्ट्रात शांतता नांदावी, परस्परांचे सार्वभौमत्व आणि स्वातंत्र्याचा सन्मान राखला जावा, उभयतांच्या प्रदेशाचे अबाधित्व कायम राखावे, कोणत्याही शेजारील देशाशी मतभेद किंवा तणाव निर्माण झाल्यास त्याचा परिणाम भारत-नेपाळ संबंधांवर होणार नाही, याची दक्षता परस्परांनी घ्यावी, आर्थिक तसेच औद्योगिक विकासासाठी उभय राष्ट्रांनी परस्परांना सवलती द्याव्यात, भारताकडून गरजेनुसार शस्त्रास्त्रांची आयात करण्याची मोकळीक नेपाळला असावी, अशा महत्त्वपूर्ण तरतुदींचा अंतर्भाव करण्यात आला. १९५० मधील भारत-नेपाळ यांच्यातील या करारानुसार उभय देशांवर बाह्य सत्तेने आक्रमण केल्यास दोन्ही देशांनी परस्पर विचारविनिमय करण्याचे ठरवण्यात आले.

भारत-नेपाळ परस्पर संबंधाचा अभ्यास करत असताना दोन्ही देशांचे भू-राजकीय हितसंबंध तपासणे आवश्यक ठरते. भारत आणि चीन यांच्या दरम्यान असलेले एक अविकसित आणि दुर्बल राष्ट्र म्हणून नेपाळची ओळख होती. चीनने जेव्हा तिबेटवर आक्रमण केले तेव्हापासून नेपाळच्या उत्तर सीमेवर चीन व दक्षिण आणि पश्चिम सीमेवर भारत या दोन बलाढ्य सत्ता परस्पर विरोधात उभ्या होत्या. त्यामुळे या दोन परस्परविरोधी पवित्रा असणाऱ्या देशांच्या शीतयुद्धाचा फटका नेपाळला बसू शकेल आणि या दोन्ही देशांच्या संघर्षात नेपाळचा विनाश होईल, अशी भीती नेपाळला होती. म्हणून सुरुवातीलाच नेपाळ या देशाने आपले परराष्ट्र धोरण ठरवताना सावध पवित्रा घेत खालील उद्दिष्टे निश्चित केली होती;

१) भारत व चीन यांच्यातील शीतयुद्धापासून नेपाळला अलिप्त ठेवणे.

२) चीनला लागून असलेल्या उत्तर सीमेच्या संरक्षणाची व्यवस्था मजबूत करणे.

३) भारत व चीन या राष्ट्रांव्यतिरिक्त इतर राष्ट्रांशी विशेष संबंध प्रस्थापित करणे.

४) अलिप्ततावादी राष्ट्र आणि दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटनेत सक्रिय सहभाग घेणे.

५) भारत व चीन यांना समान अंतरावर राखणे व त्यांच्या संतुलनाद्वारे स्वतःची सुरक्षा कायम ठेवणे.

६) नेपाळमध्ये राजकीय तसेच आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करून त्याचा विकास करणे.

अशाप्रकारे नेपाळने आपल्या परराष्ट्र धोरणाची प्रमुख उद्दिष्टे निश्चित करून आपल्या भौगोलिक स्थानाचा जास्तीत-जास्त फायदा करून घेण्याचा प्रयत्न केला. भारत आणि चीन अशा शेजारील दोन्ही मोठ्या राष्ट्रांकडून आपल्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप होण्याची भीती नेपाळला सतत सतावत होती. म्हणून या दोन्ही राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याशिवाय नेपाळसमोर अन्य पर्याय नव्हता. असे असले तरीदेखील नेपाळने आपल्या भौगोलिक स्थानाच्या फायद्याचा चांगला वापर करून आर्थिक आणि व्यापारी हितसंबंधाच्या रक्षणासाठी भारत आणि चीन या दोन्ही देशांकडून अनेक सवलती तसेच आर्थिक मदत प्राप्त करून घेतलेली आहे. नेपाळमधील सत्ताधीशांनी भारत आणि चीन यांच्यामधील परस्पर संघर्षाचा फायदा उचललेला दिसून येतो. कारण नेपाळने भारत-चीन संघर्षामध्ये कधी चीनधार्जिणे धोरण स्विकारून, तर कधी भारतधार्जिणे धोरण स्विकारून दोन्ही राष्ट्रांकडून फायदा मिळविण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे.

नेपाळमध्ये राणाशाही सत्तेवर असताना भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १७ मार्च १९५० रोजी भारताच्या संसदेत नेपाळविषयक भारताचे धोरण स्पष्ट करताना म्हटले होते की," नेपाळ स्वतंत्र असला तरी भौगोलिकदृष्ट्या तो भारताचा एक भाग आहे. आशिया खंडातील विशिष्ट घटना लक्षात घेता भारत व नेपाळ यांचे हितसंबंध समान आहेत. भारत व नेपाळमध्ये कोणताही लष्करी करार झालेला नसला, तरी नेपाळवर कोणत्याही दिशेने आक्रमण झाले तर, भारत ते सहन करणार नाही. ते प्रत्यक्ष झाले नाही तरी तेथील स्वातंत्र्यावर आघात करणाऱ्या फुटीर चळवळींना चालना व उत्तेजन दिले जाण्याची शक्यता आहे, म्हणून नेपाळने लोकशाही प्रवाहाशी सुसंगती राखावी, असा आम्ही त्यांना सल्ला दिला आहे." नेपाळमध्ये राजेशाही असली तरीदेखील नेपाळ नरेशांनी लोकशाही विचारांशी सुसंगती राखण्याचा सल्ला पंडित नेहरूंनी नेपाळ सत्ताधीशांना दिलेला होता.

१९५० मध्ये नेपाळमधील राणाशाहीविरुद्ध नेपाळ काँग्रेसने उठाव केला होता. या उठावाला भारत आणि नेपाळमधील राजे त्रिभुवन यांनी पाठिंबा दिलेला होता. नेपाळमध्ये राणाशाहीनंतर जानेवारी १९५१ मध्ये राजे त्रिभुवन हे नेपाळचेसत्ताधीश बनले. भारताने केलेल्या यशस्वी मध्यस्थीमुळे राजे त्रिभूवन यांना नेपाळचा नरेश बनता आले. म्हणून त्रिभुवन कालखंडात भारत-नेपाळ यांच्यातील संबंध 'भारताशी विशेष संबंध' म्हणून प्रस्थापित झालेले होते. १९५४ मध्ये नेपाळची राजधानी काठमांडू येथे भारतीय अभियंत्यांनी नेपाळमधील पहिल्या विमानतळाची उभारणी केली. त्याचप्रमाणे १९५५ मध्ये नेपाळमधील काठमांडूपासून भारतीय सीमेवरील रक्सौल पर्यंत 'त्रिभुवन राजपथ' हा रस्ता तयार करण्यात भारताने नेपाळला मदत केली. त्याचप्रमाणे नेपाळला संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्यत्व मिळावे

म्हणून भारताने प्रयत्न केल्यामुळे १९५५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्यत्व नेपाळला प्राप्त झाले. नेपाळ हे राष्ट्र शेजारील चीन या देशाच्या प्रभावाखाली जाऊ नये, म्हणून भारताने नेपाळला भरीव मदत केलेली आहे. तसेच भारत-नेपाळ यांच्यातील दळणवळण सुलभ होण्यासाठीदेखील प्रयत्न केलेले आहेत.

राजे त्रिभुवन यांच्या मृत्यूनंतर १४ मार्च १९५५ रोजी महेंद्र हे नेपाळचे राजे बनले. चीनने आपल्या नकाशात नेपाळ या देशाचा उल्लेख 'चीनचा गमावलेला प्रदेश' म्हणून केला. या पार्श्वभूमीवर नेपाळने चीनशी आपले प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करावेत, यासाठी भारताने नेपाळला प्रोत्साहन दिले. परिणामी २० सप्टेंबर १९५६ रोजी काठमांडू येथे नेपाळ-चीन यांच्यात आठ वर्ष मुदतीचा एक करार करण्यात आला. चीन आणि नेपाळ यांच्यामध्ये हा करार झाल्यामुळे भारताच्या उत्तर सीमेवर वाढणारा चीनचा धोका कमी होण्यास मदत झाली. थोडक्यात भारताची उत्तर सरहद्द सुरक्षित करण्यासाठी भारताने नेपाळ-चीन यांच्यात सलोखा राहावा, यासाठी नेपाळला प्रोत्साहन दिले. नेपाळ नरेश महेंद्र यांच्या कार्यकाळात १९५५ ते १९६० यादरम्यान भारत-नेपाळ संबंध सहकार्य व मैत्रीपूर्ण राहिलेले आहेत. १९५६ मध्ये भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी नेपाळला भेट दिलेली होती. या भेटीदरम्यान नेपाळच्या पंचवार्षिक योजनेला भारताने दहा कोटी रुपये मदत घोषित केली होती. १९६० नंतर मात्र भारत-नेपाळ यांच्या परस्पर संबंधात तणाव निर्माण होण्यास सुरुवात झाली. भारत-नेपाळ यांच्यातील संबंधात तणाव निर्माण होण्यास व्यापार व वाहतूक करार कारणीभूत ठरला. कारण जुलै १९५० मध्ये भारत-नेपाळ दरम्यान झालेला व्यापार व वाहतूक कराराची मुदत १९६० मध्ये संपली असताना भारताने नवीन करार करताना भारताव्यतिरिक्त इतर कोणत्याही देशाशी होणारा व्यापार हा नेपाळच्या परकीय चलन गंगाजळीतून व्हावा आणि तोदेखील केवळ नेपाळी नागरिकांच्या मार्फत व्हावा, त्यावर भारताचे पूर्णपणे निरीक्षण असावे, अशी अट घातलेली होती.

नेपाळमध्ये महेंद्र यांचा कार्यकालानंतर राजा वीरेंद्र यांचा कार्यकाळ सुरू झाला. याकाळात फेब्रुवारी १९७५ मध्ये नेपाळने 'नेपाळ हे शांततेचे क्षेत्र असावे', (Zone of Peace) असा प्रस्ताव भारताकडे मांडला. परंतु नेपाळचा हा प्रस्ताव भारताने फेटाळून लावल्यामुळे भारत-नेपाळ संबंधात तणाव निर्माण होण्यास सुरुवात झाली. हा प्रस्ताव भारताने मान्य केला असता, तर १९५० मधील भारत-नेपाळ करार अर्थहीन ठरला असता. त्यामुळे भारताने हा प्रस्ताव मान्य केला नाही. याउलट भारताने असे म्हटले की, तिबेट हे शांततेचे क्षेत्र असावे, हे तत्व जर चीनने मान्य केले आणि तेथून आपले सैन्य परत घेतले, तरच नेपाळच्या प्रस्तावावर भारत विचार करू शकतो. नेपाळने मांडलेल्या शांतता क्षेत्राच्या प्रस्तावामध्ये खालील बाबींचा समावेश केलेला होता ;

१) नेपाळ इतर राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात कोणताही हस्तक्षेप करणार नाही.

२) शेजारील राष्ट्रांबरोबरचे सर्व संघर्ष नेपाळ सतत शांततामय मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न करेल.

३) सर्व शेजारील राष्ट्रांशी नेपाळचे संबंध शांततेचे आणि मैत्रीपूर्ण राहतील. नेपाळ इतर राष्ट्रांशी शांततामय सहजीवनाचा आधारे व्यवहार करील.

४) नेपाळच्या भूमीवरून इतर राष्ट्रांचे राजकीय स्वातंत्र्य आणि भौगोलिक एकात्मतेला धोका पोहोचेल, असे कोणतेही कृत्य करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

५) नेपाळमध्ये कोणत्याही राष्ट्राला लष्करी तळ उभारण्याची परवानगी दिली जाणार नाही, तसेच नेपाळ हे राष्ट्र कोणत्याही लष्करी कराराचा भाग बनणार नाही.

भारताच्या प्रभावापासून मुक्त होण्यासाठी नेपाळने उचललेले एक पाऊल म्हणून नेपाळच्या या शांतता प्रस्तावाकडे बघितले जाते. भारताने नेपाळच्या या शांतता प्रस्तावाला जर मान्यता दिली असती, तर नेपाळमध्ये भारताचे कोणतेही हितसंबंध गुंतलेले नाहीत, हे स्पष्ट झाले असते आणि नेपाळलाही हेच हवे होते. म्हणूनच नेपाळने हा प्रस्ताव सादर केलेला होता. नेपाळने मांडलेल्या या शांतता क्षेत्राच्या प्रस्तावातील बहुतेक तरतुदी १९५० मधील भारत-नेपाळ यांच्या करारामध्ये समाविष्ट असल्याचे मत भारताने व्यक्त केल्यामुळे, अशाप्रकारचा नवीन प्रस्ताव तयार करण्याची नेपाळला आवश्यकता नाही, असे भारताकडून स्पष्ट करण्यात आले होते. नेपाळच्या या प्रस्तावाला चीन आणि त्याच्या मित्र राष्ट्रांनी समर्थन दिले होते, त्यामुळे सहाजिकच या प्रस्तावाच्या पाठीमागे चीनची प्रेरणा होती, हे स्पष्ट होते. नेपाळने हा प्रस्ताव देण्यापाठीमागे आणखी एक महत्त्वाचे कारण होते, ते म्हणजे १४ एप्रिल १९७५ रोजी सिक्किम हे नेपाळच्या शेजारील घटकराज्य भारतात समाविष्ट करणे होय. सिक्किम हे घटकराज्य भारतात समाविष्ट करण्यावरून नेपाळ साशंक झाला असावा आणि म्हणूनच शांतता क्षेत्राचा प्रस्ताव नेपाळने भारताकडे मांडल्याचे समजले जाते. सिक्किम प्रकारामुळे नेपाळमध्ये भारतविरोधी आंदोलने झाली. तसेच भारताच्या हेतूविषयी शंका निर्माण झाल्या.

राजा वीरेंद्र यांनी भारत-नेपाळ यांच्या संबंधात सुधारणा करण्याच्या उद्देशाने दिल्ली येथे भेट दिलेली होती. भारतातील जनता पक्षाच्या कार्यकाळात १९७७ मध्ये भारताचे परराष्ट्रमंत्री श्री अटलबिहारी वाजपेयी यांनी नेपाळला भेट देऊन दोन्ही देशांचे संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न केले होते. याच काळात भारताने नेपाळला भरीव आर्थिक मदत देण्याची घोषणा करून सुमारे १८० कोटी रुपये मदतदेखील केलेली होती. १९७६ मध्ये भारत-नेपाळ यांनी व्यापार आणि दळणवळण विषयी करार करून परस्पर संबंध वृद्धिंगत केले होते. १९७८ मध्ये भारत-नेपाळ यांच्या व्यापारविषयक करारात बदल करून नेपाळला इतर देशांशी व्यापार करण्याची सवलत देण्यात आली, परंतु १९८९ मध्ये जेव्हा या कराराची मुदत संपली, तेव्हा या कराराच्या नूतनीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. परंतु या कराराच्या नूतनीकरणासंदर्भात भारत-नेपाळ यांच्यात मतभेद निर्माण झाले, कारण या करारामुळे नेपाळवर अन्याय होत असून त्यामध्ये बदल करण्यात यावा, अशी मागणी नेपाळकडून केली गेली. परंतु भारताला नेपाळची ही मागणी मान्य नसल्यामुळे या कराराचे वेळेत नूतनीकरण होऊ शकले नाही. पर्यायाने कराराची मुदत संपली आणि भारत-नेपाळ व्यापार बंद पडला. नेपाळशी व्यापार करण्यासाठी असणारे दळणवळणाचे मार्ग बंद करण्यात आल्यामुळे नेपाळला जीवनावश्यक वस्तूंच्या टंचाईला तोंड द्यावे लागले. त्यामुळे नेपाळमध्ये भारताच्या विरोधी परिस्थिती निर्माण झाली.

१९८० मध्ये भारतात श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्यानंतर भारत-नेपाळ यांच्या संबंधात तणाव निर्माण झाला नाही, परंतु असे असले तरीदेखील नेपाळमध्ये चीनचा प्रभाव मात्र याकाळात वाढत गेला. भारतात राजीव गांधी हे पंतप्रधान असताना डिसेंबर १९८८ मध्ये इस्लामाबाद येथे सार्क राष्ट्रांचे संमेलन आयोजित करण्यात आले होते. या ठिकाणी

नेपाळचे नरेश वीरेंद्र यांना राजीव गांधी यांनी अल्पोपहाराचे निमंत्रण दिले होते, परंतु त्याचा त्यांनी स्विकार केलेला नव्हता. परिणामी भारत-नेपाळ यांच्यातील परस्पर संबंधात गैरसमज आणि तणाव याकाळात वाढत गेला. ऑगस्ट १९८९ मध्ये भारत-नेपाळ यांच्यामध्ये वाटाघाटी करण्यासाठी नेपाळने भारताचे परराष्ट्र मंत्री श्री पी. व्ही. नरसिंहराव यांना नेपाळ भेटीचे निमंत्रण दिले होते. या भेटीमुळे भारत-नेपाळ यांचे संबंध सुधारण्यास मदत झाली. नरसिंहराव यांच्या नेपाळ भेटीमध्ये सप्टेंबर १९८९ मध्ये बेलग्रेड येथे होणाऱ्या अलिप्त राष्ट्रांच्या परिषदेमध्ये भारताचे पंतप्रधान श्री राजीव गांधी आणि नेपाळचे राजे वीरेंद्र यांची भेट घेण्याचे निश्चित करण्यात आले. यानुसार बेलग्रेड येथे ४ ते ६ सप्टेंबर १९८९ याकाळात श्री राजीव गांधी आणि राजे वीरेंद्र यांच्या दरम्यान वाटाघाटी करण्यात आल्यामुळे भारत-नेपाळ यांच्यातील तणाव काही प्रमाणात कमी होण्यास मदत झाली. नेपाळमध्ये लोकशाही पद्धत अमलात यावी, यासाठी नेपाळी जनतेने १९९० मध्ये आंदोलन केले होते. परिणामी नेपाळ नरेश वीरेंद्र यांनी नेपाळी जनतेच्या भावनेला मान देऊन नेपाळमध्ये निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला. अशाप्रकारे नेपाळमध्ये निवडणुका घेण्यात आल्यानंतर श्री भट्टराय हे जून १९९० मध्ये नेपाळचे पंतप्रधान बनले. श्री भट्टराय यांनी १९९० मध्ये भारताला भेट देऊन भारताशी विविध विषयांवर नवीन करार केले. याकाळात भारत-नेपाळ यांच्यातील परस्परसंबंध सुरळीत होण्यास सुरुवात झाली. भारत-नेपाळ यांच्या संबंधांमध्ये १९९० चे दशक हे महत्त्वपूर्ण ठरलेले आहे, कारण या दशकात उभय देशांचे संबंध सुधारण्यास मदत झाली. याच काळात नेपाळमध्ये लोकशाही शासनव्यवस्थेला सुरुवात झाल्यामुळे साहजिकच भारत-नेपाळ यांच्या परस्परसंबंधातून सहकार्य प्रस्थापित होऊन उभय राष्ट्रांतील तणाव कमी होण्यास मदत झाली. अगदी प्रारंभापासून म्हणजेच भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून ते आजपर्यंत भारत-नेपाळ यांच्यातील परस्परसंबंध हे पूर्णतः तणावपूर्ण किंवा पूर्णतः सहकार्याचे कधीच राहिलेले नाहीत, तर उभय राष्ट्रांच्या परस्परसंबंधांमध्ये अनेकदा चढ-उतार दिसून येतात.

१२ जुलै २020 रोजी बिहार राज्यातील भारत-नेपाळ सीमेवर नेपाळी पोलिसांकडून गोळीबार करण्यात आला होता. तसेच नेपाळचे पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी भारतातील कोरोना व्हायरस अधिक घातक असल्याचे विधान केले होते, यामुळे उभय देशात तणाव निर्माण झाला होता.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारत-नेपाळ परस्पर संबंधाचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या काळापासून अगदी वर्तमान पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळापर्यंत भारताने स्विकारलेल्या नेपाळविषयक विशिष्ट धोरणामुळे नेपाळ हा देश भारतापासून दुरावत चाललेला आहे. भारत-नेपाळ यांच्यातील द्विपक्षीय संबंधात सकारात्मक परिवर्तन करण्यास केवळ भारतालाच नव्हे तर उभय राष्ट्रांना पूर्ण यश येऊ शकलेले नाही. नवस्वतंत्र भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये पंतप्रधान पंडित नेहरू यांनी भारत-पाकिस्तान संबंध, अलिप्ततावादी राष्ट्रांचे नेतृत्व करण्याची महत्वकांक्षा, अमेरिका-रशिया यांच्यातील शीतयुद्धाचे राजकारण, विविध लष्करी संघटनांच्या स्थापनेमुळे निर्माण झालेला तणाव, आफ्रो-आशियाई राष्ट्राचे ऐक्य इत्यादी बाबींना प्राधान्य दिलेले होते. पंडित नेहरुंनी आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये भारताशेजारील राष्ट्रांबरोबर संबंधात सुधारणा करण्यापेक्षा जगातील सर्व गरीब आणि अविकसित राष्ट्रांचे हितसंबंध जोपासण्याला महत्त्व दिलेले होते. त्यामुळे दक्षिण आशियाई किंवा भारतीय

उपखंडातील राष्ट्रांच्या हितसंबंधाच्या रक्षणाकडे दुर्लक्ष झाले. काही आंतरराष्ट्रीय अभ्यासकांच्या मते, पंडित नेहरू यांनी आपल्या शेजारील राष्ट्रांचे सहकार्य गृहीत धरलेले होते. तसेच या शेजारील राष्ट्रांचे अस्तित्व हे भारतावर अवलंबून असल्यामुळे भारताशिवाय या राष्ट्रांना पर्याय नाही, असा देखील नेहरूंचा विश्वास होता. भारताच्या शेजारील नेपाळ तसेच भूतान या राष्ट्रांचे भारतावरील परावलंबित्व पंडित नेहरूंच्या अशा विश्वासाला जबाबदार ठरले होते. पंडित नेहरू यांच्या परराष्ट्र धोरणाचा तसेच राजनयाचा खूप मोठा भाग हा पाकिस्तानची बरोबरी करण्यात आणि पाकिस्तान कसा चूक आहे आणि आम्ही कसे बरोबर आहोत, हे आंतरराष्ट्रीय समुदायाला दाखवून देण्यातच खर्च झाला, असाही निष्कर्ष अनेक आंतरराष्ट्रीय अभ्यासकांनी मांडलेला आहे. याउलट अभ्यासकांच्या मते, पंडित नेहरू यांनी जर आपल्या शेजारील राष्ट्रांबरोबरचे संबंध सहकार्यातून अधिक घनिष्ठ केले असते, तर भारताला पाकिस्तान आणि चीन या राष्ट्रांविरुद्ध नेपाळ व इतर शेजारी राष्ट्रांची सहानुभूती भारताच्या पाठीशी उभी करता आली असती, परंतु असे करण्यात नेहरूंना यश येऊ शकले नाही.

पंडित नेहरू यांना चीन आणि पाकिस्तान ही भारताची शत्रू राष्ट्रे नेपाळ तसेच भूतान या देशांच्या भूमीचा वापर भारतविरोधी कारवाया करण्यासाठी करू शकतील आणि भारताच्या अंतर्गत सुरक्षिततेला आव्हान देऊ शकतील, असे त्याकाळात केव्हाही वाटले नाही. परंतु पंडित नेहरू यांच्या या विश्वासाला १९६२ मध्ये जेव्हा चीनने भारतावर आक्रमण केले, तेव्हा तडा गेला. पर्यायाने भारत-चीन युद्धानंतर उत्तरेकडील सीमारेषेच्या संरक्षणाबाबत भारत आणि तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू हे अधिक संवेदनशील बनले. पर्यायाने साहजिकच भारताच्या परराष्ट्र धोरणातील शेजारील छोट्या राष्ट्रांचे म्हणजेच नेपाळ व भूतान यांचे महत्त्व वाढले. भारत-नेपाळ यांच्या परस्परसंबंधांमध्ये भारताविषयी नेपाळला असणारी भीतीची भावना आजपर्यंत दूर करण्यात भारत यशस्वी ठरलेला नाही. १९५० मध्ये झालेल्या भारत-नेपाळ करारानुसार नेपाळचे भारतावरील परावलंबित्व वाढलेले आहे आणि त्यामुळे भारत नेपाळच्या कारभारात हस्तक्षेप करेल, अशी भीती नेपाळला सतत वाटत आलेली आहे. नेपाळच्या या भीतीचे भांडवल चीन आणि पाकिस्तान या भारताच्या शत्रू राष्ट्रांनी करून घेतले आणि नेपाळच्या भीतीला अधिक खतपाणी घातलेले आहे. भारत-चीन यांच्यातील संघर्षाचा फायदा घेत नेपाळने आपले आर्थिक आणि व्यापारी हितसंबंध जपलेले आहेत. कारण भारत-चीन संघर्षाचा गैरफायदा घेत नेपाळने परिस्थितीनुसार कधी चीनधार्जीने धोरण, तर कधी भारतधार्जीने धोरण स्विकारून स्वतःचा अधिकाधिक फायदा करून घेतलेला आहे.

### ३.३.२.२ **भारत-नेपाळ परस्परसंबंधाचे नवीन पर्व:-**

भारत-नेपाळ यांच्या परस्परसंबंधामध्ये अलीकडील काळात नवीन पर्वाला सुरुवात झालेली आहे. भारताचे पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल हे १९९७ मध्ये नेपाळ देशाच्या दौऱ्यावर गेले होते. इंद्रकुमार गुजराल यांच्यानंतर २००२ मध्ये पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी हे प्रत्यक्ष नेपाळ देशाच्या दौऱ्यावर गेले नसले, तरीदेखील काठमांडू येथे दक्षिण आशियाई देशांच्या सार्क परिषदेला ते उपस्थित राहिले होते. म्हणून या परिषदेच्या निमित्ताने भारत-नेपाळ यांच्या राष्ट्रप्रमुखांची भेट झालेली असली तरीदेखील उभयतांचे परराष्ट्रीय संबंध प्रस्थापित होतील, अशाप्रकारची कोणतीही चर्चा यावेळी झालेली नव्हती. २०१४ मध्ये भारताचे

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नेपाळ देशाच्या दोन दिवसीय दौऱ्यावर गेले होते. यावरून हे स्पष्ट होते की, १९९७ नंतर २०१४ मध्ये भारताचे पंतप्रधान नेपाळच्या दौऱ्यावर गेले. म्हणजेच नरेंद्र मोदी हे १७ वर्षानंतर नेपाळच्या दौऱ्यावर जाणारे पंतप्रधान ठरले. या दौऱ्यात नरेंद्र मोदी यांनी नेपाळच्या संसदेला संबोधित केलेले होते. आतापर्यंत नेपाळच्या इतिहासामध्ये नेपाळच्या संसदेत नेपाळबाहेरील म्हणजेच परराष्ट्राच्या केवळ दोन नेत्यांची भाषणे झालेले आहेत, त्यामध्ये पहिले भाषण जर्मनीचे चान्सलर हेल्मेट कौल यांचे, तर दुसरे भाषण भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे झालेले आहे. अलीकडील काळात पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल, अटलबिहारी वाजपेयी आणि नरेंद्र मोदी यांनी केलेल्या नेपाळ दौऱ्यामुळे भारताची नेपाळ राष्ट्राबाबत असलेली असंवेदनशीलता तसेच नेपाळचे भारताबाबत असलेले विविध गैरसमज दूर होण्यास मदत झालेली आहे. त्यामुळे अलीकडील काळात भारत-नेपाळ यांच्यामध्ये परस्परसंबंधाचे एक नवीन पर्व सुरू झालेले आहे. भारत-नेपाळ परस्पर संबंधाचा इतिहास पाहता हे स्पष्ट होते की, नेपाळ या राष्ट्राचा भारतावर असलेला विश्वास कमी होत चाललेला आहे, म्हणून अलीकडील काळात नेपाळ या राष्ट्राला विश्वासात घेण्याचा प्रयत्न भारताकडून केला जात आहे. याचाच एक भाग म्हणून २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेपाळला भेट दिलेली होती. नेपाळचे पंतप्रधान सुशील कोईराला यांची भेट घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत-नेपाळ यांच्यातील नवीन मैत्रीच्या पर्वाला प्रारंभ केला.

भारत-नेपाळ यांच्या दरम्यान १९५० मध्ये पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या काळात जो करार झालेला होता, त्यानुसार नेपाळने आपले परराष्ट्र धोरण आखताना संरक्षण संबंधाबाबतचे धोरण ठरवतांना, इतर राष्ट्रांशी संरक्षणविषयक करार करताना किंवा शस्त्रखरेदी करताना भारताची परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले होते. वरील सर्व बाबी करण्यासाठी नेपाळवर बंधने टाकण्यात आलेली होती. त्यामुळे हा करार म्हणजे नेपाळच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करणारा करार आहे, अशी भावना नेपाळची झालेली होती. थोडक्यात १९५० च्या करारातील तरतुदिंमुळे भारत-नेपाळ परस्परसंबंधांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले होते. म्हणून भारताविषयी नेपाळच्या मनात निर्माण झालेले संशयाचे वातावरण दूर करण्यासाठी १९५० च्या करारामध्ये बदल करण्यास भारत तयार असल्याचे सूतोवाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेपाळच्या संसदेत भाषण करताना केले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला नेपाळच्या अंतर्गत कारभारामध्ये हस्तक्षेप करण्यात कोणताही रस नसून भारत नेपाळसोबत समानतेच्या तत्त्वावर परस्परसंबंध प्रस्थापित करण्यास इच्छुक आहे. तसेच नेपाळचे स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व अबाधित कसे राहील, यासाठी भारत सदैव प्रयत्न करेल, असे स्पष्ट करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेपाळच्या मनातील भारताविषयी असणारी संशयाची भावना कमी करण्याचा प्रयत्न केला. १९५० मध्ये झालेला जो करार नेपाळला अन्यायकारक वाटत होता, त्या करारामध्ये प्रथमच भारताकडून अधिकृतरित्या बदल करण्याची तयारी दाखवण्यात आलेली आहे. त्यामुळे ही घटना भारत-नेपाळ संबंधावर सकारात्मक परिणाम करणारी ठरणार आहे. साहजिकच त्यामुळे भारतावरचा नेपाळचा विश्वास वृद्धिंगत होण्यास मदत होईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेपाळमधील साधनसंपत्तीचा विकास करण्यासाठी एक अब्ज डॉलर एवढी भरघोस आर्थिक मदत नेपाळला करण्याची घोषणा नेपाळ भेटीप्रसंगी केली होती. नेपाळच्या आर्थिक विकासामध्ये भारताचे आर्थिक हितसंबंध गुंतलेले असल्यामुळे भारताचा

सध्या नेपाळसोबत असणारा ४४१ दशलक्ष डॉलरचा व्यापार एक अब्ज डॉलरपर्यंत नेण्याची इच्छा यावेळी पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केली.

नेपाळचा दुसरा बलाढ्य शेजारी चीन याने नेपाळमध्ये आपला प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढवण्यास सुरुवात केली आहे. भारत-नेपाळ यांच्यामध्ये ज्याप्रमाणे मुक्तरेषा आहे, तशीच मुक्तरेषा नेपाळ-चीन यांच्यामध्ये तिबेटच्या रूपाने आहे. या मुक्तसीमारेषेला चीनपासून तिबेटची राजधानी लासा यामार्गे काठमांडूपर्यंत रस्तेनिर्मिती व रेल्वेमार्ग उभारणीचे काम केलेले आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेपाळ भेटीदरम्यान हायवे, इन्फॉर्मेशन आणि ट्रान्सपोर्ट (HIT) हा प्रकल्प हाती घेऊन भारत-नेपाळ यांना विविध मार्गांनी जोडण्याचे काम हाती घेतले आहे. थोडक्यात अलीकडील काळात भारत-नेपाळ यांच्या संबंधांमध्ये नवीन पर्वाला प्रारंभ झालेला आहे.

### ३.३.२.२.१ **भारत-नेपाळ जलविद्युत करार:-**

जलविद्युत कराराच्या निमित्ताने भारत-नेपाळ यांच्यात परस्परसंबंध प्रस्थापित झाले आहेत. भारत-नेपाळ यांच्यातील परराष्ट्र संबंधाच्या नवीन पर्वाला सुरुवात होण्यापूर्वी उभय देशात वीज व्यापार संबंधात काही करार करण्यात आलेले होते. यापैकी पॉवर कार्पोरेशन ऑफ इंडिया या भारतातून वीज निर्यात करणाऱ्या कंपनीशी नेपाळ सरकारने एक करार केलेला होता. भारताने यानंतरच्या काळात नेपाळशी जलविद्युत निर्मितीसंदर्भातील करार करून नेपाळसोबत संबंध प्रस्थापित केलेले आहेत. भारत-नेपाळ यांच्यामध्ये शारदा, कोसी, गंडक, महाकाली आणि करवाली या नद्यांच्या पाणीवाटपाचे करार झालेले आहेत. नदी पाणी वाटप करार करत असतानाच त्यामध्ये जलविद्युत निर्मिती आणि व्यापार यांची तरतूद करण्यात आली होती. परंतु भारताविषयी नेपाळमध्ये असलेल्या गैरसमजातून या कराराची अंमलबजावणी झालेली नव्हती. नेपाळमधील राजेशाहीने जाणीवपूर्वक नेपाळच्या जलविद्युत निर्मिती क्षमतेचा विकास केलेला नव्हता. कारण नेपाळमधून भारतात वाहत येणाऱ्या नद्यांमुळे या नद्यांवर जलविद्युत निर्मिती प्रकल्प उभारल्यास त्याचा बहुतांश फायदा आपल्यापेक्षा भारतच अधिक घेईल आणि भविष्यात या जलविद्युत निर्मिती प्रकल्पांवर भारत आपली मक्तेदारी निर्माण करेल, अशी भीती नेपाळच्या मनामध्ये होती. म्हणून जाणीवपूर्वक नेपाळने जलविद्युत निर्मिती प्रकल्प उभारले नाहीत. नेपाळमध्ये सुमारे ४२ हजार मेगावॅट जलविद्युत निर्मितीची क्षमता आहे. परंतु असे असतांनाही नेपाळमध्ये ६00 मेगावॅट इतकीच जलविद्युत निर्मिती केली जाते. याचाच अर्थ भारत-नेपाळ यांच्यात जलविद्युत निर्मिती करार होण्यापूर्वी नेपाळच्या एकूण जलविद्युत निर्मिती क्षमतेच्या केवळ पाच टक्केच जलविद्युत निर्मिती केली जात होती. भारत-नेपाळ यांच्यात नवीन जलविद्युत करार होण्यापूर्वी जो जलविद्युत करार करण्यात आलेला होता, त्या करारामध्ये भारताने अशी अट घातली होती की, भारत हा भविष्यामध्ये असा एकमेव देश असेल की, जो नेपाळमध्ये जलविद्युत क्षेत्रात आर्थिक गुंतवणूक करेल. भारताशिवाय इतर कोणत्याही देशाला नेपाळमधील जलविद्युत क्षेत्रात गुंतवणूक करता येणार नाही. भारताने घातलेल्या या अटीमुळे नेपाळमधील माओवाद्यांनी भारताच्या या भूमिकेवर टीका करून भारत भविष्यात पुन्हा नेपाळवर आपला अधिक प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे अधोरेखित केले होते. भारताने नेपाळसोबत केलेल्या जलविद्युत निर्मिती करारासंदर्भात अट घालण्याच्या पाठीमागे प्रमुख कारण शेजारील चीन या देशानेदेखील नेपाळमध्ये वीजनिर्मिती प्रकल्पाचे काम हाती घेण्याच्या

हालचाली सुरू केलेल्या होत्या आणि भारताला नेपाळमधील जलविद्युत निर्मिती क्षेत्रात चीनचा प्रवेश नको होता, हे होते.

अलीकडील काळात भारत-नेपाळ यांच्या परस्पर संबंधात नवीन पर्वाला सुरुवात झाली. म्हणून २०१४ मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या नेपाळ दौऱ्यात भारत-नेपाळ यांच्या दरम्यान महत्त्वपूर्ण जलविद्युत निर्मिती करारावर स्वाक्षरी करण्यात आली. भारताच्या परराष्ट्र मंत्री श्रीमती सुषमा स्वराज यांनीदेखील २०१४ मध्ये केलेल्या नेपाळ दौऱ्यात जलविद्युत निर्मिती करारासंदर्भातील भारताविषयी नेपाळचे असलेले गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नाचा एक भाग म्हणून जलविद्युत निर्मिती करारात भारताने घातलेली अट काढून टाकण्यात आली आणि भारत-नेपाळ यांच्यात नवीन जलविद्युत निर्मिती करार करण्यात आला. या नवीन करारामुळे नेपाळची मानसिकता बदलण्यास भारताला यश आले. या नवीन जलविद्युत करारानुसार नेपाळ स्वतःला आवश्यक असणारी वीज वापरून अतिरिक्त ठरणारी विज विक्री करू शकणार आहे. थोडक्यात भारताच्या आर्थिक मदतीने नेपाळमध्ये जलविद्युत निर्मिती प्रकल्प उभे करून त्यामाध्यमातून नेपाळ स्वतःची वीजेची गरज भागवून अतिरिक्त विजेची विक्री करू शकेल आणि यातून नेपाळला स्वतःचा आर्थिक विकास साधता येईल. अशाप्रकारे भारत-नेपाळ यांच्यात झालेल्या नवीन जलविद्युत करारामुळे भारत-नेपाळ यांच्यात आर्थिक सहकार्य वाढवून परस्पर संबंधातही सुधारणा होण्यास मदत झालेली आहे.

### ३.३.२.३ **नेपाळमधील माओवादी चळवळ आणि भारत-नेपाळ संबंध:-**

भारत-नेपाळ परस्पर संबंधावर नेपाळमधील माओवादी चळवळीचा परिणाम झालेला स्पष्टपणे दिसून येतो. १९९४ मध्ये पुष्पकमल दहल प्रचंड यांनी नेपाळमध्ये माओवादी पक्षाची स्थापना केली. नेपाळमध्ये सशस्त्र क्रांतीच्या माध्यमातून एकाधिकारशाही निर्माण करण्याच्या उद्देशाने या माओवादी पक्षाची स्थापना नेपाळमध्ये करण्यात आली होती. या माओवादी पक्षाने स्वतंत्र सेना निर्माण करून नेपाळच्या राजेशाही विरुद्ध १२ वर्ष सशस्त्र लढा दिलेला होता. नेपाळमधील दारिद्र्य, बेरोजगारी, दुष्काळ, उपासमार यासारख्या समस्यांनी ग्रस्त असलेल्या शेतकरी आणि कामगार वर्गाचे समर्थन माओवाद्यांना मिळालेले होते. थोडक्यात नेपाळमधील सामान्य शेतकरी आणि कामगारांचे प्रतिनिधित्व माओवादी चळवळीने केलेले होते. या चळवळीने नेपाळमधील शेतकरी, कामगार आणि अन्यायग्रस्तांच्या विविध मागण्या पूर्ण करण्यासाठी हिंसक मार्गाचा अवलंब करण्यास सुरुवात केली होती. माओवादी चळवळीने हिंसक कारवायांचा अवलंब करून स्थानिक जनतेत भीतीयुक्त दरारा निर्माण केलेला होता. माओवादी चळवळीच्या हिंसक कारवायांचे प्रमाण वाढल्यामुळे जनतेतील या चळवळीचा दरारा अधिकच वाढत गेला. कारण ज्यांनी या माओवादी चळवळीला विरोध केला, त्यांच्यावर हिंसक हल्ले करून अमानुषपणे संपवण्याचे सत्र या चळवळीने सुरू केले होते. गनिमी कावा या तंत्राचा वापर करून माओवादी चळवळीने नेपाळमधील पोलिस आणि लष्करी यंत्रणेला हादरे देण्याचे कार्य केले.

नेपाळमधील माओवादी चळवळीच्या खालील प्रमुख मागण्या आहेत;

1) नेपाळमधील राजेशाही व्यवस्था संपुष्टात आणणे.

२)	भारत-नेपाळ यांच्यातील मुक्त सीमारेषा नियंत्रित करणे.

३)	१९५० चा भारत-नेपाळमधील एकपक्षी आणि अन्य करार रद्द करणे.

अशाप्रकारे नेपाळमधील माओवादी चळवळने वरील मागण्या करून १९९० च्या दशकात नेपाळमध्ये आपला दरारा निर्माण केला. त्याचप्रमाणे नेपाळी जनतेत भारतविरोधी राष्ट्रभावना निर्माण केली. नेपाळमधील ही माओवादी चळवळ भारतविरोधी असल्याचे अनेकदा स्पष्ट झालेले आहे. तसेच या चळवळीला चीनचा छुपा पाठिंबा असल्याचे अनेकदा दिसून आलेले आहे. चीनने स्विकारलेल्या भारतविरोधी धोरणाचा परिणाम म्हणून नेपाळमधील माओवादी चळवळीकडे बघितले जाते. कारण या चळवळीद्वारे चीनने नेपाळमध्ये आपला अधिक प्रभाव निर्माण करुन दक्षिण आशियामध्ये भारतविरोधी सत्तासंतुलनाचे राजकारण करण्यास सुरुवात केलेली आहे. म्हणून या माओवादी चळवळीचा प्रसार नेपाळची सीमा पार करून भारतात होऊ नये, यासाठी भारत चिंतातुर आहे. माओवादी चळवळीच्या मागण्या पाहता हेच स्पष्ट होते की, नेपाळ हे जगातील एकमेव हिंदू राष्ट्र आहे आणि या देशात नेपाळचे राजे हे ईश्वराचे अवतार मानले जातात, ही बाब माओवाद्यांच्या विचारसरणीमध्ये न बसणारी आहे. त्यामुळेच नेपाळमधील राजेशाही व्यवस्था नष्ट करण्याची मागणी माओवाद्यांनी केली होती. भारत-नेपाळ यांच्यामधील मुक्त सीमारेषेच्या फायदा पर्यटक, व्यावसायिक, व्यापारी, सामान्य नागरिक या सर्वांना होत होता, परंतु माओवादी चळवळने भारत-नेपाळ यांच्यातील मुक्तरेषा संपुष्टात आणण्याची मागणी केल्यामुळे त्याचा भारत-नेपाळ संबंधावर विपरीत परिणाम झाला. थोडक्यात भारत-नेपाळ यांच्यातील आर्थिक आणि व्यापारी संबंध सहकार्याचे असताना या संबंधांना सुरुंग लावणारी ही माओवादी चळवळ म्हणजे भारत-नेपाळ संबंधातील मोठी डोकेदुखी ठरलेली आहे.

२००६ मध्ये नेपाळमधील माओवादी आणि नेपाळ सरकार यांच्यात एक करार होऊन त्यानुसार माओवाद्यांनी लढ्याचा मार्ग सोडून लोकशाही मार्गाने राजेशाहीविरुद्ध आंदोलन करण्याचे मान्य केले. हा शांतता करार नेपाळमधील माओवादी चळवळीचे नेते प्रचनदा आणि नेपाळचे पंतप्रधान गिरिजाप्रसाद कोइराला यांच्यात होऊन माओवाद्यांनी सशस्त्र संघर्षाऐवजी शांततापूर्ण वाटाघाटीच्या मार्गाचा स्विकार केला. या करारानुसार खालील बाबी ठरवण्यात आल्या;

१)	राजेशाहीविरुद्ध सुरू असलेले माओवाद्यांचा सशस्त्र संघर्ष थांबवण्यात येईल.

२)	नेपाळसाठी नवीन राज्यघटना तयार करण्यासाठी घटनासमिती स्थापन करण्यात यावी.

३)	नेपाळमधील सरकारमध्ये माओवादी सहभागी होतील.

४) ने  पाळ संसदेच्या एकूण ३३० जागांपैकी माओवाद्यांना ७३ जागा दिल्या जातील.

अशाप्रकारे नेपाळमधील माओवादी आणि नेपाळमधील राजेशाही यांच्यामध्ये शांतता करार झालेला असला, तरीदेखील भविष्यामध्ये माओवादी या कराराचे पालन किती करतील, यावर या कराराचे यशापयश अवलंबून आहे. अशाप्रकारे भारत-नेपाळ यांच्या परस्पर संबंधावर नेपाळमधील माओवादी चळवळीचा परिणाम झालेला आहे. खासकरून नेपाळमधील माओवादी चळवळ ही भारतासाठी मोठा चिंतेचा विषय ठरलेली आहे.

### ३.३.२.४ नेपाळमधील लोकशाही आणि भारत-नेपाळ संबंध:-

भारताने सतत आपल्या शेजारील राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण आणि सहकार्याचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. शेजारील देशातील राजकीय स्थैर्य आणि अंतर्गत शांततेचा परिणाम भारतावर होत असल्यामुळे भारताने सतत शेजारील देशांशी सहकार्य व मैत्रिची भूमिका घेतलेली आहे. नेपाळमधील सततच्या राजकीय अस्थिरतेचा सर्वाधिक गैरफायदा पाकिस्तान आणि चीन या भारतविरोधी राष्ट्रांनी घेतलेला आहे. त्यामुळे शेजारील नेपाळमध्ये लोकशाही शासनव्यवस्था प्रस्थापित होऊन नेपाळचा राज्यकारभार जननियुक्त प्रतिनिधींच्या हातामध्ये जावा, अशी सुरुवातीपासून भारताची इच्छा होती. नेपाळमध्ये लोकशाही शासनव्यवस्था प्रस्थापित झाल्यास तेथे राजकीय स्थैर्य आणि शांतता निर्माण होईलच आणि त्यामुळे सहाजिकच नेपाळचे भारताबरोबरचे संबंध मैत्रीचे आणि सहकार्याचे प्रस्थापित होतील, असा आशावाद भारताला यापाठीमागे होता. परंतु नेपाळमधील राजेशाहीला भारताचे हे मत फारसे रुचले नाही, म्हणूनच नेपाळमधील राजेशाहीमध्ये भारतद्वेष वाढू लागला. नेपाळमध्ये लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी भारताकडून करण्यात येणारे प्रयत्न म्हणजेच अप्रत्यक्षरीत्या भारताचा नेपाळच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याचाच हा प्रकार आहे, अशाप्रकारचा गैरप्रचार नेपाळमधील राजेशाहीकडून केला गेला. नेपाळमध्ये लोकशाहीची स्थापना करणे म्हणजे नेपाळमधील राजेशाहीला आपल्या अधिकारावर आक्रमण वाटत होते. थोडक्यात नेपाळमध्ये लोकशाही प्रस्थापित व्हावी, या हेतूने भारताने सदैव प्रयत्न केले, परंतु परिणामी भारताला नेपाळमधील राजेशाहीच्या रोषाला सामोरे जावे लागेल. नेपाळमध्ये लोकशाही प्रस्थापित करण्याविषयीच्या भारताच्या प्रयत्नांमधून १९५९ मध्ये नेपाळमध्ये लोकशाही शासन प्रस्थापित झाले, परंतु ते दुर्दैवाने अल्पजीवी ठरले. नेपाळमध्ये राजेशाही विरुद्ध लोकशाही या संघर्षातून १९९0 मध्ये संसदीय लोकशाही अस्तित्वात आली. फेब्रुवारी २00५ मध्ये नेपाळचे राजे ग्यानेंद्र यांनी पंतप्रधान देउबा यांचे लोकशाही शासन बरखास्त करून नेपाळमध्ये आणीबाणीची घोषणा केली. यावेळी भारताने नेपाळमध्ये झालेल्या लोकशाहीच्या पायमल्लीचा स्पष्टपणे विरोध नोंदवला. यासंदर्भात नेपाळी जनता आणि नेपाळमधील विविध राजकीय पक्षांनी आंदोलन सुरू केले. या आंदोलनाला माओवादी बंडखोरांनीदेखील सहकार्य केले. त्यामुळे शेवटी जून २00६ मध्ये राजा ग्यानेंद्र यांना नेपाळमधली आणीबाणी ठेवण्याची घोषणा करावी लागली. यामुळे पुन्हा एकदा नेपाळमध्ये लोकशाही शासन अस्तित्वात आले आणि गिरिजाप्रसाद कोईराला हे नेपाळचे पंतप्रधान बनले. थोडक्यात नेपाळमध्ये लोकशाही शासनव्यवस्था अस्तित्वात यावी यासाठी भारताकडून करण्यात आलेल्या प्रयत्नांमुळे नेपाळमधील राजेशाही नाराज झाली होती आणि याचाच परिणाम भारत-नेपाळ संबंधांवर झाला होता, परंतु नंतरच्या काळात लोकशाही शासनव्यवस्था नेपाळमध्ये आल्यामुळे भारत-नेपाळ यांच्या संबंधात सुधारणा होण्यास मदत झाली. १२ जुलै २0२0 रोजी बिहार राज्यातील भारत-नेपाळ सीमेवर नेपाळी पोलिसांकडून गोळीबार करण्यात आला होता. तसेच नेपाळचे पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी भारतातील कोरोना व्हायरस अधिक घातक असल्याचे विधान केले होते, यामुळे उभय देशात तणाव निर्माण झाला होता.

### ३.३.२.५ **भारत-नेपाळ संबंधांतील समस्या:-**

भारत-नेपाळ परस्परसंबंध हे अगदी प्रारंभीपासूनच पूर्णतः तणावपूर्ण किंवा पूर्णतः मित्रत्वाचे कधीच राहिलेले नाहीत, तर उभय देशांच्या परस्परसंबंधांत अनेकदा चढ-उतार आलेले दिसून येतात. परस्पर संबंधातील चढ-उतारास अनेक समस्या कारणीभूत ठरलेले आहेत. यामध्ये पहिली प्रमुख समस्या भारत-नेपाळमधील मुक्त सीमारेषेच्या संदर्भातील आहे. भारत आणि नेपाळमध्ये १७५१ किलोमीटर लांबीची सीमारेषा आहे. या सीमारेषेला लागून भारतातील २० जिल्हे तर नेपाळमधील २६ जिल्हे आहेत. उभय राष्ट्रांमधील ही मुक्त सीमारेषा दोन्ही राष्ट्रांच्या संरक्षणाला धोका निर्माण करणारी ठरलेली आहे. भारत-नेपाळमधील मुक्त सीमारेषेचा गैरवापर अनेकवेळा पाकिस्तानने भारतविरोधी विघातक कारवायांसाठी केल्याचे स्पष्ट झालेले आहे. नेपाळमधील माओवादी चळवळीच्या कारवाया वाढल्यानंतर मुक्त सीमारेषेमुळे भारताची चिंता अधिकच वाढलेली होती.

भारत-नेपाळ यांच्या परस्परसंबंधात अडथळा ठरलेली दुसरी एक महत्त्वाची समस्या म्हणजे १९५० मध्ये भारत-नेपाळ यांच्यामध्ये झालेला मैत्री आणि सहकार्याचा एक महत्त्वाचा करार होय. हा करार एकांगी आणि एकपक्षी असून तो नेपाळवर अन्याय करणारा आहे. तसेच नेपाळवरील भारताच्या वाढत्या प्रभावाचे हा करार एक प्रतीक आहे, अशी भावना अनेकवेळा नेपाळमधून व्यक्त झालेली आहे. त्यामुळे या कराराचे पुनर्विलोकन करुन त्यामध्ये बदल घडवून आणावेत, अशी मागणी नेपाळी जनतेकडून करण्यात येत होती. भारत-नेपाळमधील या मैत्री कराराला मुदतवाढ देण्याच्या मुद्द्यावरून नेपाळमध्ये वाद निर्माण झालेला होता, म्हणून नेपाळने भारताशी केलेल्या या करारातून मुक्त व्हायला हवे, अशा स्वरूपाची भावना नेपाळमधून व्यक्त झालेली आहे. परंतु या करारातील तरतुदी पाहता हा करार भारताच्या संरक्षण हितसंबंधांसाठी आवश्यक आहे, म्हणून या कराराचे सातत्य ठेवण्यावर भारत ठाम आहे. थोडक्यात १९५० मधील भारत-नेपाळ करारामुळे भारत-नेपाळ संबंधात तणाव निर्माण झालेला आहे.

नेपाळमधून भारतात वाहत येणाऱ्या शारदा, करवाली, गंडक, कोसी, त्रिशूल, महाकाली या नद्यांच्या पाणी वाटपाचा प्रश्न उभय राष्ट्रांमध्ये निर्माण झालेला आहे. याशिवाय भारत, नेपाळ आणि चीन यांच्या सीमारेषेवर असलेला कालापानी हा एक छोटा भूभाग आहे. १९६२ मध्ये कालापाणी हा भूभाग भारताने आपल्या ताब्यात घेतला होता. हा भूभाग म्हणजेच भारतासाठी तिबेटचे प्रवेशद्वार ठरलेले आहे. या भूभागावर भारताचा ताबा असला तरी या भूभागावर नेपाळने आपला हक्क सांगितलेला आहे. त्यामुळे उभय राष्ट्रात कालापानी भूभागावरील मालकीवरून तणाव निर्माण होत आहे.

भारताविषयी नेपाळ नेहमी साशंक भूमिकेत असल्यामुळे आपल्या अंतर्गत कारभारात भारताकडून हस्तक्षेप केला जाईल, असा हस्तक्षेप आपल्यासाठी धोकादायक ठरेल, अशी भिती नेपाळला आहे. म्हणून दक्षिण आशियामधील भारताचा वाढलेला प्रभाव कमी किंवा संतुलित करण्यासाठी नेपाळने चीनबरोबर आपले संबंध प्रस्थापित केलेले आहेत. नेपाळचे चीनबरोबर प्रस्थापित झालेले किंवा वाढते संबंध भारत-नेपाळ संबंधात तणाव निर्माण करणारे ठरत आहेत. कारण नेपाळचे चीनबरोबर वाढते संबंध, चीनकडून नेपाळला केला जाणारा शस्त्रास्त्र पुरवठा, या बाबी भारतासाठी चिंतेच्या ठरत आहेत. प्रारंभीच्या काळात भारताने

नेपाळला परावलंबी राष्ट्र मानून दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न केला, परिणामी नेपाळ हे राष्ट्र भारताऐवजी चीनकडे झुकले. त्यामुळे भारत-नेपाळ संबंधात तणाव निर्माण झाला.

भारत-नेपाळ यांच्या परस्परसंबंधांमध्ये वरील समस्या अडथळा ठरलेल्या असल्या तरीदेखील उभय देशांचे भौगोलिक स्थान असे आहे की, दोघांनाही परस्परांची सहकार्याची भूमिका घेतल्याशिवाय अन्य पर्याय नाही. दळणवळणासाठी नेपाळला विशेषतः भारतावरच अवलंबून राहावे लागते, कारण नेपाळ हा देश भौगोलिकदृष्ट्या पूर्णतः जमिनीने वेढलेला आहे आणि भारतातूनच या देशाला अन्य देशांशी संपर्क साधता येतो. म्हणून उभय देशांच्या परस्पर संबंधात चढ-उतार आलेला दिसून येतो. भौगोलिकदृष्ट्या भारत आणि चीन या दोन मोठ्या राष्ट्रांमध्ये नेपाळचे स्थान येत असल्यामुळे ते या दोन मोठ्या राष्ट्रांमधील बफर राष्ट्र (Buffer State) बनलेले आहे. भारत आणि चीन या राष्ट्रांमधील बफर राष्ट्र असण्याचा नेपाळ या देशाला फायदाही झाला आणि तोटाही झालेला आहे.

**सारांश:-**

भारत-नेपाळ परस्पर संबंधाला खूप मोठा ऐतिहासिक वारसा आहे. परंतु असे असले तरी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून ते आजतागायत भारत-नेपाळ यांच्यातील परस्परसंबंध हे पूर्णतः मैत्री व सहकार्याचे किंवा पूर्णतः तणावपूर्ण राहिलेले नाहीत, तर उभय देशांच्या संबंधांमध्ये अनेकदा चढ-उतार आलेले आहेत. भारत-नेपाळ यांचे भौगोलिक स्थान निसर्गाने असे निर्माण केलेले आहे की, उभयतांना परस्पर सहकार्य करण्याशिवाय किंवा परस्परांवर अवलंबून राहण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. प्रारंभी नेपाळचे भारतावरील परावलंबित्व लक्षात घेऊन भारताने नेपाळकडे दुर्लक्ष करून नेपाळला गृहीत धरण्याची चूक केलेली होती. त्यामुळे याकाळात नेपाळ हे राष्ट्र भारतापेक्षा चीनकडे अधिक झुकलेले दिसून येते. परंतु १९९० मध्ये नेपाळने लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केल्यानंतर भारत-नेपाळ यांच्यातील संबंध सुधारण्यास सुरुवात झाली. पूर्णतः जमिनीने वेढलेले नेपाळ हे राष्ट्र चीन आणि भारत या दोन मोठ्या राष्ट्रांमधील बफर राष्ट्र ठरलेले आहे. परंतु असे असतानाही भारत-चीन यांच्यातील संघर्षाचा फायदा नेपाळने स्वतःच्या विकासासाठी करून घेतलेला आहे. हा फायदा करून घेत असताना नेपाळने अनुकूलतेनुसार कधी चीनधार्जिने धोरण तर, कधी भारतधार्जिने धोरण स्वीकारून अधिकाधिक फायदा मिळवून घेतलेला आहे.

भारत-नेपाळ परस्पर संबंधात भारत-नेपाळ यांच्यातील मुक्त सीमारेषा, १९५० मध्ये झालेला मैत्री करार, नदी पाणीवाटपाचा प्रश्न, नेपाळची भारताविषयी असलेली साशंक भूमिका इत्यादी समस्या अडथळा ठरलेल्या आहेत. उभय राष्ट्रातील या समस्यांवर सामोपचाराने तोडगा काढण्यास यश मिळाल्यास, दोन्ही राष्ट्रांचे परस्परसंबंध अधिक घनिष्ठ होण्यास मदत होईल.

**आपली प्रगती तपासा.**

१) भारत-नेपाळ यांच्यातील संबंधावर निबंध लिहा.

२) भारत-नेपाळ संबंधातील प्रमुख समस्या स्पष्ट करा ?

३) नेपाळमधील माओवादी चळवळीचा भारत-नेपाळ संबंधावर झालेला परिणाम सविस्तर लिहा.

४) भारत नेपाळ संबंधातील नवीन पर्व यावर टिपण लिहा.

### ३.३.३ **भारत-भूतान संबंध:-**

भूतान हा देश भारताच्या उत्तर दिशेला हिमालयाच्या कुशीत वसलेला एक छोटासा देश आहे. निसर्गरम्य असलेल्या भूतानमध्ये पर्यटनाला खूप संधी आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारताचे शेजारील भूतान या देशाशी घनिष्ठ आणि सहकार्याचे संबंध राहिलेले आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भूतान या शेजारी राष्ट्राला एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून भारताने मान्यता दिलेली आहे. त्याचप्रमाणे १९७१ मध्ये भूतान या राष्ट्राला संयुक्त राष्ट्र संघाचे सदस्यत्व मिळावे, यासाठीदेखील भारताने प्रयत्न केलेले आहेत. नेपाळ या देशाप्रमाणेच भूतान हे राष्ट्रदेखील केवळ परराष्ट्रसंबंध आणि संरक्षण या क्षेत्राबाबतच नव्हे, तर व्यापार आणि दळणवळण या क्षेत्राबाबतही बऱ्याच अंशी भारतावर अवलंबून आहे. तिबेटमध्ये १९५९ मध्ये झालेला उठाव चीनने मोडीत काढण्याच्या तसेच १९६२ मध्ये भारत-चीन यांच्यामध्ये युद्ध झाल्याच्या पार्श्वभूमीवर भारत-भूतान यांचे परस्परसंबंध अधिकच घनिष्ठ आणि मैत्रीचे झालेले आहेत. थोडक्यात चीनपासून आपल्याला धोका आहे, हे ओळखून भूतानने सुरुवातीपासूनच भारताशी आपली जवळीक वाढवलेली आहे.

#### ३.३.३.१ **भारत-भूतान मैत्री करार:-**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९४९ मध्ये भारत-भूतान यांच्यामध्ये एक महत्त्वपूर्ण मैत्री करार करण्यात आला. हा मैत्री करार उभय राष्ट्रांच्या परस्पर संबंधाचा विकास करण्यासाठी लाभदायक ठरलेला आहे. या करारानुसार भारताच्या मार्गदर्शनानुसार आपले परराष्ट्र धोरण ठरविण्याचे भूतान या राष्ट्राने मान्य केलेले आहे. तसेच या करारानुसार भूतानच्या अंतर्गत कारभारात भारताकडून कोणताही हस्तक्षेप केला जाणार नाही, असे भारताकडून भूतानला आश्वासित करण्यात आलेले आहे. भूतान हे राष्ट्र संरक्षण तसेच परराष्ट्रसंबंध याबाबतीत भारतावर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे व्यापार आणि इतर देशांशी दळणवळण करण्याबाबतही भूतानला बऱ्याच अंशी भारतावर अवलंबून राहावे लागते. भूतानमधील रस्ते बांधणीच्या कार्यात भारताने भूतानला भरीव मदत केलेली आहे. त्याचप्रमाणे भूतानला मोठ्या प्रमाणात आर्थिक आणि तांत्रिक मदत करून भूतानच्या विकासकार्यात भारताने मोलाचे योगदान दिलेले आहे. थोडक्यात १९४९ मध्ये भारत-भूतान यांच्या दरम्यान झालेला मैत्री करारामुळे उभय राष्ट्रात सहकार्य व मैत्रीच्या नवीन पर्वाला सुरुवात झालेली आहे.

८ फेब्रुवारी २००७ मध्ये भारत-भूतान मैत्री करारात सुधारणा करण्यात आली. या सुधारित मैत्री करारानुसार भूतान आणि भारत यांच्यातील संबंध मैत्रीपूर्ण आणि सहकार्याचे राहावे, ही बाब लक्षात घेऊन दोन्ही देशातील सरकार परस्परांशी संबंधित मुद्द्यांवर एकत्रितपणे सहकार्य करतील, असे ठरविण्यात आले. त्याचप्रमाणे या करारानुसार उभय राष्ट्रांचे राष्ट्रीय हित लक्षात घेऊन राष्ट्रीय सुरक्षितता आणि परस्परांच्या राष्ट्रीय हिताविरोधी कार्य करण्यास परस्परांच्या भूमीचा दुरुपयोग केला जाणार नाही, असे ठरविण्यात आले. थोडक्यात २००७ मध्ये भारत-भूतान यांच्यातील मैत्री करारानुसार उभय राष्ट्रांचे स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

### ३.३.३.२ **भूतानमधील पंचवार्षिक योजना आणि भारत-भूतान संबंध:-**

भूतानच्या विकासामध्ये भारताची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. कारण भारत हा भूतानशी करत असलेला व्यापार आणि भूतानच्या विकासासाठी भारताने दिलेले योगदान लक्षणीय आहे. १९६0 च्या दशकापासून भूतानच्या नियोजित विकासाच्या प्रक्रियेची सुरुवात झालेली होती. भूतानच्या विकासाची नियोजित प्रक्रिया म्हणजेच भूतानमध्ये भारताच्या मदतीने अंमलात आणल्या गेलेल्या पंचवार्षिक योजना होय. भूतानमध्ये १९६१ पासून प्रथम पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणीला सुरुवात करण्यात आली होती. या योजनेसाठी भारताने भरीव आर्थिक मदत भूतानला केलेली होती. प्रथम पंचवार्षिक योजनेपासून अलीकडील काळातील अकराव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत भारताने भूतानला भरघोस आर्थिक मदत केलेली आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेसाठी ४५00 करोड रुपये भारताने भूतानला दिले. त्याचप्रमाणे भूतानच्या विकासासाठी आर्थिक प्रोत्साहन पॅकेज म्हणून ५00 करोड अतिरिक्त मदतदेखील भारताने भूतानला केलेली आहे. थोडक्यात पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून भारत-भूतान संबंधात घनिष्ठता निर्माण झालेली आहे. कारण विविध पंचवार्षिक योजनांसाठी भारताने भूतानला भरीव मदत करून भूतानच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

### ३.३.३.३ **भारत-भूतान जलविद्युत करार आणि भारत-भूतान संबंध:-**

भारताने दक्षिण आशियाई राष्ट्रे आणि दक्षिण-पूर्व आशियाई राष्ट्रे यांच्याकडे जलविद्युत क्षमतेचा एक मोठा स्त्रोत म्हणून पहायला सुरूवात केलेली आहे. म्हणूनच भारताने शेजारील नेपाळ तसेच भूतान या दोन देशांसोबत जलविद्युत निर्मिती संदर्भात करार करून, या देशात जलविद्युत निर्मितीच्या क्षेत्रात  गुंतवणूक केलेली आहे. ज्याप्रमाणे नेपाळमध्ये सुमारे ४२ हजार मेगावॅट इतकी जलविद्युत निर्मिती करण्याची क्षमता आहे, त्याप्रमाणेच भारताशेजारील भूतान या देशांमध्येदेखील समारे २0 हजार मेगावॅट जलविद्युत निर्मिती करण्याची क्षमता आहे. म्हणून भारताने भूतानची जलविद्युत निर्मिती क्षमता लक्षात घेऊन भूतान या देशाशी जलविद्युत निर्मिती करण्यासंदर्भात करार केलेला आहे. भूतानकडे जलविद्युत निर्मितीचे स्त्रोत उपलब्ध आहेत, परंतु भांडवलाची उणीव असल्यामुळे ती उणीव भरून काढण्याचे काम भारताशी करार करून आर्थिक मदत घेण्यातून भूतानने केलेले आहे. जलविद्युत निर्मिती प्रकल्पातून निर्माण होणारी वीज भूतान स्वतःची गरज भागून काही वीज हे राष्ट्र भारताला निर्यात करते. भूतानच्या एकूण निर्यातीमध्ये १४% निर्यात ही जलविद्युतची केली जाते. म्हणजेच भारत-भूतान यांच्या दरम्यान झालेला जलविद्युत करार उभय राष्ट्रांसाठी लाभदायक ठरलेला आहे. प्रारंभी भारत-भूतान यांच्यामध्ये १४१६ मेगावॅट क्षमतेचे चुखा, कुरीचू आणि ताला हे तीन जलविद्युत प्रकल्प सुरू करण्यात आले होते. २00८ मध्ये भारत-भूतान यांच्या दरम्यान आणखी दहा हजार मेगावॅट जलविद्युत निर्मिती करण्यासंदर्भात करार करण्यात आला. यानुसार २९४0 मेगावॅट जलविद्युत निर्मिती करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे २0१४ मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूतानसोबत जलविद्युतनिर्मिती करार करून सुमारे २१२0 मेगावॅट एवढी जलविद्युत निर्मिती करण्यासंदर्भातील करारावर स्वाक्षरी केलेली आहे. तसेच भारतातील टाटा पावर या कंपनीमार्फत भूतानमध्ये हायड्रो-इलेक्ट्रिक प्रकल्प सुरु करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

अशाप्रकारे भारत-भूतान यांच्या दरम्यान जलविद्युत निर्मिती संदर्भात आतापर्यंत विविध करार करण्यात आल्यामुळे उभय राष्ट्रांच्या परस्पर संबंधात सहकार्य निर्माण झालेले आहे.

**सारांश:-**

भूतान या शेजारील देशाशी भारताचे संबंध स्वातंत्र्य मिळाल्यापासून सहकार्याचे राहिलेले आहेत. कारण चीन या बलाढ्य राष्ट्रापासून आपल्याला धोका आहे, हे चाणाक्षपणे ओळखून भूतानने सुरुवातीपासूनच भारताशी आपली जवळीक वाढवलेली आहे. भारत-भूतान यांच्यात झालेल्या मैत्री करारामुळे उभय राष्ट्रात सहकार्य निर्माण झालेले आहे. भूतानच्या विकासामध्ये महत्त्वाची भूमिका असलेल्या पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी भारताने भूतानला भरीव आर्थिक मदत केलेली आहे. त्याचप्रमाणे भूतान या देशाची जलविद्युत निर्मिती करण्याची क्षमता लक्षात घेऊन भारताने या देशाशी जलविद्युत करार केल्यामुळे उभय राष्ट्रांचा फायदा तर झालाच, परंतु त्यामुळे उभयतांचे परस्परसंबंध अधिक घनिष्ठ झालेले आहेत.

**आपली प्रगती तपासा.**

१) भारत-भूतान परस्पर संबंध स्पष्ट करा ?

२) भारत-भूतान मैत्री कराराविषयी सविस्तर लिहा.

३) भारत-भूतान यांच्यातील जलविद्युत करार यावर टिपण लिहा.

**३.३.४. भारत-म्यानमार (ब्रह्मदेश) संबंध:-**

भारत-म्यानमार परस्परसंबंधाला प्राचीन काळापासूनचा वारसा आहे. म्यानमारचे या अगोदरचे नाव 'ब्रह्मदेश' असे होते, परंतु अलीकडील काळात त्यामध्ये 'म्यानमार' असा बदल करण्यात आला आहे. भारतीय बौद्ध धर्माचा प्रसार म्यानमारमध्ये झालेला असल्यामुळे सध्या म्यानमारमधील बहुतांश जनतेचा बौद्ध हा धर्म आहे. पर्यायाने म्यानमार देशाने बौद्ध धर्माला राष्ट्रीय धर्माचा दर्जा दिलेला आहे. म्यानमारवर ब्रिटिशांची सत्ता होती. म्यानमारमधील ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतीय व्यापाऱ्यांनी म्यानमारमध्ये आपले पाय रोवलेले होते. या भारतीय व्यापारी आणि सावकार लोकांनी म्यानमारमधील जनतेचे शोषण केले होते. त्यामुळे साहजिकच म्यानमारमध्ये भारतीयांविरुद्ध असंतोषाची भावना निर्माण झालेली होती. पर्यायाने म्यानमारमध्ये भारतीय लोकांविरुद्ध उठाव झाला होता. त्यामुळे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी म्यानमारचा प्रदेश भारतापासून वेगळा करून स्वतंत्र भाग बनवला होता. द्वितीय महायुद्धाच्या वेळी म्हणजेच १९४३ मध्ये म्यानमारने जपानच्या सहकार्याने स्वतंत्र झाल्याची घोषणा केलेली होती, परंतु द्वितीय महायुद्धातील जपानच्या पराभवामुळे पुन्हा म्यानमारवर ब्रिटीशांची सत्ता निर्माण झाली. परंतु म्यानमारच्या नागरिकांनी स्वातंत्र्यासाठी आपले आंदोलन ब्रिटिशांच्या विरोधात सुरू ठेवले होते. शेवटी १९४८ मध्ये म्यानमारला ब्रिटिशांच्या तावडीतून स्वातंत्र्य मिळाले. म्यानमार जेव्हा स्वतंत्र झाला, तेव्हा या देशाचे नाव ब्रह्मदेश असे होते.

### ३.३.४.१ **भारत-म्यानमार संबंध:-**

म्यानमारला ब्रिटिशांपासून १९४८ मध्ये स्वातंत्र्य मिळाले आणि भारताला या अगोदर एक वर्ष म्हणजेच १९४७ मध्ये ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारताचे म्यानमारशी मैत्री व सहकार्यपूर्ण संबंध होते. द्वितीय महायुद्धाच्या समाप्तीनंतर अमेरिका व रशिया यांच्या नेतृत्वाखाली जगाचे ध्रुवीकरण होत असताना भारताप्रमाणेच म्यानमारनेदेखील अलिप्ततावादी धोरणाचा स्विकार सुरुवातीपासूनच केलेला होता. म्यानमार या देशाने जगाशी आपला संपर्क खूपच कमी ठेवलेला आहे. थोडक्यात या देशाने स्वतःला बंदिस्त करून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे, त्यामुळे अलीकडील काळात भारताशी देखील या देशाचे फारसे संबंध प्रस्थापित झालेले नाहीत. म्यानमारमध्ये तेथील सैन्याने लोकशाही सरकार विरोधात संघर्ष करून या सरकारला पायउतार होण्यास भाग पाडले होते, परंतु अशा पद्धतीने नेपाळमध्ये लोकशाहीचा गळा घोटला जात असल्याबद्दल भारताने आपली नाराजी व्यक्त करून म्यानमारमधील लोकशाही समर्थक करत असलेल्या आंदोलनाला आपला पाठिंबा दिलेला होता. म्यानमार भारताशी संबंध प्रस्थापित करण्यास फारशा उत्सुक नसला तरीदेखील भारताने आपल्या भू-राजनीतिक समस्येमुळे म्यानमारसोबत संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. याचाच भाग म्हणून १९९३ मध्ये म्यानमारमध्ये स्थापन झालेल्या लष्करशाहीला मान्यता देऊन म्यानमारमधून भारतात होत असलेली अंमली पदार्थांची तस्करी थांबवण्यासाठी, तेथील लोकशाही व्यवस्थेचे दमन आणि म्यानमारमधील लष्करशाहीवर काही प्रमाणात नियंत्रण ठेवण्यासाठी भारताने प्रयत्न केले. सामरिकदृष्ट्या संबंध प्रस्थापित करणे भारतासाठी आवश्यक होते. कारण भारतातील मिझोरम, मणिपूर, नागालँड आणि अरुणाचल प्रदेश या घटकराज्याचा संबंध सीमारेषेनुसार म्यानमार देशाशी येत असल्यामुळे भारताचा म्यानमार देशाशी संबंध येत होता. भारत-म्यानमार यांच्यामध्ये १६00 किलोमीटर लांबीची भूसीमा आहे. ही सीमारेषा सुरक्षित ठेवण्यासाठी भारताने म्यानमारशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवलेले आहेत. कारण या सीमारेषेमधून भारतात अंमली पदार्थांची तस्करी होण्याचा धोका, तसेच काही नक्षलवादी किंवा विद्रोही म्यानमारमध्ये आपले तळ निर्माण करण्याची भीती भारताला वाटत होती. म्हणून भारत नेहमी दहशतवादविरोधी कारवाया थांबवण्यासाठी म्यानमारसोबत सैनिकी सहकार्य करण्यास सतत तयार राहिलेला आहे.

### ३.३.४.२ **भारताची म्यानमारला मदत आणि भारत-म्यानमार संबंध:-**

इंडो-चीन भागात चीनच्या वाढत्या प्रगतीचा आणि प्रभावाचा मुकाबला करण्यासाठी आणि आपला संरक्षणात्मक प्रभाव वाढवण्यासाठी भारताने म्यानमारच्या सीमेलगत प्रमुख रस्ते आणि बंदरांचा विकास करण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. त्याचप्रमाणे फेब्रुवारी २00७ मध्ये भारताने सित्त्वे बंदराचा विकास करण्याची योजनादेखील घोषित केलेली आहे. भारताने म्यानमारमध्ये राजमार्ग बांधकामासाठी १00 मिलियन अमेरिकी डॉलर एवढे कर्ज म्यानमारला दिलेले आहे. त्याचप्रमाणे म्यानमारच्या रेल्वे विकासासाठी ५७ मिलियन अमेरिकी डॉलर खर्च करण्याची तयारी भारताने दाखवलेली आहे. तसेच म्यानमारमधील रस्ते आणि रेल्वे प्रकल्पासाठी आणखी २७ मिलियन अमेरिकी डॉलर एवढे अनुदान म्यानमारला देण्याचे भारताने मान्य केलेले आहे. त्याचप्रमाणे भारताने म्यानमारला वेळोवेळी सैनिकी मदतही केलेली आहे. म्यानमारमध्ये अनेकवेळा चक्रीवादळामुळे नुकसान झाल्यामुळे

भारताने ठोस मदत केलेली आहे. उभय देशांनी परस्पर संबंध मैत्रीपूर्ण असावेत, यासाठी परस्परांच्या राजधानीमध्ये दूतावासची स्थापना केलेली आहे. त्याचप्रमाणे व्यापार वाढवण्यासाठी वाणिज्य दूतावासाचीही स्थापना केलेली आहे. म्यानमारमधील तेल आणि गॅसची आयात करणारा भारत हा एक प्रमुख देश आहे. भारताने म्यानमार देशाशी मैत्रीपूर्ण संबंध टिकवून ठेवण्यासाठी शैक्षणिक, तांत्रिक तसेच आर्थिक क्षेत्रात शक्य तेवढी मदत केलेली आहे. नेपाळ आणि भूतान या भारताशेजारील देशांप्रमाणेच म्यानमारमध्येदेखील जलविद्युत निर्मितीची मोठी क्षमता आहे. म्हणून ४0 हजार मेगावॅट वीजनिर्मितीची क्षमता असणाऱ्या म्यानमारमध्येदेखील आर्थिक गुंतवणूक करण्यास भारत तयार आहे. या गुंतवणुकीमुळे भारत-म्यानमारमधील संबंध भविष्यात अधिक चांगले होण्यास मदत होईल.

**सारांश:**

भारत-म्यानमार यांच्यातील परस्परसंबंधांना खूप मोठा वारसा लाभलेला आहे. भारताप्रमाणेच म्यानमार हीदेखील ब्रिटीशांची एक वसाहत होती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जवळपास वर्षभरात म्यानमार या देशाला देखील ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळालेले होते. म्यानमारने जगाशी आपला संपर्क खूप कमी ठेवलेला असला तरीदेखील म्यानमारची भूसीमा भारताला लागून असल्यामुळे उभय देशात संबंध प्रस्थापित होणे क्रमप्राप्त होते. म्यानमारमध्ये आलेल्या संकटकाळात भारताने वेळोवेळी म्यानमारला मदत केलेली आहे. तसेच म्यानमारमध्ये रस्ते, रेल्वे आणि बंदरांचा विकास करण्यासाठी भारताने म्यानमारला वेळोवेळी आर्थिक मदतदेखील केलेले आहे. भारताने म्यानमारला केलेल्या मदतीमुळे उभय देशात सहकार्य निर्माण झालेले आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) भारत-म्यानमार यांच्यातील संबंध स्पष्ट करा.

२) म्यानमारला भारताने केलेली मदत आणि भारत-म्यानमार संबंध याविषयी सविस्तर लिहा.

❄❄❄❄❄❄❄

# ४

# द्विपक्षीय मुद्दे BILATERAL ISSUES

**घटक रचना**

४.१ उद्दिष्टे

४.२ भारत व शेजारील राष्ट्रे - सीमावाद

४.३ भारत व शेजारील राष्ट्रे - जल वाटपाचा प्रश्न

४.४ दहशतवाद

४.५ स्थलांतर

४.६ सारांश

४.७ आपण काय शिकलो?

४.८ संदर्भसूची

## ४.१उद्दिष्टे

भारतीय परराष्ट्र धोरणात द्विपक्षीय मुद्दे हा घटक महत्वपूर्ण आहे. भारताच्या स्वातंत्र्याबरोबर भारतीय परराष्ट्र धोरणात द्विपक्षीय मुद्द्यांची भूमीका ही निश्चित झालेली दिसते. कारण भारत स्वातंत्र होत असतानाच यातील बहुतांशी प्रश्न निर्माण झालेले होते, ते जसे की भारत-पाकिस्तान सीमा प्रश्न, पाणीवाटपाचा प्रश्न, स्थलांतरचा प्रश्न इ. तर काही प्रश्नांना बदलत्या जागतिक राजकारणाने उभारी दिलेली दिसते. ज्यामधून जागतिक दहशतवाद, सीमापार दहशतवाद, स्थलांतरितांचे प्रश्न इत्यादी मुद्दे भारतीय परराष्ट्र धोरणात द्विपक्षीय मुद्दे म्हणून पुढे आलेले दिसतात. या मुद्द्यांचा अभ्यास या घटकांमध्ये करणे हे आपले प्रधान उद्दिष्ट आहे. ज्यामधून भारताचे परराष्ट्र धोरणामध्ये द्विपक्षीय मुद्द्यांची भूमिका नेमकी काय आहे याचे आकलन आपणास होऊ शकेल.

## ४.२ भारत व शेजारील राष्ट्रे - सीमावाद

भारत व शेजारील राष्ट्रांमध्ये द्विपक्षीय मुद्दा म्हणून सीमावाद, भूप्रदेशाची अदलाबदल हा मुद्दा प्रारंभापासूनच कळीचा मुद्दा राहिलेला आहे. या मुद्द्यातूनच भारतास चार युद्धांचा सामना करावा लागला आहे. शेजारील राष्ट्रांसमवेत सतत संघर्षाचे कारण राहिलेले सीमावादाच्या द्विपक्षीय मुद्यांची मांडणी प्रामुख्याने पुढील प्रमाणे करता येईल.

**१) भारत-पाकिस्तान सीमा प्रश्न:-**

भारत व पाकिस्तान या दोन शेजारील राष्ट्रांमधील परस्परसंबंधांचा इतिहास हा युद्ध, अविश्वास व संशयाच्या घटनांनी प्रभावित झालेला आपणास पहावयास मिळतो. सीमाप्रश्नातूनच भारत व पाक मध्ये आतापर्यंत पाच वेळा युद्ध व लष्करी कारवाई झालेली दिसते.

भारतातील गुजरात, राजस्थान, पंजाब व जम्मू काश्मीर राज्यांची सीमा पाकिस्तानला लागून आहे. भारत-पाक सीमा ३,३२३ किमी लांब आहे. भारत-पाक सीमा दक्षिणेत सर क्रीक पासून सुरू होते व सियाचिन ग्लेशियर जवळ समाप्त होते. भारत-पाक सीमा प्रश्नाशी निगडीत जम्मू-काश्मीर सीमा वाद, निर्वासितांचा प्रश्न, सियाचीन व सर क्रिक वाद, सीमापार आतंकवाद, अमली पदार्थ व शास्त्रांची स्मगलिंग यासारखे प्रश्न निर्माण झालेले दिसतात. भारत पाक मधील सीमा प्रश्नांमुळे दक्षिण आशिया क्षेत्रात अशांतता व दहशतीचे वातावरण निर्माण झालेले दिसते. यातील प्रमुख सीमा प्रश्नांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**जम्मू काश्मीर सीमावादाचे स्वरूप:-**

काश्मीरची समस्या ही भारत पाकिस्तान मधील सर्वात जास्त गुंतागुंतीची समस्या मानली जाते. 'The most dangerous place in the world' या शब्दांमध्ये अमेरिकन राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी जम्मू काश्मीर समस्येचे वर्णन केले होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर काही दिवसांमध्येच पाकिस्तानने जम्मू काश्मीर मध्ये घुसखोरी केली. २२ ऑक्टोबर १९४७ रोजी पाकिस्तानी घुसखोरांनी भारतावर आक्रमण केले. या युद्धामध्ये पाकिस्तानला पराभव पत्करावा लागला असला तरी काश्मीर मधील ८३,२९४ वर्ग किमी क्षेत्र अवैध रूपाने कब्जात घेतले. त्यातील ५१८० वर्ग किमी क्षेत्र पाकिस्तानने चीनला भेट दिले. पाकिस्तान जवळ आता ७८,११४ वर्ग किमी काश्मीर चे अधिकृत क्षेत्र आहे. पाकिस्तानने १९४७ नंतर १९६५,१९७१,१९९९ मध्ये ही काश्मीर प्रश्नावरून भारतावर युद्ध लादले. प्रत्येक वेळी पाकिस्तानला पराभूत व्हावे लागले असले तरी आजही पाकिस्तान व भारत या मधील प्रमुख सीमावाद हा काश्मीर प्रश्नाचाच आहे. यादृष्टीने भारत-पाकिस्तान संबंध सामान्य होणे करिता उभय पक्षी अनेक करारही करण्यात आले. ताश्कंद करार, सिमला करार, १९७४ चा डाक, तार व व्यापार करार, लाहोर घोषणा, दिल्ली लाहोर दिल्ली बस सेवा इत्यादी याची उदा. होत. मात्र हा प्रश्न आजही जैसे थे स्वरूपात असल्याचे दिसते.

**सियाचीन व सर क्रीक वाद:-**

भारत व पाकिस्तानमध्ये सियाचीन व सर क्रीक समस्या अनेक वर्षापासून कायम असल्याचे दिसते. १७ ते २१ हजार फूट उंचीवर जवळपास ११० किमी क्षेत्रात जम्मू-काश्मीरच्या लदाख मधील कारकोरम पर्वतात चीन भारत-पाक-चीन सीमेवर सियाचीन हिमनग आहे. ज्याचे आज पर्यंत सीमा निर्धारण न झाल्यामुळे भारत-पाक मध्ये हे वाद आहे. येथील तापमान -५० डिग्री सेल्सियस आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये भारत पाकिस्तान चे सैनिक एक दिवस रात्र पहारेदारी करतात. या क्षेत्रात १९८० नंतर बऱ्याचदा भारत-पाकिस्तानमध्ये संघर्ष झाले. मार्च १९६२ मध्ये पाकिस्तानने पाकव्याप्त काश्मीरच्या सियाचीन च्या उत्तरेकडचा २००० चौरस किमी भूप्रदेश चीनला भेट दिला.

सर क्रीक गुजराच्या कच्छच्या खाडीत आणि पाकिस्तान मध्ये चीनच्या सीमेवर स्थिर ६० किमी ज्वारीय नदी चेनल आहे. सर क्रीक भारत-पाक सीमा स्थित आहे. दोन्ही

देशांमध्ये या क्षेत्रात सामुद्रिक सेवा स्थापन करण्यासंबंधी चा वाद आहे. १९६५ च्या भारत-पाक युद्धाकरिता हा सीमावाद प्रामुख्याने जबाबदार होता. १९६९ पासून आज पर्यंत भारत-पाकमध्ये या प्रश्नावर सातत्याने संघर्षाचे प्रश्न उद्भवलेले दिसतात.

**२) भारत चीन सीमा वाद:-**

भारत व चीनमधील सीमा वाद हा अतिशय गुंतागुंतीचा शीतयुद्ध काळापासून चालत आलेला व शीत युद्धोत्तर काळातही अनिर्णित राहिलेला प्रश्न आहे. सीमावादाच्या दृष्टीने भारत-चीन संबंध १९५० च्या दशकापासून तणावपूर्ण बनण्यास सुरुवात झालेली दिसते. भारत चीनमध्ये सीमावाद निर्माण होण्याचे प्रमुख कारण म्हणजे या दोन देशांमधील सीमा रेषांच्या स्पष्टतेचा अभाव हे होय. यादृष्टीने १९१३- १९१४ तत्कालीन ब्रिटिश शासनकर्ते तिबेट चीनचे प्रतिनिधी यांची एक बैठक सिमला येथे झाली होती. या बैठकीतील निर्णयानुसार ब्रिटिश भारत व तिबेट यांच्यामधील ८९० किमी ची सीमारेषा निर्धारित करण्यात आली. ही सीमारेषा मॅक मोहन सीमारेषा म्हणून ओळखली जाते. अक्साई चीन व सिक्कीम हे प्रमुख द्विपक्षीय मुद्दे आहेत. भारताच्या अंतर्गत असणाऱ्या मोठ्या भूप्रदेशावर चीन सातत्याने दावा सांगतो. भारतीय भूप्रदेश चीनच्या नकाशात दाखवणे, लष्करी कारवाई करत भारतीय भूप्रदेश ताब्यात घेणे, घुसखोरी करणे यासारखे कृत्य चीन कडून सातत्याने होत असते.

सीमा वादाच्या द्विपक्षीय मुद्द्याबाबत चीनचे म्हणणे असे आहे की, भारत व तिबेट यांच्या दरम्यान ची जी सीमारेषा आहे ती ब्रिटिशांच्या तिबेटवरील आक्रमणातून उदयाला आली होती. या सीमारेषा जन्म तत्कालीन भारतातील ब्रिटिश वसाहतवादी शासन व तिबेटमधील राजवट यांच्यातील करारातून झाला. तथापि आता तिबेटचे स्वतंत्र अस्तित्व राहिले नसून तो जेव्हा चीनचा अविभाज्य घटक बनला आहे त्यामुळे मेक मेहक सीमारेषेचे अस्तित्व उरत नाही. १९५० च्या दशकात प्रामुख्याने या मुद्द्यावरून भारत व चीन मध्ये संघर्ष सुरू झाला. त्यातूनच १९६२ चे युद्ध घडले. तत्पूर्वी १९५५ ते १९६० दरम्यान तीसहून अधिक वेळा भारतामध्ये घुसखोरी करत बेकायदेशीरपणे मोठा भाग काबीज केला होता. १९६१मध्ये चीनने भारताच्या हद्दीतील सिक्कीम, लडाख व नेफा प्रदेशातही घुसखोरी केली. १९६२ च्या युद्धात चीन ने लडाख भूप्रदेशातील ३८ हजार वर्ग किमी मी एवढा मोठा प्रदेश गिळंकृत केला. १९६३ मध्ये पाकिस्तान सोबत चीन ने सीमा करार करून ५१८० वर्ग किमीचा भूप्रदेश ताब्यात घेतला. यामुळे भारत व चीन यांच्यातील संबंध अधिकच तणावपूर्ण बनले. भारतचा एवढा मोठा भूप्रदेश गिळंकृत करू नये चीन परत भारताच्या अरुणाचल प्रदेशातील ९०००० वर्ग किमी व्याप्तीच्या भूखंडावर आपल्या दावा सांगत असून भारत व चीन मधील मध्य क्षेत्रात २००० वर्ग किमी प्रदेशावर ही चीन आपला दावा प्रस्तुत करत आहे.

भारत चीन संबंध सध्या आपल्याला वरवर पाहता सामान्य जरी दिसत असले तरी चीन कडून भारतावर कुरघोडी करण्याचे प्रयत्न सुरूच आहेत. मे १९६२ मधील चीन पाकिस्तान करार, १९६५ चे भारत पाकिस्तान युद्ध, १९६७ मधील भारतीय

दूतावासातील अधिकाऱ्यांची गिरफ्तारी, १९६७ मध्ये चोला चौकीवर हल्ला, १९६८ मध्ये नाथुला मधील सैनिकी घुसपैठ, १९७१ मधील भारत पाकिस्तान युद्ध, १९७५ मध्ये नेफामधील भारतीय जवानांची हत्या, अगदी अलीकडे घडलेले डोकलाम प्रकरण या घटनांचा आढावा घेताना एक बाब स्पष्टपणे जाणवते की चीनने प्रत्येक वेळी भारत विरोधी भूमिका घेतलेली आहे. १९६२ ते १९७४ हा भारत-चीन परराष्ट्र संबंधांच्या दृष्टीने अतिशय कटू कालखंड होय. सन १९७५ साली वांग-पिंग-नान हे चीन राजनायिक भारतात आले आले व त्यांनी मोरारजी देसाई ( प्रधानमंत्री) व परराष्ट्र मंत्री अटल बिहारी वाजपेयींना चीनला येण्याचे आमंत्रण दिले. यानंतर सन १९७९ मध्ये त्याप्रमाणे परराष्ट्रमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांनी चीनचा दौरा केला. त्यानंतर भारत सरकार व चीन सरकार यांच्यात अनेक वेळा सीमा वादावर तोडगा काढण्याच्या दृष्टीने बैठका झाल्या, करार झाले. मात्र अद्यापही ही भारत चीन सीमा वाद हा प्रश्न धगधगताच आहे. भारत व चीन या उभरत्या महासत्ता आहेत. या दोन्ही देशात हात लोकसंख्येच्या दृष्टीने ४०% लोक राहतात. इतकेच नव्हे तर आशियातील या दोन्ही राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात विशेष स्थान प्राप्त केल्याचे दिसून येत असले तरी चीन जगाच्या दृष्टीने विश्वासघातकी, आक्रमक व विस्तारवादी राष्ट्र आहे. म्हणूनच आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताला विशेष महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. परंतु एक चिंताजनक बाब या ठिकाणी नमूद करण्यासारखी आहे की, जोपर्यंत भारत चीन सीमा वाद प्रश्नावर कायमचा तोडगा निघणार नाही नाही तोपर्यंत भारताला चीन पासून कायमचा धोका राहील.

### ३) भारत-बांग्लादेश सीमावाद:-

भारत व बांग्लादेश यामध्ये ४,०९६ किमी लांबीची भूसीमा आहे आहे. १९४७ सालीच्या रॅडक्लिफ निवाड्यानुसार या भू सीमेची निश्चिती करण्यात आली होती. पण त्या निवाड्यानुसार तरतुदी मधील त्रुटीमुळे दोन्ही देशांमध्ये वाद होते. ते मी देशांमध्ये एकमेकांचे एनक्लेव्हज् म्हणजे जवळ ७११०.०२ एकर क्षेत्र आहे, तर बांग्लादेश कडे भारताचे १११ एनक्लेव्हज् म्हणजे १७,१६०,६३ क्षेत्र आहे. आता झालेल्या करारानुसार भारत-बांग्लादेश हे प्रदेश एकमेकाना सुपूर्द करतील. सध्याची स्थिती पाहता भारताकडे भरपूर क्षेत्र आहे. ते परत करावे लागेल. म्हणजे भारताला तोटाच आहे. आहे तरी पण या देवान-घेवानी मुळे घुसखोरीला आळा बसून सीमेवर शांतता निर्माण होण्यास मदत येईल.

भारत-बांग्लादेश मधील १६ मे १९७४ मध्ये झालेल्या भूसीमा करारास बांग्लादेशाने मान्यता दिली. मात्र भारताने त्यास मान्यता देण्याचे टाळले. भारताने या करारातील एका तरतुदीस आक्षेप नोंदवला ते कलम असे होते की, ‘ भारत बेबेरी संघ क्र. १२ प्रदेशांमधील अर्धा प्रदेश स्वतःकडे ठेवेल व बांग्लादेश दहा ग्राम आणि अंगारपोटा जोडणारा तीन बिघा हा मार्ग बांग्लादेशाला कायमस्वरूपी भाडेतत्वावर देईल’, अशा तरतुदीमुळे भारताने या करारास मान्यता दिली नव्हती.

भारत-बांग्लादेशात भू सीमा निश्चितीच्या दृष्टीने आणखी ६.१ किमीचे तीन वाद होते. त्यामध्ये दयिखाता -५६ (प. बंगाल), केलोनिया( त्रिपुरा) व लथितीला दुमबरी (आसाम) या एनक्लेव्हज् च्या बाबत भारताने या करारास मान्यता दिली होती. मात्र त्यानंतर सप्टेंबर २०११ रोजी दोन्ही देशात भू सीमा निश्चिती करण्याकरिता करार झाला होता. त्यामध्ये दोन प्रकारची हस्तांतरणे होणार होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत-बांग्लादेशामधील भू सीमा करारास ४ डिसेंबर २०१४ रोजी मान्यता दिली. त्यानंतर भूसीमा करारावर नेमण्यात आलेल्या ३१ सदस्यीय स्टॅडिंग कमिटीने भारत-बांग्लादेश यांच्यात प्रलंबित असणारा भू सीमा रेषा करार पूर्ण करावा असे म्हटले आहे. हा करार माजी पंतप्रधान मनमोहन सिंग व बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांच्यात २०११ मध्ये झाला होता. १९७४ साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी व बांग्लादेशचे राष्ट्राध्यक्ष शेख मुजीब उर रहमान यांच्यामध्येही सीमे संदर्भात महत्त्वपूर्ण करार झाला होता. २०११च्या या कराराचा मुख्य उद्देश भारत व बांग्लादेश यांच्यातील सीमारेषा सुरळीत करणे हा आहे. कारण भारताचे काही भूखंड बांग्लादेशच्या हद्दीत आहेत तर काही बांग्लादेशच्या ही भूखंडांवर भारताचे नियंत्रण आहे. हे असे १६२ भूखंड असून त्यापैकी १११ भूखंड बांग्लादेशच्या हद्दीत असून बांग्लादेशचे ५१ भूखंड भारताच्या हद्दीत आहेत. या दोन्ही देशाच्या भूखंडांवर एकूण ५१ हजार इतक्या लोकसंख्येचे वास्तव्य आहे. या कराराप्रमाणे या भूखंडांची अदलाबदल करण्यात आली आहे. आहे यासाठी भारतीय संविधानात ११९ घटना दुरुस्ती करण्यात आली. आरती राजपत्रा मध्ये २३ मे २०१५ रोजी हा कायदा प्रसिद्ध झाला. त्याप्रमाणे या कराराची अंमलबजावणी ३१ जुलै २०१५ रोजी रात्री ठीक १२.०० वाजता झाली. १२ व १३ ऑगस्ट २०१५ रोजी ढाका येथे दोन्ही देशांच्या राष्ट्र प्रमुखानी यावर स्वाक्षरी केली.

सारांश, भारत व शेजारील राष्ट्रांमध्ये सीमावाद हा प्रमुख द्विपक्षीय संघर्षाचा मुद्दा राहिलेला दिसतो. भारत-बांग्लादेश यांच्यातील सीमा वाद बहुतांशी संवादाच्या माध्यमातून सुटत असलेला दिसतो. भारत व चीन, भारत व पाकिस्तान मधील सीमावाद मात्र आजही संघर्षाची एक प्रमुख कारण असल्याचे दिसते.

## ४.३ भारत व शेजारील राष्ट्रे - जल वाटपाचा प्रश्न

जागतिक बँकेचे तत्कालीन उपाध्यक्ष इस्माईल सार्ज सेदिन यांनी आणि असे भाकीत केले होते की, मागील शतकांमध्ये आर्थिक, साम सामाजिक, राजकीय, धार्मिक कारणांवरून युद्ध झाली. मात्र २१ व्या शतकात याचे मुख्य कारण पाणी हा घटक राहील. १९९१ मध्ये संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस श्री. ब्यूट्रास घाली यांनी यासंदर्भात वक्तव्य करताना म्हटले होते की, मध्य आशियात यापुढे जी संघर्ष, युद्ध घडतील याचे प्रमुख कारण ' पाणी' हा घटक असेल. कोणत्याही राष्ट्रास आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत महासत्ता होणे करिता त्या राष्ट्राची भौगोलिक स्थिती, हवामान, नैसर्गिक साधन सामग्री या बाबी फार महत्त्वाच्या आहेत. जागतिकीकरण व तंत्रज्ञानाच्या प्रगतीने यास काही मर्यादा पडलेल्या दिसत असल्या तरी नैसर्गिक साधन सामग्री, हवामान, पाणी व भौगोलिक स्थानाचे महत्त्व हे चिरकाल स्वरूपाचे आहे. या दृष्टीने कोणत्याही राष्ट्राच्या सुरक्षा व समृद्धी करिता पाणी हा घटक महत्त्वाचा राहिलेला दिसतो.

भारत-पाकिस्तान व बांग्लादेशा दरम्यान ही पाण्यावरून संघर्ष उद्भवत असल्याचे दिसते. भविष्यात हा संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. कारण पाण्याची मागणी तिन्ही देशांमध्ये वाढती आहे. पुरवठा मात्र नियोजनाअभावी कमी होत असलेला दिसतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर नदी वाटप, जल वाटपाचे अनेक करार सातत्याने घडून येत असतात. तरीही जलो वाटपाची संघर्ष निवारण शक्य होत असल्याचे दिसत नाही. उदा. १९०९ मध्ये अमेरिका व कॅनडा मध्ये हार्मोन सिद्धांता द्वारे पाणी वाटपाचा करार झालेला असला तरी या दोन्ही देशांदरम्यान पाण्यावरून अधून-मधून संघर्ष उभे राहताना आढळतात. मध्य आशियात तर राष्ट्रा राष्ट्रांमध्ये पाण्यावरून सतत संघर्ष उद्भवत असल्याचे दिसते. मध्य आशियामध्ये पाण्याचे प्रामुख्याने तीन स्त्रोत आहेत

1. तैग्रीस यूफ्रेटस नदीचे पात्र
2. जॉर्डन नदीचे पात्र
3. नाईल नदी

हे केवळ तीनच पाण्याचे स्त्रोत उपलब्ध असल्याकारणाने मध्य आशियातील राष्ट्रांत दरम्यान संघर्ष होणे अटळ आहे. त्यामुळे या भागात जरी एकाच धर्माचे लोक वास्तव्य करीत असले तरी मूलभूत गरजांसाठी ते संघर्षरत असल्याचे दिसते. मध्य आशिया प्रमाणेच दक्षिण आशिया मध्ये ही पाण्यावरून संघर्ष होणे अटळ दिसते. कारण आज जरी भारत-पाकिस्तान व बांग्लादेशा दरम्यान Indian Water Treaty१९६०. The Agreement On Sharing Of The Gangas Water १९७५ यांद्वारे आपल्या शेजारील राष्ट्रांशी आपले संबंध प्रस्थापित केलेले असले तरी जलवाटप हा भारताचा शेजारील राष्ट्रांसोबतचा एक महत्त्वाचा द्विपक्षीय मुद्दा कायम राहिलेला दिसतो. यातील काही प्रमुख घटकांची मांडणी पुढील प्रमाणे करता येईल.

**सिंधू पाणी वाटप करार:-**

सिंधू पाणी वाटप करार हा भारत व पाकिस्तान या दोन देशांमध्ये झालेला नद्यांच्या पाणी वाटपासंदर्भातील एक महत्त्वाचा करार आहे. सिंधू नदी व तिच्या खोऱ्यातील इतर काही नद्यांच्या पाणी वाटपा संदर्भातील जागतिक बँकेच्या पुढाकाराने या दोन देशात हा करार घडून आला. जवळपास दहा वर्षाच्या वाटाघाटी नंतर उभय देशांनी पाकिस्तान येथे कराची मुक्कामी १९ सप्टेंबर १९६० रोजी या करारास मान्यता दिली. या करारावर भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष आयुब खान यांनी स्वाक्षरी केली.

भारतातून पाकिस्तान मध्ये वाहणाऱ्या बियास, रावी, सतलज, सिंधू, चिनाब व झेलम या नद्यांच्या पाणी वाटपाची या करारान्वये तरतूद करण्यात आली. या सहाही नद्या भारतातून पाकिस्तान मध्ये वाहत जातात त्यामुळे भारत त्यांची पाणी अडवून आपली कधीही कोंडी करू शकतो, दुष्काळ निर्माण करू शकतो अशी भीती पाकिस्तान ला होती. त्यामुळे जागतिक बँकेच्या मध्यस्थीने हा करार करण्यात आला. यासंदर्भातील वाद तंटे सोडविण्याकरिता सिंधू आयोगाची स्थापना करण्यात आली. आज पर्यंत त्याच्या ११० पेक्षा अधिक बैठका नियमितपणे पार पडलेल्या आहेत.

या करारानुसार सिंधू नदी व त्यास मिळणाऱ्या पाच नद्या मधील पाण्याचे वाटप ठरविण्यात आले होते. त्याप्रमाणे सिंधू, चिनाब, झेलम या पश्चिमेकडून वाहणाऱ्या नद्यांचे पाणी पाकिस्तानला वापरता येईल तर रावी, बियास व सतलज या पूर्वेकडच्या नद्यांच्या पाण्याबाबत भारतास सर्व अधिकार असतील. त्याबरोबर सिंधू, चिनाब, झेलम या पश्चिमेकडच्या नद्यांमधूनही भारतास एकूण पाण्यापैकी २० टक्के पाणी उपलब्ध असेल. तरीही आज पर्यंत जम्मू-काश्मीरमध्ये केवळ ६.४ लाख एकर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. धरणे न बांधले कारणाने पाण्याची साठवण क्षमता जम्मू-काश्मीरमध्ये नगण्य आहे. पूर्वेकडील नद्यांचे नियंत्रण जरी भारताकडे असले तरी भारतातील कर्नाटक तुलबुल हा झेलं नदीवरील सुरु केलेला बंधारा १९८७ साली पाकिस्तानच्या विरोधामुळे अर्धवट राहिला.

सिंधू पाणी वाटप करार इतर आंतरराष्ट्रीय करार प्रमाणे व्हिएन्ना कन्वेंशन च्या कलम ६३ नुसार रद्द करणे शक्य आहे. कारण कोणताही आंतरराष्ट्रीय करार हा दोन देशांमधील संबंध व सामंजस्य यावर अवलंबून असतो. सिंधू करारातील नेत्या व त्याच्या पाणीवाटपाचा विचार केल्यास पाकिस्तानला ८० टक्के पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे भारताने या नद्यांवर धरणे बांधून पाकिस्तान ला जाणारे पाणी रोखले तर त्यांचे गंभीर परिणाम पाकिस्तानला भोगावे लागतील अशी शक्यता आहे. ते मात्र भारतात तसे केल्यावर पाकिस्तान याविरोधात आंतरराष्ट्रीय स्तरावर दाद मागण्याची शक्यता आहे. आहे त्यामुळे येणाऱ्या काळात जल वाटपाच्या द्विपक्षीय मुद्द्यांमध्ये हाच करार केंद्रस्थानी असेल हे स्पष्ट दिसते.

राजनैतिक बाबतीत सिंधू पाणी वाटप कराराचा विषय अलीकडच्या काळात परत चर्चेच्या केंद्रस्थानी आलेला दिसतो. पाकिस्तान विरोधात हे जल अस्त्र वापरता आले तर पाकिस्तान वर मोठा दबाव निर्माण करता येईल. याचा गंभीर विचार भारताकडून केला जात आहे. तीन नद्यांमधून विद्युत शक्ती निर्माण करण्याची मुभा भारतास आहे. हे मात्र अद्याप पर्यंत १८ हजार मेगावॅट च्या उपलब्ध शक्ती पैकी केवळ तीन हजार मेगावॅट वीजच वापरली गेली आहे. ' पाणी व रक्त एकदम वाहू शकत नाही' असे पंतप्रधान मोदींनी मत व्यक्त केल्यानंतर नद्यांच्या पाणीवाटपाच्या विषयासंबंधी तातडीने विचार विमर्श करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यासंदर्भात उच्च पदस्थ अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन हा करार रद्द करण्या ऐवजी करारानुसार सिंधू, चिनाब व झेलम या नद्यांतून उपलब्ध असलेल्या पाण्याचा पूर्णपणे वापर करून विकास करून घेणे, बंधारे बांधणे, सिंचन क्षमता वृद्धिंगत करणे या धोरणांना प्राधान्य देण्याचे निश्चित केले. या सर्व प्रक्रियेत पाकिस्तान नेहमीप्रमाणे अडथळे आनेल, विरोध करेल हे लक्षात घेता भारताने सिंधू पाणी करारातल्या तीन तीन टप्प्यांच्या तंटा सोडविण्याच्या प्रक्रियेवर बंधने आणण्याकरिता सिंधू नदी कमिशनलाच तात्पुरती स्थगिती देण्याचे ठरवले आहे. त्यामुळे दोन देशांच्या कमिशन मधली प्रकल्पाच्या विरोधात बाबतची चर्चाच होणार नाही व त्यामुळे पुढची दोन टप्पेच निष्पक्ष तज्ञ व संयुक्त राष्ट्र संघातील लवादाची भूमिका हे अमलात येऊ शकणार नाहीत.

नद्यांच्या पाण्याच्या वाटपाबाबत निर्णय घेताना त्याची आंतरराष्ट्रीय पडतात काय होऊ शकतात याची काळजी भारताने घेणे आवश्यक आहे. कारण सिंधू व पाच नद्यांच्या बाबतीत भारत जसा वरचा पाणी हकदार आहे तसा ब्रह्मपुत्रा, कोली, गंडक इत्यादी नद्यांच्या बाबतीत तो खालचा हक्कदार आहे. चीनने ब्रह्मपुत्रा नदीवर तिबेटमध्ये प्रकल्पाचे काम सुरू

केल्यावर आपण चीनकडे विरोध प्रदर्शित केला होता. सिंधू नदी पाणीवाटपाचा प्रश्न हा चीन व नेपाळच्या भूमिकेवरही आधारलेला आहे. आहे त्यामुळे तो महत्त्वाचा आहे.

सिंधू जलवाटप करारा शिवाय भारताने इतरही शेजारी देशांसोबत जेल वाटपाचे काही करार आत केलेले दिसतात. त्यात प्रामुख्याने भारत व नेपाळ यांचे मध्ये १९९६ मध्ये महत्त्वाचा करार घडून आला. महाकाली नदीच्या एकात्मिक विकासासंबंधी चा हा करार होय. भारतातील महाकाली नदीस 'सारदा' नदी म्हणून संबोधले जाते. सारडा बॅरेज, टनकपुर बॅरेज, पंचेश्वर प्रकल्प या कराराचा एक भाग बनविण्यात आले आहेत. याशिवाय भारत व नेपाळमध्ये जलवाटपा संदर्भातील इतर ही काही महत्त्वाचे करार आहेत. उदा. १९५४ चा कोसी करार, १९५९ चा गंडक करार.

नेपाळ प्रमाणेच भारताने शेजारील बांग्लादेश समवेत ही काही जलवाटपाचे करर केले आहेत. गंगा नदीच्या पाणी वाटपाबाबत भारताने १९९६ साली बांग्लादेशा सोबत करार केला. या करारानुसार गंगा नदीचे पाणी फरक्का येथे जी की भारतातील गंगा नदीवरील शेवटची नियंत्रण रचना आहे, हे या करारातील सूत्राप्रमाणे दरवर्षी १ जानेवारी ते ३१ मे या कालावधीत सामायिक केली जाते.

सारांश, भारताच्या द्विपक्षीय मुद्द्यांमध्ये जलवाटप विषयक घटकास महत्त्वाचे स्थान आहे हे स्पष्टपणे दिसते.

## ४.४ दहशतवाद :-

' एकाला मारा व शंभरांना भयभीत करा' या चिनी म्हणी द्वारे दहशतवादाचे स्वरूप सबंध जगास अनुभवास आले आहे. आज समस्त मानव जातीच्या अस्तित्वाला प्रश्नांकित करणारा घटक म्हणून दहशतवादाने जागतिक मानवी समुदायाच्या भयभीत केले आहे. २१ व्या शतकातील दहशतवादाची व्याप्ती सर्वव्यापी आहे. अविकसित राष्ट्रांपासून ते विकसनशील देशांपर्यंत, मागासलेल्या समूहांपासून ते प्रगत राष्ट्रांत पर्यंत याच्या झळा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात सर्वांना सहन कराव्या लागल्या आहेत. दहशतवाद ही संकल्पना अगदी अलीकडे सर्वांच्या परिचयाची झाली असली तरी सार्वजनिक चर्चा विश्वात या संकल्पनेचे अस्तित्व प्राचीन आहे. फरक एवढाच की, त्याची व्याप्ती व स्वरूप काळाच्या ओघात बदलत गेलेले दिसते. आज पश्चिम आशिया, दक्षिण व दक्षिण पूर्व आशिया, पश्चिम, मध्य व उत्तर पूर्व आफ्रिका, दक्षिण अमेरिका या खंडात दहशतवाद खोलवर रुतलेला आहे. भारतातही काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत व कच्छच्या आखातापासून ते नागा टेकड्यांपर्यंत दहशतवादी कारवायांनी आणि प्रभावित केले आहे. भारतीय राजकारणात व समाजकारणात दहशतवादाने अनेकांचे बळी घेतले आहेत. पंजाब, बंगाल, ईशान्य भारत, काश्मीर यासारख्या राज्यांनी तर दहशतवादाची झळ प्रचंड प्रमाणात सोसली आहे. मुंबई, दिल्ली, कलकत्ता, आग्रा, जयपूर यासारख्या महानगरांना सातत्याने दहशतवादी गटाने लक्ष केले आहे. त्यामुळे समकालीन भारतीय व परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने दहशतवाद हा एक द्विपक्षीय ज्वलंत प्रश्न म्हणून पुढे आला आहे. त्यामुळे त्याचा अभ्यास करणे अगत्याचे ठरते.

दहशतवादाचे स्वरूप :

दहशतवाद ही संकल्पना समजून घेण्याकरिता प्रथम दहशतवादाचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. साधारणतः संघर्षाच्या पुढील प्रकारातून दहशतवादाचे स्वरूप अधिक स्पष्ट होईल.

1. तीव्रगती संघर्ष :-

ज्यावेळी जगातील बहुतांश राष्ट्र किंवा राष्ट्र समूह यांच्यात संघर्ष उद्भवतो तेव्हा त्यास तीव्र गती संघर्ष असे म्हणतात. पहिले व दुसरे महायुद्ध हे तीव्र गती संघर्षाचे उदाहरण म्हणून सांगता येईल. या दोन्ही महायुद्धामध्ये स्वित्झर्लंड हा देश अपवाद करता बहुतांश राष्ट्रांना या दोन्ही महायुद्धांच्या नकारात्मक प्रभावाना सामोरे जावे लागले.

२. मध्यमगती संघर्षः-

दोन राष्ट्रांमधील किंवा देशांमधील संघर्ष या प्रकारात मोडतो. उदा. भारत व पाकिस्तान, भारत व चीन, रशिया व अमेरिका या देशांमध्ये झालेल्या संघर्ष हा मध्यमगती स्वरूपाचा होता. त्याचा प्रभाव त्या त्या राष्ट्रापुरता सीमित असतो.

३. मंदगती संघर्ष :-

ज्यावेळी राष्ट्र प्रत्यक्ष युद्धामध्ये सहभागी न होता किंवा युद्ध न लढता शेजारी राष्ट्रांमध्ये छुप्या पद्धतीने कारवाया करण्याचे तंत्र स्वीकारते तेव्हा त्यास मंदगती संघर्ष असे संबोधले जाते. या तंत्रात शासन स्तरावरून युद्ध तर जाहीर केले जात नाही, प्रत्यक्ष सैन्याचा वापरही टाळला जातो. परंतु शत्रु राष्ट्राला नामोहरम करण्याकरिता छुप्या कारवाया केल्या जातात. या बहुतांश कारवाया दहशतवादी स्वरूपाच्या असतात. म्हणून दहशतवादाचा समावेश या मंदगती संघर्ष प्रकारात केला जातो. या संघर्ष प्रकारात मनुष्य, वित्त व शस्त्र याचा कमीत कमी वापर करून शत्रु राष्ट्राची अधिकाधिक हानी घडवून आणली जाते. ९/११ च्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ला, भारतातील २६/११ चा हल्ला याची ठळक उदाहरणे आहेत. १९९० नंतर जागतिक स्तरावर झालेल्या संघर्ष प्रकारात ९० टक्के पेक्षा अधिक संघर्ष हे मंद गती स्वरूपाचे आढळतात.

**दहशतवादाची व्याख्या :-**

दहशतवाद या संकल्पनेची निश्चित व्याख्या करण्यात अद्यापही जागतिक समुदायास यश आलेले नाही. ही दहशतवादाच्या व्याख्या प्रत्येक राज्याच्या राजकीय परिस्थिती प्रमाणे, सामाजिक स्थितीप्रमाणे बदलताना दिसतात. अमेरिका दहशतवादाची व्याख्या करते ती चीन, रशिया यांना मान्य नसते तर रशिया, चीन जी दहशतवादाची संकल्पना मांडतात ती अमेरिकेला मानवणारी नसते. भारत व पाकिस्तान यांच्याबाबतही हीच परिस्थिती आहे. आहे त्यामुळे एका देशाचा दहशतवादी दुसऱ्या देशाकरिता मुक्तियोद्धा, स्वातंत्र्यसैनिक ठरताना दिसतो. आज जगात २०० पेक्षा अधिक दहशतवादी गट सक्रिय आहेत. दहशतवादाच्या १०२ पेक्षा अधिक व्याख्या आहेत. विकसित देश, विकसनशील देश व साम्यवादी देश यांच्या दहशतवादाविषयीच्या धारणा भिन्न आहेत. यातूनही

दहशतवादाच्या काही व्याख्यांना आधारभूत मानले जाते. त्यातील काही महत्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे होत.

१. संयुक्त राष्ट्रांचे ९२ वे कलमः-

‘ ज्यामुळे निष्पाप मानवांच्या जीविताला धोका निर्माण केला जातो अथवा प्रसंगी प्राणही हरण केले जातात अथवा मूलभूत स्वातंत्र्य धोक्यात आणले जाते अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय दहशतवाद विरोधी उपाययोजना करणे, त्याचप्रमाणे दारिद्र्य दुःख व निराशा यातून निर्माण होणाऱ्या हिंसाचाराचा, दहशतवादाचा अभ्यास करणे, काही व्यक्ति जलदगतीने आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याकरिता स्वत:चा व इतरांचा बळी देतात. यातून निर्माण होणाऱ्या हिंसाचाराचा व दहशतवादाचा अभ्यास करतो.

२. शेरीफ बसीओनी:-

‘एखाद्या विशिष्ट दाव्याचा अगर गाऱ्हाण्याचा प्रचार करण्याकरिता सर्वसामान्य जनतेत किंवा त्यातील महत्वाच्या भागात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेले बेकायदेशीर हिंसाचाराचे तंत्र म्हणजेच दहशतवाद होय. ’

३. जॉन क्रेटम :-

‘राजकीय उद्दिष्टये साध्य करण्यासाठी समाजात किंवा त्यातील विशिष्ट भागात आणि दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने केलेली हिंसात्मक गुन्हेगारी कृती म्हणजे दहशतवाद होय.’

४. F.B.I. :-

‘ आपली राजकीय आणि आणि सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी व्यक्तीविरुद्ध, मालमत्ते विरुद्ध, शासन, नागरी समुदाय किंवा त्याचा काही भाग यांच्या दहशत निर्माण करण्याकरिता अवैध हिंसाचाराचा अथवा बळाचा वापर म्हणजे दहशतवाद होय.’

**दहशतवादाची मूलभूत तत्वे:-**

दहशतवादाची प्रमुख तत्वे पुढील प्रमाणे नमूद करता येतील.

१. हिंसाचाराचा वापर:-

दहशतवाद हिंसाचारास प्राधान्य देतो. हिंसाचाराचा जाणीवपूर्वक व पद्धतशीरपणे वापर दहशतवादात केला जातो. प्रामुख्याने आपल्या प्रश्नांकडे सर्वांचे लक्ष वेधले जावे व शासनाप्रमाणे सामान्य जनतेलाही या प्रश्नाचे गांभीर्य कळावे हा हेतू हिंसाचारा मागे असतो. मागील दशकात दहशतवादी हिंसाचारात मृत पावलेल्यांची संख्या दोन लाखांपेक्षा अधिक आहे.

२. दहशतीचे दबावतंत्र :-

दहशतीच्या दबावतंत्राचा सर्रास वापर दहशतवादी संघटना करतात. हिंसाचाराच्या माध्यमातून दहशतीचे दबावतंत्र ते कार्यान्वित करतात. आपल्या मागण्या मान्य करून घेण्यात साठी राजकीय नेते प्रसिद्ध व्यक्ती यांचे अपहरण करणे, घातपाताच्या कारवाया करून सार्वजनिक जीवनात दहशत निर्माण करणे या सारख्या साधनांचा त्यांच्याकडून सर्रास वापर होतो.

३. प्रसिद्धी:-

आजचे युग हे जाहिरातीचे मानले जाते. दहशतवादी ही प्रसिद्धीच्या तत्त्वाला प्राधान्य देतात. प्रसारमाध्यमांद्वारे धमक्या देणे, प्रसिद्धी माध्यमातील महत्त्वाच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींना ओलीस ठेवणे, समाज माध्यमांमध्ये चित्रफिती, व्हिडिओ प्रसारित करणे, आर्थिक, व्यापारी व संरक्षण दृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांना लक्ष करणे, यांसारख्या तंत्रांचा वापर प्रसिद्धी मिळविण्याकरिता व आंतरराष्ट्रीय जनसमुदायाचे लक्ष वेधण्याकरिता दहशतवादी संघटनांकडून केला जातो.

४. अस्थिरतेला प्राधान्य :-

दहशतवाद्यांना आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अस्थिरता हा घटक पूरक ठरतो. प्रस्थापित राजकीय व्यवस्थेने बरोबर सामाजिक व आर्थिक व्यवस्थांमध्ये ही अस्थिरता निर्माण व्हावी यासाठी दहशतवादी संघटना कार्यरत असतात. अशा अस्थिरतेमुळे सरकारची दहशतवाद विरोधातील धार क्षीण होते व अंतर्गत समस्यांमध्ये ग्रस्त असलेल्या सरकार विरोधात आपले लक्ष साध्य करणे दहशतवादी संघटनांना सहज साध्य होऊ शकते. सुदान, इराक, अफगाणिस्तान, सिरीयल यासारख्या देशातील सामाजिक, एक आर्थिक व राजकीय अस्थिरताच दहशतवादी गटांना आपली राजवट प्रस्थापित करण्यासाठी सहाय्यभूत ठरली. भारतात १३ सप्टेंबर २००० रोजी झालेला संसदेवरील हल्ला राजकीय अस्थिरता निर्माण करण्यासाठी, २६/११ चा हल्ला आर्थिक अस्थिरता निर्माण करण्यासाठी तर १९९२ चा मुंबई बॉम्बस्फोट हल्ला सामाजिक अस्थिरता निर्माण करण्यासाठी झाला होता असे दिसते.

५. मानवी मूल्यांना विरोध:-

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक मानवी समुदायाने जी मानवी मूल्ये स्वीकारली, त्या मूल्यांची प्रतिष्ठा कोणत्याही परिस्थितीत अबाधित राहावी यासाठी जागतिक पातळीवर वचनबद्धता स्वीकारण्यात आली. आली दहशतवादी संघटना मात्र अशा कोणत्याही मानवी मूल्यां प्रति बांधीलकी राखताना दिसत नाहीत. हिंसाचार हेच त्यांचे प्रमुख साधन असल्यामुळे ते मानवी मूल्यांची सर्रास उल्लंघन करतात. स्त्रिया, मुले, वृद्ध, परदेशी पर्यटक त्यांनाही ते आपले लक्ष बनवतात.

६. विचारप्रणालीचा आधार:-

आपल्या उद्दिष्टांना न्याय ठरविण्यासाठी दहशतवादी संघटना प्रामुख्याने विचारप्रणालीचा आधार घेतात. खरेतर धार्मिक मूलतत्त्ववाद हा दहशतवादी कारवायांमागे महत्त्वाचा आधार आहे. त्याच आधारावर दहशतवादी संघटना आपल्या सभासदांमध्ये बांधिलकी निर्माण करतात. अल्पसंख्यांकांच्या मूलभूत अधिकाराचे संरक्षण, समूहाचे हक्क, मुक्तिलढा, स्वयंनिर्णयाचा अधिकार अशा विविध शीर्षकाखाली विचारप्रणालीचा मुलामा चढवण्याचा प्रयत्न दहशतवादी संघटना कडून सर्रास केला जातो.

७. अस्पष्टता:-

दहशतवादाचे हे एक प्रमुख लक्षण मानले जाते. कारण उद्दिष्टे, कार्यप्रणाली, तंत्रे व तत्वे यात कमालीची अस्पष्टता त्यांच्यात दिसते. दहशतवादी संघटना सातत्याने नावे बदलतात, तंत्रे बदलतात, त्याच प्रमाणे ध्येयेही बदलतात. त्यामुळे त्यांच्याविरोधात कारवाई करणे, त्यांचा वेध घेणे सरकारला कठीण होते.

८. त्वरित समाधान:-

दहशतवादाचा लोकशाही मार्गावर मुळापासूनच विश्वास नाही. त्यामुळे संवाद, चर्चा, वाटाघाटी यांसारख्या गोष्टी त्यांच्या कार्यक्रमपत्रिकेत नसतात. प्रश्नांचे त्वरित समाधान हा त्यांचा आग्रह असतो. त्यामुळे दहशतीच्या मार्गाने क्रांती करणे त्यांना अधिक भावते.

९. युद्धास कारण:-

आंतरराष्ट्रीय युद्धास जे घटक तात्कालिक कारण म्हणून पुढे येतात त्यात दहशतवाद हा घटकही पुढे आला आहे. भारत व पाकिस्तान यातील सर्व युद्धाची सुरुवात पाकिस्तानने दहशतवादी कारवायांनीच केली होती. अलीकडच्या काळात भविष्यातील दहशतवादी कारवाया टाळण्यासाठी सुद्धा त्या राष्ट्रावर युद्ध लादले जात आहे. Preventive attack चे धोरण जगात प्रथम इस्त्राईलने अवलंबले. त्याच तत्वाचा वापर करून अमेरिकेने इराक व अफगाणिस्तान विरुद्ध युद्ध पुकारले. सीरिया, इराक याविरुद्ध अमेरिकेचे धोरण या तत्वाचा आधार घेऊनच राबवलेले दिसते.

१०. अवास्तव उद्दिष्ट:-

दहशतवादी संघटनांची उद्दिष्ट ही बहुतांशी अवास्तव असलेली आढळतात. ही उद्दिष्टे केवळ अवास्तवच असतात असे नाही ही तर अतिरेकी स्वरूपाची ही आढळतात. उदा. सर्व इस्लामिक राष्ट्रांना एकत्र करून एकसंध इस्लामिक राजवट निर्माण करणे हे अल कायदा या दहशतवादी संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट अवास्तव अतिरेकी स्वरूपाचेच आहे. LTTE चे तमिळ राज्याचे उद्दिष्टही या प्रकारातच मोडते.

**दहशतवादाचे प्रकार:-**

दहशतवादी संघटनांची उद्दिष्टे कार्यप्रणाली व कार्यक्षेत्र याआधारे दहशतवादाचे पुढील प्रकार स्पष्ट करता येतील.

१. राष्ट्रीय दहशतवाद :-

दहशतवादी कारवायांचे सुरू ज्यावेळी एखाद्या राष्ट्र पुरते सीमित असते त्यावेळी त्या दहशतवादाच्या प्रकाराला राष्ट्रीय दहशतवाद असे संबोधले जाते. त्या विशिष्ट समूहातील शासन व्यवस्थेविरुद्ध त्या दहशतवादी कारवाया सक्रिय असतात. श्रीलंकेतील लिट्टे व पॅलेस्टाईन साठी कार्यरत असलेली हमास ही संघटना या स्वरूपाच्या दहशतवादाचे उत्तम उदाहरण होय. श्रीलंके मध्ये स्वतंत्र तमिळ राज्याच्या निर्मितीसाठी लिट्टेने चार दशक दहशतवादी कारवायांनी श्रीलंकेला पोखरले होते. हमास ही संघटना इस्त्राईल पासून पॅलेस्टाईन चे संरक्षण करण्यासाठी दहशतवादी कारवाया करताना सातत्याने दिसते. इंग्लंडमधील आयरिश रिपब्लिकन आर्मी, भारतातील पंजाब राज्यातील खलिस्तानवादी गट, ईशान्य भारतातील नक्षलवादी गट हे याच प्रकारात मोडतात.

२. आंतरराष्ट्रीय दहशतवाद:-

ज्यावेळी दहशतवादाचे कार्यक्षेत्र एका राष्ट्रा च्या सीमेपुरते मर्यादित न राहता अनेक राष्ट्रांमध्ये या दहशतवादी कारवायांना जन्म देते हे त्यावेळी त्याचा आंतरराष्ट्रीय दहशतवाद हे नामाभिधान प्राप्त होते. आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटना प्रामुख्याने क्रांतिकारी, सामाजिक व राजकीय उद्दिष्टानी आणि प्रभावित झालेल्या असतात. अल कायदा, इसिस या संघटना याचे एक महत्त्वाचे उदाहरण आहे. अल कायदा या दहशतवादी संघटनेचे ५० पेक्षा अधिक राष्ट्रांमध्ये नेटवर्क आहे. सर्व इस्लामिक राष्ट्रांचे एक संघ इस्लामिक राजवट निर्माण करणे हे या दहशतवादी संघटनेचे प्रधान उद्दिष्ट आहे. हे या उद्दिष्टाच्या आड येणाऱ्या प्रत्येक राष्ट्रास अल कायदा आपला शत्रू मानते. फ्रान्स, इंग्लंड, स्पेन, अमेरिका, रशिया, भारत, जापान यासारख्या अनेक राष्ट्रांना यांना अल कायदाच्या दहशतवादी कारवायांच्या झळा बसल्या आहेत.

३. सीमापार दहशतवाद:-

ज्यावेळी दहशतवादाचे केंद्र एका देशात व कार्यक्षेत्र दुसऱ्या देशात कार्यरत असत त्यावेळी त्या दहशतवादास सीमापार दहशतवाद म्हणून संबोधले जाते. अलीकडच्या काळात दहशतवादाचा हा प्रकार वाढला आहे. ज्यावेळी प्रत्यक्ष युद्धात शत्रु राष्ट्रास पराभूत करणे शक्य होत नाही त्यावेळी सीमापार दहशतवादाचा वापर करून शत्रु राष्ट्रास हानी पोहोचवण्याचा चा प्रयत्न मोठ्या प्रमाणात केला जातो. पाकिस्तानकडून भारतात होत असणाऱ्या दहशतवादी कारवाया या या सीमापार दहशतवादाचे प्रमुख उदाहरण आहे. समोरासमोरच्या चार युद्धांमध्ये पराभव पत्करावा लागलेल्या पाकिस्तानने नंतरच्या काळात भारतात अस्थिरता निर्माण करण्यासाठी दहशतवादी तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात केलेला दिसतो. जम्मू काश्मीरचा प्रश्न अधिक जटिल होण्यामागे सीमापार दहशतवाद प्रमुख कारण आहे. जम्मू काश्मीरमध्ये दहशतवादी कारवाया घडवून आणणाऱ्या सर्व दहशतवादी

संघटनांचे केंद्र पाकिस्तान मध्ये आहे. आहे या दहशतवाद्यांना लष्करी स्वरूपाचे प्रशिक्षण, आधुनिक शस्त्रास्त्रे, आर्थिक मदत पाकिस्तान कडून पुरविली जाते. हे अनेक वेळा सिद्ध झाले आहे.

भारताकरिता सीमापार दहशतवाद हे आव्हान स्वातंत्र्योत्तर काळात अगदी प्रारंभापासूनच निर्माण झालेले दिसते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लगेचच पाक पुरस्कृत आझाद काश्मिर दल या पाकव्याप्त काश्मीर मधील स्थानिक दहशतवाद्यांचा समावेश असणाऱ्या दलाने जम्मू आणि काश्मीर वर हल्ला केला होता. यापासून भारत सीमापार दहशतवादाच्या मुकाबला करत आहे.

अशाच प्रकारची समस्या १९८०च्या दशकामध्ये पुन्हा जम्मू व काश्मीर मध्ये उद्भवली. सध्या छत्तीसगड, बिहार, आंध्र प्रदेश, प. बंगाल व ओरिसा हे माओवादी कारवायांशी दोन हात करताना दिसतात. संघर्षाच्या काळा मध्ये तनावाचा काही भाग राज्य पुरस्कृत दहशतवादाच्या रूपांमध्ये व्यक्त होत असतो. अशा देशांकडून थेट भरती करण्यात आलेल्या व नियंत्रित असणाऱ्या या दहशतवादी गटांमार्फत किंवा काही छुप्या गटांमार्फत सीमापार दहशतवादी कारवाया घडवून आणल्या जातात. अशा देशातील सरकार व सरकारी एजन्सीकडून आर्थिक व इतर साधने दहशतवादी गटांना पुरवली जातात. परिणामी सीमापार दहशतवादाच्या समस्येवर तातडीने उपाय न केल्यास देशाच्या अंतर्गत सुरक्षेला धोका उत्पन्न होतो.

भारताचा अलीकडच्या काळात आर्थिक व लष्करी महासत्ता म्हणून उदय होत आहे. या पार्श्वभूमीवर भारताच्या शेजारी राष्ट्रांकडून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे घुसखोरी, शस्त्रास्त्रे व अमली पदार्थांची तस्करी, मानवी व्यापार, बेकायदेशीर स्थलांतरे, दहशतवादी कारवायांच्या रूपातील आव्हानांचा सामना करावा लागत आहे. सद्यस्थितीमध्ये इतर कुठल्याही देशापेक्षा पाकिस्तान कडून भारताच्या सुरक्षेस अधिक धोका आहे ही बाब गुरुदासपूर, पठाणकोट, उरी येथे घडलेल्या दहशतवादी हल्ल्यांनी स्पष्ट झाली आहे. त्यामुळे भारताने पाकिस्तान मधून संचलित होणाऱ्या दहशतवादी गटांचा बंदोबस्त करण्यासाठी सुसज्ज राहणे गरजेचे आहे.

भारताने सीमापार दहशतवादाच्या समस्येचे निराकरण लष्करी, द्विपक्षीय राजनय व आंतरराष्ट्रीय राजकीय समर्थना च्या माध्यमातून करता येईल ही बाब जाणून घेणे महत्त्वपूर्ण ठरते. सोबतच देशांतर्गत स्थिरता, विशेषतः हा धार्मिक बाबींमध्ये राखणे व सीमापार दहशतवादाच्या लढाईमध्ये सर्व धर्माच्या गटांचे समर्थन प्राप्त करून घेणे आवश्यक ठरते. लष्करी उपायांमुळे सीमापार दहशतवादी व व त्यांना पाठिंबा देणारे राष्ट्र यांची अभद्र युती मोडता येऊ शकते. याकरिता भारतीय लष्करास व अर्धलष्करी दलांना आधुनिक शस्त्रास्त्रे व तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. हे त्याच बरोबर सैनिकी कारवायांमध्ये समन्वय साधण्याकरिता सर्व सुरक्षा दलामध्ये सहकार्य निर्माण करणे ही आवश्यक आहे. भारताने यादृष्टीने केवळ पाकिस्तानचाच विचार न करता नेपाळ, भूतान, बांग्लादेश व म्यानमार या देशांनाही राजनयाद्वारे धरून ठेवणे गरजेचे आहे. ज्यातून आर्थिक,

लष्करी, सांस्कृतिक क्षेत्र व दहशतवाद विरोधी कारवायांमध्ये सहकार्याकरिता धोरणे सूत्रबद्ध करता येतील.

४. राज्य पुरस्कृत दहशतवाद:-

दहशतवादी कारवाया घडवून आणण्यात ज्यावेळी राज्याचा प्रत्यक्षात असतो त्या वेळी त्यास राज्य पुरस्कृत दहशतवाद असे म्हटले जाते. शेजारी राष्ट्रांमध्ये अस्थिरता निर्माण करण्यासाठी व देशांतर्गत विरोधकांना नष्ट करण्यासाठी शासन कर्ते राज्य पुरस्कृत दहशतवादाचा प्रामुख्याने वापर करतात. भारतासोबत समोरासमोरचे युद्ध करणे आपल्या क्षमते बाहेरचे आहे हे ओळखून हिजबुल मुजाहिद्दीन, लष्कर-ए-तोयबा, जैश-ए- मोहम्मद यासारख्या दहशतवादी संघटना चा वापर करून भारतात दहशतवादी कारवाया घडवून आणल्या जातात. त्या या प्रकारात मोडतात. तसेच मुसोलिनीने इटलीमध्ये निर्माण केलेला फॅसिस्ट दहशतवाद, हिटलरचा जर्मनी मधील नाझी दहशतवाद, स्टॅलिनचा रशिया मधील साम्यवादी दहशत वाद, चीनमधील माओने सांस्कृतिक क्रांतीतून निर्माण केलेला दहशतवाद हे राज्य पुरस्कृत दहशतवादाचे स्वरूप आहे. भारतातील शिखांची १९८४ मध्ये झालेली कत्तल, २००२ ची गुजरात मधील दंगल हा ही राज्य पुरस्कृत दहशतवादाचाच एक अविष्कार मानला जातो.

५. धार्मिक व वांशिक दहशतवाद:-

प्रामुख्याने मूलतत्त्ववादी भावनेतून निर्माण झालेला दहशतवाद म्हणजे धार्मिक व वांशिक स्वरूपाचा दहशतवाद होय. १९९० नंतरच्या काळात मूलतत्त्ववादी प्रवृत्ती जगभरात फोफावलेल्या दिसतात. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाच्या धोरणानी जागतिक जनसमुदायावर जे सर्वंकष प्रभाव पाडले त्यातून धार्मिक व मानसिक स्वरूपाचा दहशतवाद फोफावलेला दिसतो. अमेरिका व पाश्चात्त्य विकसित राष्ट्रांचा वाढता हस्तक्षेप व प्रभाव यातून अन्य संस्कृती, धर्म प्रामुख्याने इस्लाम धर्मीय भयभीत झालेले दिसतात. इस्लामिक संस्कृतीवर पाश्चात्य संस्कृती जाणीवपूर्वक प्रभाव पाडून भ्रष्ट करते आहे अशी त्यांच्या भावना निर्माण झाली व त्यातून मुस्लिम मूलतत्त्ववाद पुढे आला. या मुस्लिम मूलतत्त्ववादानेच इस्लामिक दहशतवादास तात्विक आधार दिलेला दिसतो. अल कायदा, इसिस, तालिबान ही धार्मिक दहशतवादाचीच अपत्य आहेत. भारतातही हिंदू मूलतत्त्ववादी प्रवृत्तीतून हिंदू दहशतवाद फोफावतो आहे असे जाणकार सांगतात. मालेगाव, अजमेर, समझोता एक्सप्रेस, मडगाव येथे झालेल्या दहशतवादी कारवायांमध्ये या मुलतत्ववादाने प्रभावित झालेल्या दहशतवादी संघटनांचाच हात आहे. या दहशतवादाला जबाबदार असलेल्या घटकांमध्ये प्रामुख्याने अल्पसंख्यांकाना वाटणारी असुरक्षिततेची, भीतीची भावना, स्वतंत्र धार्मिक व वांशिक ओळख गमावण्याची भीती यांचा समावेश होतो.

सारांश, दहशतवाद हे आज मानवी समुदायासमोरील एक मोठे आव्हान आहे. या आव्हानाचा सामना भारतास स्वातंत्र्याच्या प्रारंभीच्या काळापासून करावा लागतो आहे. पाकिस्तान, चीन, बांग्लादेश, अफगाणिस्तान इत्यादी देशांकडून सीमापार

दहशतवादास प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत मिळताना दिसते. ज्यामुळे भारताच्या अंतर्गत शांतता व सुव्यवस्थेस सातत्याने बाधा पोहोचताना दिसते. आजही सीमापार दहशतवाद हे भारतीय राष्ट्रीय सुरक्षे समोरील एक मोठे आव्हान आहे, हे स्पष्ट दिसते.

## ४.५ स्थलांतर

एका प्रदेशातून दुस-या प्रदेशात जाणे किंवा देशाटन करणे ही प्रक्रिया प्राचीन काळापासून जागतिक स्तरावर अस्तित्वात आहे. आहे परंतु अलीकडच्या काळात विशेषतः १९७०च्या दशकानंतर जगात स्थलांतराचा वेग प्रचंड वाढला आहे. स्थलांतरामागे केवळ रोजगार ही प्रेरणा किंवा मुख्य घटक राहिलेला नाही. त्यामागे मानवी हक्कांची सुरक्षितता व उल्लंघन या प्रक्रियाही कारणीभूत ठरताना दिसत आहेत. आफ्रिका, आशिया आणि लॅटिन अमेरिका या खंडातील लोक मोठ्या प्रमाणात यूरोप व अमेरिका या भागाकडे स्थलांतरित होत आहेत. परंतु निर्वासित म्हणून येऊ पाहणाऱ्या व निर्वासित झालेल्या लोक समुदायास समूळ रहिवाशांकडून व त्या त्या राष्ट्रीय सरकारांकडून जी वर्तणूक दिली जाते, ती मानवी हक्कांचे उल्लंघन करणारीच असते. स्थानीय जनतेकडून अशा आलेल्या व्यक्तीवर होणारे हल्ले एक प्रकारे शासनाच्या मूक संमतीनेच चालत असताना दिसतात. एखाद्या राष्ट्रातील संघर्षाच्या परिस्थितीतूनही विस्थापितांचा लोंढा शेजारच्या राष्ट्रात आसरा मागतो; परंतु ते सरकार भविष्यात निर्माण होणाऱ्या सामाजिक व आर्थिक समस्यांच्या नावाखाली त्यांना निवारा देण्याचे नाकारते. १९७१च्या पूर्व पाकिस्तान व प. पाकिस्तान संघर्षात पूर्व पाकिस्तान मधील एक कोटीहून अधिक पाकिस्तानी नागरिक भारताच्या आश्रयास आले होते. त्यावेळी भारत सरकारने त्यांना मानवतेच्या व्यापक दृष्टिकोनातून आसरा दिला. पूर्व पाकिस्तानी लोकांची लोक भावना समजून त्यांचे स्वतंत्र बांग्लादेश मी राष्ट्र निर्माण करण्यातही भारताने पुढाकार घेतला. परंतु आजही भारताच्या विविध भागात विशेषतः प. बंगाल, ओरिसा, मुंबई या भागात अनेक बाग्लादेशी नागरिक रोजगाराच्या शोधात येतात. त्यांना बाग्लादेशी घुसखोर या नावानेच ओळखले जाते. ते पोलिसांच्या हाती लागले तर त्यांना जीवनभर तुरुंगात कैदी म्हणून राहण्याची वेळ येऊ शकते. कुठल्याही देशातील विस्थापितांच्या डोक्यावर वर भीतीच्या व संकटांच्या अनेक टांगत्या तलवारी कायम असतात. संयुक्त राष्ट्रांकडून व काही स्वयंसेवी संस्थांकडून निर्वासितांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने प्रयत्नही केले जातात. परंतु हे प्रयत्न अनेक अंगांनी व अनेक अर्थांनी अपुरे ठरतात हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे विस्थापितांचा व निर्वासितांचा मानवी हक्क संरक्षण व संवर्धनाच्या दृष्टीने एक नवीन प्रश्न जागतिक स्तरावर वर निर्माण झालेला दिसतो.

भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये स्थलांतर हा घटक एक प्रमुख द्विपक्षीय मुद्दा राहिलेला आहे. विशेषतः श्रीलंका व बांग्लादेश या शेजारील राष्ट्रांमधील स्थलांतराची समस्या भारतीय परराष्ट्र धोरणात कळीचा मुद्दा ठरताना तर दिसतेच शिवाय भारतीय समाज कारण व राजकारणाच्या अंतर्गतही हा मुद्दा कायम महत्त्वाचा राहिलेला दिसत. दक्षिण भारतीय राजकारणात श्रीलंकेत तामिळ भाषिकांवर होत असलेला अन्याय हा तामिळ अस्मितेशी जोडला जातो तो तर हिंदुत्ववादी राजकीय प्रवाह बांग्लादेशी घुसखोरांचा मुद्दा जमातवादी राजकारणाशी जोडताना दिसतात. एकंदरीत स्थलांतर हा भारतीय परराष्ट्र धोरणातील एक द्विपक्षीय मुद्दा आहे हे या निष्कर्षाप्रत आपण येतो.

## ४.६ सारांश:-

भारतीय परराष्ट्र धोरणात द्विपक्षीय मुद्द्यांमध्ये ते सीमा प्रश्न, नद्यांचे जलवाटप, स्थलांतर व दहशतवाद सीमापार राज्य पुरस्कृत दहशतवाद या घटकांनी अद्याप ही महत्त्वाचे स्थान कायम राखलेले दिसते. चीन, पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ, म्यानमार, अफगाणिस्तान या शेजारील राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित करताना हे द्विपक्षीय मुद्दे कायम प्रभावी राहिलेले आपणास आढळतात. तरीही भारत पंचशील या आपल्या परराष्ट्र धोरणास केंद्रस्थानी ठेवून या शांतता, सहकार्य व संवादाच्या माध्यमातून या द्विपक्षीय मुद्यांची सोडवणूक करण्यासाठी स्वातंत्र्याच्या प्रारंभापासून कायम प्रयत्नशील असल्याचे आढळते.

## ४.७ आपण काय शिकलो?

प्र. १ भारतीय परराष्ट्र धोरणातील सीमाप्रश्नावर निबंध लिहा.

प्र. २ भारताचे शेजारील राष्ट्रांशी असणारे सीमावाद लिहा.

प्र. ३ भारतीय परराष्ट्र धोरणातील जलवाटप या घटकांची चर्चा करा.

प्र. ४ था भारत व पाकिस्तान मधील जल वाटपाच्या समस्येचा आढावा घ्या.

प्र. ५ वा भारत व चीन सीमावादावर निबंध लिहा.

प्र. ६ वा दहशतवादाची संकल्पना स्पष्ट करा.

प्र. ७ वा भारतीय संदर्भात सीमापार दहशतवाद ही संकल्पना स्पष्ट करा.

प्र. ८ वा भारतीय संदर्भात स्थलांतराची समस्या स्पष्ट करा

**टीपा लिहा**

१. दहशतवाद

२. स्थलांतर

३. सीमापार दहशतवाद

४. राज्य पुरस्कृत दहशतवाद

५. सिंधू जलवाटप करार

६. भारत चीन सीमा वाद

७. भारत-पाक सीमा वाद

८. भारत बांग्लादेश सीमा वाद

## ४.८ संदर्भसूची:-

१) देवळाणकर शैलेंद्र, ‘ भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतर’, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०१४

२) देवळाणकर शैलेंद्र, ‘समकालीन जागतिक राजकारण भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणापुढील आव्हाने’, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१४

३) खरे विजय, ‘ जागतिक राजकारणात भारत’, के सागर के सागर पब्लिकेशन, पुणे, हा २०१०.

४) उदगावकर म. न. ‘ १९व्या शतकातील दहशतवाद’, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७.

५) लोखंडे भगवान, ‘ भारतीय राजकारण आणि समकालीन प्रश्न’, दूर्वा एजन्सीज, पुणे, २०२१

६) लोखंडे भगवान, ‘ मानवी हक्क आणि भारत’, दूर्वा एजन्सीज, पुणे, २०१८.

❄❄❄❄❄❄❄